



आपले देव आपली दैवते

शं. रा. देवळे



आपले देव आपली दैवते : ३

शंभूराव रामचंद्र देवळे

श्री लेखन वाचन भांडार, पुणे २.

मुद्रक :
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
' शिव-पार्वती ', ४६१/१० सदाशिव
टिळक रस्ता, पुणे २.

प्रकाशक :
ग. ल. ठोकळ,
ठोकळ भवन
लक्ष्मी रस्ता, पुणे २.

आवृत्ती पहिली १९६५
अक्षय्य तृतीया १८८७

किंमत दोन रुपये

३|४६

आपले देव, आपली दैवते

भारतातील तीर्थे आणि क्षेत्रे ही भारतीय एकात्मतेची प्रतीके आहेत. वेदकाळापासून आजपर्यंत भारतीय जनतेने तीर्थक्षेत्रांविषयीची आपली श्रद्धा उत्कटतेने राखली आहे. नाना वंश, जाती, भाषा, भू-विशेष इत्यादींनी गजबजलेला विविधतापूर्ण असा भारत देश एकात्म असल्याची जाणीव अखंड राखण्यात या तीर्थक्षेत्रांविषयीच्या श्रद्धेचा वाटा फार मोठा आहे. चारी धामे, सप्तपुऱ्या, सप्तकुलपर्वत, सप्तसरिता, शक्तिपीठे, बारा ज्योतिर्लिंगे इत्यादी विविध पंथानुयायांची पवित्र स्थाने हिमालयापासून कन्याकुमारी-पर्यंत आणि जगन्नाथपुरीपासून द्वारकेपर्यंत सर्व भारतभर विखुरलेली आहेत.

भारतीय एकात्मतेच्या या जागत्या केंद्रांचा परिचय घडविण्यासाठीच 'आपले देव, आपली दैवते' या मालेची योजना आहे. हा ऐतिहासिक-सांस्कृतिक विषय प्रसादपूर्ण व परिणामकारक भाषेत मांडावा असा हेतू होता आणि ते काम या मालेचे लेखक श्री. शं. रा. देवळे यांनी चांगल्या प्रकारे केले आहे, या मताशी वाचकही सहमत होतील.


या मालेच्या पहिल्या भागात तुळजापूरची भवानी, वणीची सप्तशृंगी देवी, कार्ल्याची एकवीरा, आंब्याची योगेश्वरी व नेवाशाची म्हाळसा-मोहिनी ही देवीक्षेत्रे आणि शिखर-शिंगणापूरचा शंभू महादेव, पालीचा खंडोबा, पंढरीचा पांडुरंग ही हरिहरांची लीलाक्षेत्रे यांचा परिचय घडविलेला असून मोरया गोसावी व समर्थ रामदास या सत्पुरुषांच्या निवासाने पावन बनलेल्या अनुक्रमे चिंचवड व शिवथर घळ या स्थानांचेही दर्शन घडविले आहे.

दुसऱ्या भागात खंडोबाच्या भक्तांना अत्यंत प्रिय असलेली जेजुरी, आदिशक्ति रेणुकेच्या आणि दत्तात्रेयाच्या

निवासामुळे माहात्म्य पावलेले माहूर, दक्षिण-काशी म्हणून प्रख्यात असलेले कोल्हापूर, उन्मत्त क्षत्रियांचा मद उतरविणाऱ्या परशुरामाचे चिपळूण आणि 'मंगेश' नावाने गोमंतकात गाजत असलेल्या शंकराचे स्थान मंगेशी या देवताक्षेत्रांबरोबरच ज्ञानेश्वर, एकनाथ, नरसिंह सरस्वती व तुकाराम या संतांच्या पदस्पर्शाने चैतन्यमय बनलेल्या आळंदी, पैठण, नरसोबाची वाडी व देहू या संतक्षेत्रांची वर्णने समाविष्ट आहेत. या पहिल्या दोन भागांत महाराष्ट्रातील पवित्र स्थानांचा परिचय आहे आणि पुढील दोन भागात महाराष्ट्राबाहेरील भारतीय क्षेत्रांचा परिचय आहे. या तिसऱ्या भागात कन्याकुमारी, मदुरा, गोकर्ण महाबळेश्वर आणि बाहुबली ही दक्षिण भारतातील क्षेत्रे, द्वारका हे पश्चिमेकडील क्षेत्र, भुवनेश्वर व जगन्नाथपुरी ही पूर्वेकडील क्षेत्रे आणि प्रयाग व हरिद्वार ही दोन उत्तरेकडील क्षेत्रे यांची शब्दयात्रा घडविली आहे. पुढील चौथ्या भागात अमरनाथ, गया, मथुरा-वृंदावन, अयोध्या, चित्रकूट, कोणार्क, नवद्वीप, गिरनार, अबू, अमृतसर आणि तिरुपती इत्यादी उर्वरित प्रमुख क्षेत्रांचा परिचय येणार आहे.

या चार भागांशिवाय शिवभक्तीच्या जागत्या ज्योती जेथे अखंड उजळलेल्या आहेत अशा ज्योतिर्लिंगांचे दर्शन घडविणारे 'बारा ज्योतिर्लिंगे' हे स्वतंत्र पुस्तक प्रकाशित झाले असून, विघ्नहर्त्या विनायकाच्या उपासकांना प्रिय असलेल्या अष्टविनायकक्षेत्रांचा परिचय असाच स्वतंत्र पुस्तकरूपाने लवकरच वाचकांच्या सेवेस सादर करण्याचा संकल्प आहे. संकल्पित दोन पुस्तके प्रकाशित झाल्यानंतर या सहा पुस्तकांच्या मालेतून मराठी वाचकांना भारतातील महत्त्वपूर्ण अशा बहुतेक सर्व तीर्थक्षेत्रांची सर्वांगीण माहिती एकत्र मिळण्याची सोय होईल. वाचकांना आमचा हा प्रयत्न आवडेल अशी आशा आहे.

—प्रकाशक



श्रीकाशी-विश्वेश्वर-चरणी
भक्तिभावपूर्वक समर्पण

अनुक्रम

कल्पायुषां स्थानजयात् पुनर्भवात् क्षणायुषां भारतभूजयो वरम्।
क्षणेन मर्त्येन कृतं मनस्विनः संन्यस्य संयान्त्यभयं पदं हरेः ॥
यद्यत्र नः स्वर्गसुखावशेषितं स्विष्टस्य सूक्तस्य कृतस्य शोभनम्।
तेनाजनाभे स्मृतिमज्जन्मनः स्याद् वर्षे हरिर्यद् भजतां शं तनोति ॥

—श्रीमद्भागवत

भारतात जन्मून क्षणभराचे आयुष्य लाभले, तरी ते स्वर्गातील प्रदीर्घ सुखोपभोगांच्या जीवनाहून अधिक श्रेष्ठ आहे. कारण भारतात जन्म घेणाऱ्या मानवांनी सर्वस्वाचा त्याग करून एक क्षणभर का होईना, प्रभूचे उत्कट स्मरण केले तर त्यांना निर्भय अशा परमपदाचा लाभ होतो. म्हणूनच स्वर्गसुखाचा लाभ घडविण्याइतके कायिक, वाचिक वा मानसिक असे पूर्वसुकृत आमच्या गाठी असेल, तर त्याचे फल म्हणून आम्हांला भारतवर्षातच ('अजनाभ' या दुसऱ्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या पवित्र भूमीतच) पुनर्जन्म लाभावा. कारण या भूमीत जन्म लाभला, तर स्वभक्तांवर कल्याणवृष्टी करणाऱ्या प्रभूचे स्मरण आम्हांला अखंड राहील.

१

कन्याकुमारी

एकदा भगवान श्री शंकर कैलासावर बसले होते. जवळच पार्वती त्यांची सेवा करीत बसली होती. इतक्यात तेथे एक स्त्री आली. ती म्हणाली :

" भोलानाथांचा जयजयकार असो ! "

" कोण ? "

" मी पुष्पकाशी ! "

" इथं येण्याचं कारण ? "

" देवाधिदेवा, महादेवा, सांबसदाशिवा, आज तीन युगे लोटली. मी आपली मानसपूजा मनोभावे केली. अश्रूंचा अभिषेक, हास्याची फुले, श्वासरूपी चंदन, शरीराचा धूप, दृष्टीचा दीप आणि मधुरवचनांचा नैवेद्य ह्या साधनांनी आपणाला आळविलं, पण .... "

" मग म्हणणं काय आहे तुझं ? "

" पण आपण अजूनही माझ्यावर प्रसन्न झाला नाहीत. "

" आज प्रसन्न झालो आहे ! काय मागणं आहे ते माग. "

" माझं मागणं इतकंच आहे की, आपण माझा स्वीकार करावा ! पत्नी म्हणून मला पदरात घ्यावी ! देवी पार्वतीनंसुद्धा या गोष्टीला संमती द्यावी. राग धरू नये. "

त्या स्त्रीची ती विलक्षण मागणी ऐकून भगवान शंकर गडबडून गेले. आश्चर्याने थक्क होऊन ते गप्प झाले. त्यांनी पार्वतीकडे पाहिले आणि नंतर डोळे मिटून त्यांनी थोडी ध्यानधारणा केली.

थोडा वेळ विचार, मनन, चिंतन करून ते म्हणाले. "तथास्तु ! मुली तुझी इच्छा पूर्ण होईल. पण ती फक्त सृष्टीच्या संहारकाली ! तो क्षण येईपर्यंत तू वाट पाहा ! "

" महाराज, केव्हा येणार तो क्षण ? "

" तीनशे पासष्ट साध्या दिवसांचे एक वर्ष. अशी चार लक्ष बत्तीस वर्षे गेल्यावर कलीयुग संपेल. नंतर त्याच्या दुप्पट वर्षांचे द्वापार युग, कलीच्या तिप्पट वर्षांचे त्रेता आणि चौपट वर्षांचे कृतयुग होईल. या चार युगांचे एक चतुर्युग. अशा एक हजार चतुर्युगांचा ब्रह्मदेवाचा एक दिवस होईल. त्याच्या तीस दिवसांचा महिना व बारा महिन्यांचे वर्ष. अशी शंभर वर्षे लोटल्यावर एक प्रलय होईल. त्या प्रलयकालाप्रमाणे दहा प्रलयकाल संपल्यावर एक विष्णू जन्म घेईल. असे बारा विष्णू होऊन गेले म्हणजेच शिवाचा क्षण येईल. तो क्षण म्हणजे ह्या सर्व सृष्टीच्या संहाराचा क्षण ! त्या क्षणापर्यंत तू वाट पाहत राहा. "

" भोलेनाथ. हा एवढा प्रचंड काळ म्हणजे.... "

" मुली, तपश्चर्या करीत राहा आणि वाट पाहा ! तो क्षण आल्याशिवाय मीलन होणार नाही ! जा. मुली जा ! "

" महाराज, कुठं जाऊ ? कोणत्या स्थळी तप करू ? आपलं मीलन कोणत्या जागी होईल ! "

" ज्या ठिकाणी पृथ्वीतील सगळे समुद्र जमिनीच्या एका टोकाशी मिळतील, तिथं तू माझी वाट पाहत राहा. "

" अशी जागा म्हणजे.... "


" पाताळलोक आणि भूलोक ज्या ठिकाणी एकत्र मिळतात ती जागा !

भारताचे दक्षिण टोक ! तिथं मी तुला भेटेन. "

" आज्ञा महाराज ! ही वरमाला हाती घेऊन मी ही अशीच त्या स्थळी आपली वाट पाहत उभी राहीन ! "

" तथास्तु ! कुमारी कन्यके तुझं कल्याण असो ! "

अशा प्रकारे श्री शंकराचा वरप्रसाद घेऊन ती पुष्पकाशी भारताच्या थेट दक्षिण टोकाशी गेली आणि तेथील समुद्राच्या एका भूशिरावर उभी राहिली. त्या ठिकाणी तिने अनंतकाळ-पर्यंत अत्यंत खडतर तपश्चर्या केली.



प्रवेशद्वार, कन्याकुमारी

समुद्रसंगमाच्या त्या मनोहर भूमीवर ती सौंदर्यसंपन्न स्त्री पाहून सर्व लोक चकित झाले.

पुष्पकाशीच्या सौंदर्याची, तिच्या विवाहप्रतीक्षेची आणि तपश्चर्येची वार्ता बाणासुराच्या कानांवर गेली. त्या असुराने तिची अभिलाषा धरली आणि तिच्याशी खूपच लाडीगोडी केली. पण ती साध्वी श्री शंकराच्या ध्यानधारणेत गुंग असल्यामुळे दैत्याचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले. ती त्याच्याशी एकही शब्द बोलली नाही.

शेवटी जबरदस्तीने तिचे हरण करण्याचा त्याने प्रयत्न केला, तेव्हा त्या साध्वीच्या तेजाने तो घायाळ झाला. त्याने तिला स्पर्श करताच त्याच्या अंगाचा दाह झाला. दैवी आणि आसुरी युद्धांत असुराचा नाश झाला आणि कन्याकुमारी पुष्पकाशी पुनः शांतपणे तपश्चर्येत मग्न झाली.

अशा प्रकारे हजारो लाखो वर्षे होऊन गेली. पुष्पकाशी जशीच्या तशीच उभी राहिली. ती थिजून गेली. पाषाण बनली. तरीही तिचे सौंदर्य यत्किंचितही कमी झाले नाही. ती त्या मूर्तिरूपात अजूनही जशीच्या तशी उभी आहे. लोकांनी तिचे मंदिर बांधले. तिच्या पावन दर्शनासाठी नाना ठिकाणचे लोक येऊ लागले.

पश्चिमसमुद्र रत्नाकर, पूर्वसमुद्र महोदधी आणि दक्षिणसमुद्र हिंदी महासागर या सर्व सागरसंगमावर कन्याकुमारीचे भव्य मंदिर आहे. दक्षिण भारतातील प्रचंड मंदिरांच्या मानाने हे मंदिर अगदीच सामान्य असले तरी त्याचे माहात्म्य आणि भौगोलिक स्थान विशेष असे आहे. या मंदिरातील कुमारीची मूर्ती काळ्याशार पाषाणाची असून चंदन-लेपामुळे ती गोरीपान दिसते. मूर्तीचा हसरा चेहरा अत्यंत सुंदर आणि मोहक आहे. तिच्या उजव्या हातात टपोऱ्या मण्यांची पुष्पमाला आहे. श्री शंकराला वरमाला घालण्यासाठी ती आतुरली आहे. जपतपाचे तिचे ध्यान चिंतनीय आहे.

या पवित्र देवळाच्या आसमंतात यक्षकिन्नर, अप्सरा, गंधर्वादिकांचा वास असतो. ते त्या ठिकाणी तपाचरणही करतात. एका यक्षिणीने आपल्या तपाचे पुण्य ह्याच ठिकाणी पिशाच्चयोनीत भटकणाऱ्या एका राजकन्येला देऊन तिचा उद्धार केल्याची एक कथा सांगतात. जपतपादी साधनेला आणि शांतनिवांतपणे ईश्वरचिंतनाला हे स्थळ अत्यंत योग्य असे आहे.

कन्याकुमारीच्या मंदिरापासून दक्षिणेकडे अगदी जवळच समुद्रात एक खडक असून त्याला 'विवेकानंदांचा खडक' असे म्हणतात. कारण अमेरिकेच्या धर्मपरिषदेहून आल्यानंतर काही काळ श्री स्वामी विवेकानंदांनी या खडकावर बसून तपश्चर्या केली होती ! ह्या खडकाच्या उत्तरेस देवळाच्या पायऱ्यांनी बनलेला घाट आहे. त्यामुळे

स्नानासाठी ही जागा फारच सोयीची बनलेली आहे. खोल समुद्राच्या खवळलेल्या प्रचंड लाटा विवेकानंद खडकाशी धडक देऊन शांत होतात आणि त्यांचे तुषार किंवा फेसाळ जल ह्या स्नानकुंडात येऊन पडते. त्यामुळे येथील स्नानाला एक प्रकारची विशेष मौज येते.

येथे स्नानासाठी चोहोकडे साखळदंड बांधून मुद्दाम सोयीची कुंडे बनविलेली आहेत. पोहण्याची हौस भागावी म्हणून जवळच एक सीमेंट काँक्रीटचा भव्य तलाव तयार केलेला आहे. त्यात समुद्राचे पाणी खेळते ठेवलेले आहे.



कन्याकुमारी

कन्याकुमारीच्या मंदिरापासून पश्चिमेला जवळच एका विशिष्ट ठिकाणी समुद्राच्या काठावर हाताने उकरल्यास वाळूत गोड्या पाण्याचे झरे लागतात. भरतीच्या वेळी समुद्राच्या पाण्याखाली हे झरे झाकले जातात. पण पुनः ओहोटीच्या वेळी तेथे उकरल्यास गोड्या पाण्याचे झरे सापडतात. ही गोष्ट या ठिकाणी एक चमत्काराची आहे.

कन्याकुमारीचे स्थान विषववृत्तापासून जवळच असल्यामुळे येथून उत्तर ध्रुवाचा तारा अगदी क्षितिजावर दिसतो. मात्र दक्षिणेचा अगस्तीचा तारा येथून खूपच मोठा दिसतो. भूगोलाबरोबरच येथील खगोलही विशेष प्रेक्षणीय आहे.

कन्याकुमारी क्षेत्राजवळ विशेष पाहण्यासारखी गोष्ट म्हणजे तेथील सूर्योदय आणि सूर्यास्त! दररोज समुद्राच्या पाण्यातून पूर्वेकडे सूर्य येतो

आणि पश्चिमेकडे तो समुद्राच्या पाण्यातच अस्ताला जातो. या दोन्ही वेळची शोभा अत्यंत रमणीय असते. असा देखावा इतरत्र क्वचितच दिसून येतो. हा देखावा पाहण्यास हजारो लोकांची गर्दी येथे नित्य दिसते.

पौर्णिमेच्या सायंकाळी तर मावळतीला अस्तास चाललेल्या रविराजाचा लालबंद गोळा दिसतो आणि अगदी त्याच वेळी उगवतीला शशिनाथाचे पिवळसर तांबूस बिंब पाण्यातून वर येताना दिसते. ते दृश्य अत्यंत प्रेक्षणीय असते. हे असे विलोभनीय दृश्य भारतात फक्त ह्या एकाच ठिकाणी दिसून येते.

कन्याकुमारीपासून काही मैल अंतरावर शुचींद्र नावाचे एक रम्य स्थळ आहे. तेथे श्री विष्णूचे स्थाणुनायर देवाचे एक भव्य मंदिर आहे. अहिल्येच्या पातिव्रत्याचा भंग केल्यामुळे गौतमाने शाप देऊन इंद्राला शिक्षा केली होती. तेव्हा इंद्राने ह्या ठिकाणी येऊन तपश्चर्या केली होती. या स्थळी इंद्र शुद्ध झाला म्हणून या स्थळाला शुचींद्र हे नाव दिले. शुचींद्र व स्थाणुनायर मंदिराचे शिल्पकाम अत्यंत सुंदर आहे. येथील दगडातील कोरीव काम प्रेक्षणीय आहे. वीस फूट उंचीपर्यंतच्या मारुतीच्या व गणेशाच्या भव्य मूर्ती आणि दगडी खांबांचे कोरीव काम पाहून प्रेक्षक थक्क होऊन जातात. एका दगडात कोरलेल्या एका भव्य सुंदर खांबातच पुनः काही लहान लहान खांब कोरलेले असून त्यावर आघात केल्यास मधुर सुरांचे सुंदर नाद ऐकू येतात. काय हे शिल्पचातुर्य! दुसऱ्या एका दगडी खांबात कोरलेल्या एका प्रचंड हत्तीच्या तोंडात एक वाटोळा दगड नीट बसविलेला आहे. तो दगड तोंडातल्या तोंडातच गोल फिरतो. तो बाहेर काढता येत नाही. यावरून तो दगड तसाच तोंडात ठेवून ती हत्तीची मूर्ती त्या कारागिराने कोरलेली असावी.

अशा प्रकारे कन्याकुमारी क्षेत्र आणि त्याचा पवित्र परिसर म्हणजे अनेक आश्चर्यांचे एक विलक्षण स्थळ आहे. भारताचे ते अगदी दक्षिण टोक असून तेथून पुढे समुद्रच समुद्र ! थेट दक्षिण ध्रुवापर्यंत तेथून सरळ दक्षिणेला एकही भूखंड नाही. सर्व सागरसंगमावरील त्या विशेष स्थळी सृष्टिसंहाराच्या क्षणी देवी कन्याकुमारी भगवान शंकराला वरमाला घालील आणि पुनः सृष्टीचे मंगल करील !

२

मदुरा

सुमारे पाच हजार वर्षांपूर्वी दक्षिण भारतात मदुरा येथे मलयध्वज नावाचा राजा राज्य करीत होता. त्याची प्रजा अत्यंत सुखी होती. पण स्वतः राजाला मात्र सुख नव्हते; कारण त्याला संतान नव्हते !

ऋषिमुनींच्या सांगण्यावरून त्या राजाने पुत्रकामेष्टी नावाचा यज्ञ केला. तेव्हा यज्ञदेवता प्रसन्न झाली. तिने प्रसाद म्हणून त्या राजाला एक कन्यारत्न दिले. त्या कन्येचे डोळे मत्स्याकार असून भुवया अगदी शिवधनुष्याप्रमाणे होत्या. राजाने त्या मुलीचे नाव मीनाक्षी असे ठेवले.

हळूहळू ती मीनाक्षी चंद्रकोरीप्रमाणे वाढली. योग्य वेळी ती उपवर झाली. तिच्या विवाहाची चिंता राजाला लागली. राजकन्या मीनाक्षी अत्यंत सुंदर, सुकोमल आणि सुशीला होती. ती जणू प्रत्यक्ष पार्वतीच आहे, असा भास सर्वांना होई. तिला सुयोग्य वर लाभावा म्हणून राजाने खूप प्रयत्न केले.

एके दिवशी सुंदरेश्वर नावाचा बैरागी राजाकडे आला. राजाने त्याचे यथायोग्य स्वागत केले. त्या बैराग्याच्या सतेज मुद्रेकडे पाहून राजा स्तंभितच झाला. त्याने त्याला आगमनाची इच्छा विचारली. तेव्हा त्या बैराग्याने आपले खरे रूप राजास दाखविले आणि पत्नी म्हणून

मीनाक्षीची मागणी केली. राजाला आश्चर्य वाटले आणि आनंदही झाला. कारण तो बैरागी म्हणजे प्रत्यक्ष भगवान श्रीशंकरच होते. आपल्या घरी मीनाक्षी कन्येच्या रूपात प्रत्यक्ष माता पार्वतीच वावरत आहे, हे कळताच त्याला आनंद झाला. त्याने त्या बैराग्याच्या त्या मागणीस होकार दिला.

झाले. त्या विवाहासाठी भव्य लग्नमंडप बांधण्यात आला. मोठा थाटमाट केला. शंकराचे सर्व गण त्या विवाहासाठी तेथे आले. मीनाक्षी आणि सुंदरेश्वर यांचा लग्नसोहळा आनंदात पार पडला. मलयध्वज राजाला कृतकृत्य झाल्याचे समाधान लाभले. त्याने आपले राज्यही त्या मीनाक्षी देवीला अर्पण करून टाकले.

नंतर मातृदेवता मीनाक्षीने आपल्या सर्व प्रजेच्या सुखासाठी अत्यंत परिश्रम घेतले. ती एक थोर देवताच बनली. लोकांची सर्व दुःखे तिने नाहीशी केली. सबंध मदुराई देश तिने वैभवसंपन्न, सुखी आणि समृद्ध बनविला.

काही काळानंतर लोकांनी मातृदेवता मीनाक्षी आणि श्रीसुंदरेश्वर यांची मंदिरे बांधली. ती मंदिरे म्हणजे सर्वांची श्रद्धास्थाने होती. त्यामुळे मदुरा हे एक महान पवित्र क्षेत्र बनले. मदुरेची मीनाक्षी म्हणजे प्रीती, वैभव आणि कल्याण यांची मूर्तिमंत जागती प्रतिमाच बनली.

पुढे हजारो वर्षे लोटली. भारत देशात द्रविड, आर्य, अनार्य वगैरे लोकांच्या संस्कृतीचे अनेक संघर्ष झाले. उत्तर हिंदुस्थानात बौद्ध, जैन, हिंदू आणि मुसलमान यांच्यांतील विविध संघर्ष झडत राहिले. शक, कुशान, हूण आणि अरब, पठाण, मोगल वगैरे म्लेंच्छांनी आर्य आणि द्रविड संस्कृतीवर अनेक आघात केले.

इसवी सनाच्या चौदाव्या शतकात तर दक्षिणेकडेही मुसलमानांच्या टोळधाडी आल्या आणि देवगिरीच्या पाडावानंतर (इ. स. १३१० मध्ये) मलिक काफूरने मदुराईच्या मीनाक्षी मंदिराचाही विध्वंस केला.

त्या काळात म्हैसूरचा शूर सेनापती कंपन उदयार याने मुसलमानांशी अनेक वर्षे निकराने झगडून दक्षिणेच्या संस्कृतीचे रक्षण केले. पण मदुराईच्या मीनाक्षीमंदिराचा मुसलमानांनी केलेला विध्वंस जेव्हा त्याला कळला, तेव्हा तो अत्यंत दुःखी झाला.

एके दिवशी कंपन उदयार घोड्यावर स्वार होऊन थेट मदुरेला आला. त्याने तेथे पाहिले तर मदुरेची व्यापारी पेठ ओस पडलेली होती. माता मीनाक्षीच्या त्या पवित्र क्षेत्राला उदास कळा आलेली होती. मीनाक्षीमंदिराची छिन्नविच्छिन्न अवस्था झाली होती. तो प्रसिद्ध लग्नमंडप भग्न होऊन पडला होता. ते सर्व पाहून त्या वीराला रडू कोसळले. तो मटकन खाली बसला. दुःखात सुख एवढेच की, देवी मीनाक्षीची मूर्ती मात्र त्याला सुस्थितीत दिसली. त्या सुंदर मूर्तीची करुणार्द्र दृष्टी कंपन उदयारला काहीतरी मूक संदेश देत होती. तो लौकरच भानावर आला आणि त्याने मीनाक्षीच्या मंदिराची पुनः बांधणी करून मदुरेचे वैभव वाढविण्याचा निश्चय केला.

ती कामगिरी त्याने मदुरेचा नायक तिरुमल याच्याकडे सोपविली. तिरुमल नायक हा त्या भागाचा सर्वाधिकारी तर होताच, पण तो आपल्या श्रेष्ठ संस्कृतीचा अभिमानी असून शिल्पकलेचा भोक्ता आणि स्थापत्य-शास्त्राचा तज्ज्ञ होता. त्याने ती कामगिरी मोठ्या आनंदाने अंगीकारली. कंपन उदयारला त्यामुळे समाधान वाटले.

तिरुमल नायकाने खूप विचार केला. त्याने अनेक योजना आखल्या, विविध आराखडे तयार केले, आणि मदुरा क्षेत्राची तसेच मीनाक्षी-मंदिराची बांधणी अत्यंत भव्य, प्रेक्षणीय मजबूत आणि करून ते जगाच्या स्थापत्यशास्त्रातील विलक्षण वास्तुशिल्प करण्याचे ठरविले.

त्या कामी होणाऱ्या अफाट खर्चासाठी त्याने सबंध दक्षिण प्रदेशा-तील धनिकांचे आणि श्रद्धावान भक्तांचे यथायोग्य साहाय्य मिळविले.

पांड्य राजांच्या तामीळ संस्कृतीचे माहेर म्हणून मदुरा क्षेत्राला मान होता. त्या क्षेत्राची पुनर्बांधणी करण्यासाठी शेकडो हजारो लोकांनी कोट्यवधी रुपयांचा ढीग तिरुमल नायकापुढे ओतला. तेव्हा त्याच्या आनंदाला पारावार उरला नाही.

मदुरेच्या पुनर्बांधणीसाठी सुंदरेश्वराने केलेल्या मूळच्या रचनेत आणखी भर घालून अनेक योजना करण्यात आल्या. तिरुमल नायक याने आपल्या कौशल्यपूर्ण योजनेत प्रथम भक्कम तटबंदीची आखणी केली. तिच्या आत अनेक तट, व्यापारपेठ, मंडप आणि नंतर मुख्य मंदिर अशा बांधणीची योजना केली. सर्वत्र नागमोडी वळणाची विचित्र बांधणी त्याने आखली.

त्याने आपल्या एकेक कल्पना सुप्रसिद्ध शिल्पकार सुमंत स्थिरमूर्ती ह्याला सांगितल्या. त्या थोर कलाकारानेही आपले कलासर्वस्व त्या भव्य सुंदर वास्तूत ओतण्याचे ठरविले.

त्या प्रचंड बांधकामासाठी हजारो शिल्पकार, पाथरवट, गवंडी, मजूर दूरदूरच्या ठिकाणांहून आणले आणि त्यांनी वर्षानुवर्षे खपून मदुरेचे ते विशाल सुंदर मंदिर बांधून पूर्ण केले. ही गोष्ट सतराव्या शतकातली होय.

अंगिकारलेल्या त्या अती प्रचंड कार्याची पूर्तता झाल्याचे पाहून तिरुमल नायक आणि शिल्पकार सुमंत स्थिरमूर्ती यांना अत्यंत धन्यता वाटली. त्यांनी माता मीनाक्षीला भावपूर्ण आदरांजली वाहिली आणि अशा ह्या भव्य वास्तूची प्रेरणा दिल्याबद्दल कंपन उदयार याचे आभार मानले. मदुरा हे क्षेत्र कर्नाटक, आंध्र आणि तामीळ या प्रदेशांचे व त्याबरोबरच सबंध भारताचेही एक आदर्श पवित्र क्षेत्र बनले.

भारताच्या दक्षिण प्रदेशातील हे क्षेत्र म्हणजे वास्तुचमत्काराचे दिव्य प्रतीक आहे. कारण मदुरेच्या मीनाक्षीमंदिराचे बांधकाम आहेच

तसे प्रेक्षणीय! शब्दांनी वर्णन अशक्य आहे. ते प्रत्येकाने प्रत्यक्षच पाहिले पाहिजे!

तसे पाहिले तर दक्षिण भारतातील अनेक ठिकाणांची वास्तुशिल्पे भव्य, सुंदर आणि प्रेक्षणीय आहेत. "दक्षिणेत जावे पाहायला आणि उत्तरेस जावे खायला!" अशी एक म्हणच आहे. त्या दृष्टीने दक्षिणेत खरोखरच पाहण्यासारखे अगदी खूप खूप आहे. मदुरेच्या मीनाक्षीमंदिराला तर त्याबाबत अग्रपूजेचा मान आहे खास! भव्य गोपुरांच्या प्रदेशातील मदुराई हा तेजस्वी मुकुटमणीच आहे.

मदुरेचे मीनाक्षीमंदिर भव्य, सुंदर आणि प्रेक्षणीय आहे. ह्या मंदिराएवढे व ह्या मंदिरासारखे दुसरे मंदिर दक्षिणेतच काय, पण भारतात आणि बहुधा जगातही नसेल. त्याचे सर्वच काम अजोड आहे.

काळ्या पाषाणांचा सुमारे वीस फूट रुंदीचा आणि शंभर फूट उंचीचा भव्य मजबूत कोट ह्या मंदिरासभोवती बांधलेला आहे. किल्ल्याचा तट ह्या कोटापुढे कमीच भासतो. ह्या कोटाला मधून मधून भव्य दरवाजे असून त्यांवर उंचच उंच अशी सुंदर गोपुरे बांधलेली आहेत. त्यांपैकी काही गोपुरे तर दीडशे फूट उंचीची आहेत. ताडामाडांची उंचीही ह्या गोपुरांपुढे कमी वाटते.

अशी प्रचंड आणि कौशल्यपूर्ण रचनेची गोपुरे अन्यत्र कोठेही नाहीत. मदुरेच्या श्रेष्ठ वैभवाच्या त्या जणू विजयपताकाच उभारलेल्या आहेत. ही गोपुरे म्हणजे येथील वैशिष्ट्ये आहेत.

गोपुरांच्या प्रत्येक कमानीवर अनेक प्रकारची नक्षी असून हत्ती, वाघ, सिंह, पोपट वगैरे प्राण्यांच्या हुबेहुब प्रतिमा आहेत. पौराणिक कथा, महाभारतातील काही प्रसंग येथे मूर्तिमंत उभे केले आहेत. शिवाय हे सर्व काम अत्यंत सुंदर रंगांनी रंगविलेले आहे. त्या सर्व शिखरागोपुरांचे शिल्प आणि कलाकौशल्य पाहून मनुष्य आश्चर्याने थक्क होऊन जातो.

प्रवेशद्वार तर इतके भव्य आणि अप्रतिम सुंदर आहे की प्रत्येक येथून जाताना त्या महाकाय विशाल वास्तूच्या दर्शनाने प्रवासी दिङ्मूढ होतो.

त्या प्रचंड तटाच्या आत सुमारे पंधरा एकरांचे विस्तीर्ण पटांगण आहे. त्यातही पुनः कोट, गोपुरे, शिखरे, नक्षीकाम, आणि मूर्तिशिल्प प्रेक्षणीय आहे. सभोवताली प्रशस्त ओवऱ्या आहेत. त्यांत अनेक देवदेवतांची सुंदर मंदिरे आहेत. आत फार मोठी बाजारपेठही वसलेली आहे. विविध वस्तूंची ती शेकडो दुकाने पाहून प्रत्येकाला एक प्रकारचे भव्य प्रदर्शनच पाहिल्यासारखी मौज वाटते. दररोज पहाटे-पासून रात्री दहा वाजेपर्यंत तो भाग संपूर्ण गजबजलेला असतो. दररोज लाखो रुपयांची उलाढाल तेथे होते.



प्रवेशद्वार, मीनाक्षी

तटातून, अनेक प्रवेशद्वारांतून, शिखरागोपुरांच्या गर्दीतून नागमोडी वळणे घेत आपण त्या बाजारपेठेतून कोठून कोठे जात आहोत, याचा सामान्य माणसाला अंदाजच येत नाही.

मदुरा नगर वैगाई नदीच्या तीरावर वसलेले आहे. हे स्थान दक्षिण रेल्वेच्या मुख्य मार्गावर असून मद्रासपासून त्याचे अंतर सुमारे साडे-तीनशे मैल आहे.

मीनाक्षीच्या आणि सुंदरेश्वराच्या मुख्य मंदिरांच्या पुढील भागात

अतिभव्य असा सुंदर सभामंडप आहे. सुमारे ३०० × १०० फूट मापाच्या त्या प्रचंड मंडपाला हजार खांब असून तो प्रत्येक खांब नक्षीकामाने गच्चच भरलेला आहे. ह्या विस्तीर्ण आणि अप्रतिम सभामंडपाचे काम करणाऱ्या त्या कारागिरांची खरोखरच धन्य आहे. त्यांनी आपले प्राण ह्या शिल्पसौंदर्यात ओतले आहेत.

त्या खांबांपैकी काही खांबांतून तर "सा, रे, ग, म" इत्यादी स्वरांची कंपनेही निघतात. काय हे कौशल्य! ह्या मंडपात उभा राहिलेला प्रत्येक माणूस मंत्रमुग्ध होऊन जातो. कोठेही उभे राहा. समोर खांबांच्या तिरक्या ओळी प्रत्येकाला दिसतात आणि ती विशाल सुंदर वास्तू पाहून प्रत्येक जण प्रशंसाच करतो. कारागिरांचे सर्व कसब पाहण्यास आपणांस तर वेळही नसतो. "किती पाहू नि किती नको" असे होऊन जाते.

देवी मीनाक्षीची मूर्ती खोल गाभाऱ्यात असून तेथे अखंड नंदादीप तेवत असतो. तेथे सध्या विजेच्या दिव्यांची रोषणाई केलेली असते. कृष्ण पाषाणाची सुमारे तीन ते चार फूट उंचीची ती अतिसुंदर मूर्ती बहुमोल वस्त्रालंकारांनी सजविलेली असते. मत्स्याकार डोळ्यांची मीनाक्षीमातेची ती नितान्त शांत मूर्ती पाहून भक्तांच्या डोळ्यांचे पारणे फिटते. त्या देवीच्या हातात एक कमळ असून त्यावर एक पोपट चोच मारताना दिसतो आहे. देवीची ती एकंदर मूर्ती म्हणजे शिल्पसौंदर्याचा अप्रतिम नमुनाच आहे. त्या देवीचे दर्शन घेऊन तिची पूजाअर्चा भक्तिभावाने करणाऱ्या भक्ताचे जीवन खरोखरच धन्य होते.

ही देवी नवसाला पावणारी आणि संकटकाळी भक्ताला तारणारी आहे. ह्याबद्दल अनेक दृष्टान्त व चमत्कार घडलेले आहेत.

सुंदरेश्वर आणि मीनाक्षी ह्यांच्या त्या विशाल सुंदर मंदिराचे काम पूर्ण झाल्यावर नायक तिरुमल ह्याने सुमंत स्थिरमूर्ती ह्या कारागिराला

आपणांसाठी एक भव्य मजबूत वाडा बांधण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्याने मातीच्या खांबांवर उभारलेला अतिप्रचंड व भक्कम वाडा बांधला. तिरुमल नायकाचा तो विशेष शिल्पाचा प्रेक्षणीय वाडा अद्यापही उभा आहे. तो पाहून सर्वजण कौतुक करतात !



मीनाक्षी, मदुरा

त्या वाड्याचे विशेष कौशल्याचे अप्रतिम काम पाहून तिरुमल नायक फारच खूष झाला. तशातच त्या सुमंत स्थिरमूर्ती शिल्पकाराने स्वतःच्या मताने तिरुमल नायकाची एक विलक्षण सुंदर मूर्ती केलेली पाहून नायक एकदम प्रसन्न झाला. त्याने आपल्या गळ्यातील बहुमोल कंठा त्या कलाकाराच्या गळ्यात घातला आणि त्याला दृढ आलिंगन दिले. त्याने आपल्या पत्नीचीही मूर्ती करण्यास त्या कारागीराला सांगितले.

शिल्पकार सुमंत स्थिरमूर्ती याने नंतर तिरुमल नायकाच्या पत्नीचीही सुंदर मूर्ती तयार केली. ती इतकी हुबेहुब होती की, पाहणाराला खरी मूर्ती कोणती व खरी स्त्री कोणती, याचा भ्रम व्हावा. स्वतः तिरुमल नायकानेही ती मूर्ती पाहिली. तेव्हा त्यालाही तसाच भ्रम झाला. तो थक्क झाला, गुंगला, पण तेवढ्यात त्याने त्या कारागीराला विचारले, "माझ्या पत्नीची इतकी हुबेहूब, तंतोतंत मापांची आणि गुणावगुणांची छटा दाखविणारी मूर्ती तू तयार केलीस तरी कशी ? तू हे सर्व निरीक्षण कसं आणि केव्हा केलंस ? खरं काय ते सर्व स्पष्ट सांग !"

"महाराज, आपल्या येथील सरदार नीलकांत याने मला वारंवार

सूचना आणि माहिती देऊन हे सर्व काम करवून घेतले. " स्थिरमूर्तीने भीतभीतच सांगितले.

झाले. नायक तिरुमल याची मर्जी फिरली. त्याने सरदार नीलकांताचे डोळे काढण्याचा हुकूम दिला ! मोठ्यांच्या विचित्र लहरीपुढे कोण काय करणार !

नीलकांताला ती वार्ता कळाली. तेव्हा त्या निष्ठावान स्वाभिमानी पुरुषाने स्वतःचे डोळे स्वतःच काढून नायकापुढे ठेवले ! त्याचे ते कृत्य पाहून नायकाला पुनः पश्चाताप झाला.

नंतर नीलकांत श्रीमीनाक्षी देवीपुढे जाऊन बसला. त्या अंध भक्ताने अनुष्ठानच मांडले. त्या काळात त्याने एकशे पाच पदे रचली आणि अत्यंत भावपूर्ण अंतःकरणाने देवीची आराधना केली. काही दिवसांनी देवी मीनाक्षी त्या थोर, अंध नीलकांताला प्रसन्न झाली आणि तिने त्याला त्याची दृष्टी पुनः दिली असे म्हणतात.


अशा प्रकारे भक्तांना प्रसन्न होऊन कृपा करणारी देवी मीनाक्षी हे एक जागृत देवस्थान आहे, अशी भाविकांची निष्ठा आहे. तिचे ते विशाल भव्य आणि अतिसुंदर मंदिर, ते शिखरागोपुरांचे विशेष शिल्प आणि तिची ती करुणार्द्र दृष्टी असलेली मूर्ती पाहून नास्तिक माणूसही क्षणभर नम्र होतो.

तसे पाहिले तर दक्षिण भारतात कोठेही जा, तेथे उंचच उंच शिखरा-गोपुरांची अनेक भव्य आणि अत्यंत सुंदर मंदिरे आहेत. एखाद्या तलावाच्या काठी अथवा एखाद्या जलाशयाच्या मध्यभागी विस्तीर्ण बांधणीची आणि नयनमनोहर कलाकौशल्याची ती सर्व मंदिरे आहेत. काही मंदिरां-जवळ सुंदर बागा किंवा विशाल उद्यानेही आहेत. सणा-उत्सवाच्या वेळी त्या मंदिरांवर आणि पुष्पकरिणीभोवती सर्वत्र दीपशोभेचा अप्रतिम, अवर्णनीय थाट करतात.

दक्षिण भारतात श्रीविष्णू आणि श्रीशंकर यांच्या भक्तांची आपापल्या आराध्यदैवताचे महत्त्व वाढवून त्यांच्या मंदिरांचा थाट करण्याची

चढाओढ लागलेली दिसते.

मदुराई गावाजवळ 'नेपाकुलम्' नावाचा जो भव्य तलाव आहे तेथील शोभा पाहण्यास दररोज माणसांची खूप गर्दी असते.



मीनाक्षी मंदीर, सुवर्णमंडप

रामेश्वर आणि कन्याकुमारीला जाणारे सर्वच प्रवासी अथवा यात्रेकरू लोक प्रथम श्रीक्षेत्र मदुरा येथे जातात आणि मीनाक्षीदेवीचे दर्शन घेऊन पावन होतात.

मीनाक्षी मंदिराच्या जगप्रसिद्ध गोपुरांमुळे श्रीक्षेत्र मदुराईच्या सौंदर्यात आगळीच भर पडलेली आहे. तेथील सर्व शिखरागोपुरांना आणि तेथील कलापूर्ण वास्तुसौंदर्याला आपल्या भारत सरकारनेही लाखो रुपये खर्चून अलीकडे नवा रंग दिला आहे आणि ते क्षेत्र आणखी प्रेक्षणीय केले आहे.

३

गोकर्ण महाबळेश्वर

सायंकाळची वेळ होती. समुद्राच्या लाटांचा घन-गंभीर आवाज चालू होता. जणू काही तो रत्नाकर मंत्रघोषाने परमेश्वराला आळवीत होता. अशा वेळी तीरावर वाळूचे लिंग करून कैकसी देवी भगवान शंकराची पूजा करीत होती. रोजचा हाच नियम होता तिचा. इतक्यात काय झाले ?

कैकसीने केलेले ते वाळूचे लिंग समुद्राच्या लाटेने मोडून टाकले. तिची पूजा अपूर्ण राहिली. त्यामुळे ती शोक करू लागली. तो शोक ऐकून तिचा पुत्र रावण तेथे धावत आला. घडलेला प्रकार त्याला कळला. त्याने आपल्या मातेचे सांत्वन केले. तो म्हणाला, " त्रैलोक्यात सर्वश्रेष्ठ ठरलेले ईश्वराचे आत्मलिंगच तुला पूजेसाठी आणून देईन. काळजी करू नकोस ! "

अशी प्रतिज्ञा करून रावण तेथून निघाला. तो थेट कैलासावर गेला. भगवान शंकराला प्रसन्न करून घेण्यासाठी त्याने अत्यंत खडतर तपश्चर्या केली. त्याने आपली नऊ शिरकमले तोडून महादेवाच्या चरणी अर्पण केली. तेव्हा त्याची ती विशेष भक्ती पाहून भोळा सांब त्याच्यावर प्रसन्न झाला आणि त्याने रावणाला आत्मलिंग देऊन टाकले.

ते आत्मलिंग म्हणजे एक अत्यंत प्रभावी दैवत होते. भगवान रुद्र-देवाने सकल देवदेवतांच्या सत्त्वाचे सार काढून त्यापासून पूर्वी एक

अद्भुत मृग तयार केला होता. त्या मृगाची तीन शिंगे म्हणजे ब्रह्मा, विष्णू व महेश यांचे तीन सत्त्वांशच होते. तो अद्भुत मृग रुद्रदेवाने कैलासावर नेऊन ठेवला. सकल देव-देवतांचे सत्त्व गेल्याने पृथ्वी कासावीस झाली. ती महाविष्णूकडे गेली. विष्णूने कैलासावर जाऊन रुद्रदेवाची प्रार्थना केली. तेव्हा रुद्राने तो सत्त्वमृग विष्णूला दिला. विष्णूने तो मृग फाडून सकल देवदेवतांचे सत्त्व त्यांना परत दिले.


आत्मलिंग, गोकर्ण महाबळेश्वर

त्या अद्भुत मृगाचे एक लिंग म्हणजे महेशाचे आत्मलिंग. त्या आत्मलिंगाच्या पूजाप्रभावाने सर्व देव अजिंक्य झाले. त्या आत्मलिंगाच्या अगाध, अगम्य महिम्याने भगवान शंकराला महादेव म्हणून सकल देवतांमध्ये श्रेष्ठत्व प्राप्त झाले. त्या थोर आत्मलिंगाच्या भक्तीने भक्तांचे सकल मनोरथ सिद्ध होत असत.

असा त्या आत्मलिंगाचा महिमा रावणाने ऐकला होता. आपल्या मातोश्रीच्या पूजेसाठी म्हणूनच त्याने ते आत्मलिंग आणून देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्याची तपश्चर्या सफल झाली. भगवान शंकराने त्याला ते आत्मलिंग देऊन टाकले. आणि बजावले की, “ सांभाळ. हे आत्मलिंग अत्यंत प्रभावी आहे. ते थेट कैकसीमातेच्या पूजास्थानीच नेऊन ठेव. वाटेत जर ते कोठे भूमीवर ठेवलेस तर ते तेथेच पक्के होईल ! ”

शंकरापासून ते आत्मलिंग घेऊन रावण कैलासाहून लंकेकडे निघाला. ही वार्ता नारदमुनींनी स्वर्गलोकात जाऊन देवेन्द्राला सांगितली.

"रावणाच्या हाती ते ईश्वराचे आत्मलिंग गेले तर तो अजिंक्य होईल. पृथ्वीवर अनर्थ माजेल आणि सर्वत्र हाहाःकार उडून जाईल. म्हणून त्याला ते आत्मलिंग भगवान शंकरांनी देऊ नये," अशा विचाराने सर्व देव कैलासावर गेले, पण तोपर्यंत रावण तर आत्मलिंग घेऊनही गेला होता. आता काय करणार?

"रावणाच्या हातून ते आत्मलिंग वाटेतच कोठेतरी जमिनीवर ठेवले गेले पाहिजे म्हणजे ते आत्मलिंग तेथेच कायम राहील. सप्तपाताळ भेदून ते बद्धमूल होईल आणि जगाचे रक्षण होईल." अशी काहीतरी युक्ती केलीच पाहिजे.

देवांनी विचार केला. बेत ठरविला आणि त्या कामावर विघ्नहर्त्या गजाननाची योजना केली. गजाननाने बटुवेष धारण केला. तो रावणाच्या वाटेवर सप्तकोटेश्वराजवळ पितृस्थाली या ठिकाणी उभा राहिला. त्या वेळी श्रीविष्णूनी आपल्या सुदर्शनचक्राने सूर्य झाकून टाकला आणि सायंकाळ झाल्याचा भास निर्माण केला.

चालता चालता अकस्मात सायंकाळ झाल्याचे पाहून रावण घाबरला. सायंकाळची संध्या करण्यासाठी तो आतुर झाला. "आता संध्या करायला बसावं तर हे आत्मलिंग कुठं ठेवावं? जमिनीवर तर हे ठेवायचं नाही! बरं हे न ठेवावं तर संध्येचा नियम टळेल आणि पाप घडेल." अशा विचारात तो होता इतक्यात त्याला तो बटुरूपी गजानन दिसला.

रावणाने त्या बटूला जवळ बोलावले. त्याच्या हाती ते आत्मलिंग दिले आणि "माझी संध्या होईपर्यंत हे सांभाळ, जमिनीवर ठेवू नकोस." असे त्याला बजावले. बटूगणपतीने ते कबूल केले, पण अट घातली की, "मी तीन वेळा हाक मारीन आणि त्यावरही तू न आलास तर हे लिंग मी खाली ठेवीन."

रावणाने बटूची अट मान्य केली आणि तो संध्येला बसला. तितक्यात ते आत्मलिंग भयंकर जड झाले. बटूला ते पेलेना. त्याने हाक मारली, "रावणा ऽ, ऊठ लौकर, हे लिंग घे. हे भयंकर जड झाले आहे. मला पेलवत नाही. रावणा ऽ, ऊठ ऽऽ!"

बटूने दोन वेळा हाक मारली. पण रावण संध्यावंदनात गुंतला होता. तो मध्येच कसा उठणार! थोड्याच वेळात बटूने 'रावणाऽ' अशी तिसरी हाक मारली आणि ते आत्मलिंग खाली जमिनीवर ठेवले. झाले, देवांचा कार्य भाग साधला.



विघ्नहर्ता गणपती, गोकर्ण महाबळेश्वर

रावण घाई-घाईने आला. बटूने खाली ठेवलेले ते आत्मलिंग उचलू लागला, पण छे! ते आत्मलिंग खाली खाली पाताळात जाऊ लागले. रावणाने आपल्या वीसही भुजांचे बळ एकवटून ते लिंग वर उचलण्याचा प्रयत्न केला, पण छे! त्या लिंगाची वेष्टने, वस्त्र, दोरा आणि मुरगाळून फोडलेला एक तुकडा त्याने दूरवर फेकला. ते लिंग पिळून पिळून ओढले. त्या लिंगाचा आकार गाईच्या कानासारखा झाला. ते गोकर्ण बनले. पण रावणाला काही ते उचलून वर काढता येईना.

देवांनी त्या लिंगावर आणि बटू गणपतीवर पुष्पवृष्टी केली. रावणाने त्या बटू गणपतीच्या डोक्यावर रागाने मुष्टिप्रहार केला होता तरीही

कार्यसिद्धीच्या आनंदात तो बटू तसाच तेथे उभा होता.

त्या ठिकाणी सर्व देवदेवता आणि स्वतः श्रीशंकर पार्वतीसह आले. त्यांनी त्या स्थळी त्या आत्मलिंगाची "श्री महाबळेश्वर" असे नाव देऊन प्रतिष्ठापना केली. गण्डकी नदीच्या तीरावरून एक मोठी शाळिग्राम शिला आणून विश्वकर्म्याने तिचे एक भव्य पीठ बनविले आणि ते त्या आत्मलिंग श्रीमहाबळेश्वराला जोडले. नंतर त्याची मोठ्या थाटाने पूजा केली.

वैवस्वत मन्वन्तराच्या तेराव्या त्रेतायुगात ईश्वरनाम संवत्सराच्या शरद्ऋतूत कार्तिक शुद्ध प्रतिपदेच्या शुभ दिवशी व्यतिपातयोग, तुलामास, विशाखा नक्षत्र, रविवारी, मीनलग्नाच्या शुभ मुहूर्तावर त्या आत्मलिंग महाबळेश्वराची प्रतिस्थापना झाली. त्या काळी सर्वांनी त्या देवाचे स्तवन केले :

नमस्ते राजलिंगाय लिंगरत्नाय ते नमः ।
नमस्ते रावणभुजगर्वसर्वस्वहारिणे ॥
गोकर्ण क्षेत्रवासाय महाबल नमो नमः ॥

आपला पुत्र गजानन याने केलेला तो पराक्रम पाहून शंकर पार्वतीला आनंद झाला. देवकार्यासाठी त्याने बटुवेष धारण करून ते आत्मलिंग रावणाच्या हातून घेतले आणि मोठ्या युक्तीने त्याने श्रीमहाबळेश्वराची स्थापना केली. त्या द्विभुज बटुरूप गजाननाची सर्वांची पूजा केली. त्याला दिव्य वस्त्राभरणांनी विभूषित केले. भगवान शंकरांनी त्याला अग्रपूजेचा मान दिला. अद्यापही त्या (पट्टविनायक) बटू गजाननाची मूर्ती विघ्नहर्ता महागणपती म्हणून गोकर्ण महाबळेश्वराच्या आग्नेय दिशेस थोड्याच अंतरावर उभी आहे. त्याच्या मस्तकावर रावणाच्या मुष्टिप्रहाराची खूणही आहे. सर्व लोक आधी त्याची पूजा करतात. नंतर महाबळेश्वराचे दर्शन घेतात.

ब्रह्मदेवाचा पुत्र आदिरुद्र सृष्टी उत्पन्न करण्यासाठी घोर तपश्चर्या करण्यास याच ठिकाणी बसला होता. तो नंतर भूमीतून वर आला. त्या वेळी भूमातेने गोमातेचे रूप घेतले होते. तिच्या कानांतून तो प्रकट झाला म्हणून ह्या स्थळाला "आदिगोकर्णक्षेत्र" हे नाव मिळाले. दरवर्षी मकरसंक्रमणात त्या आदिगोकर्ण लिंगाचा पूजासमारंभ असतो. एखाद्या भूकंपातून ही गोकर्णक्षेत्राची भूमी समुद्रातून वर आली असावी, असे यावरून वाटते !

त्या आदिरुद्राच्या तपस्थानाला "रुद्रभूमी" म्हणतात. आदिगोकर्णाच्या स्थळाच्या ईशान्येकडे थोड्याच अंतरावर ती रुद्रभूमी आहे. तेथे दहन केलेल्या माणसाला मोक्षप्राप्ती होते, असे म्हणतात. ह्या लहानशा ठिकाणी दहनासाठी फक्त तीन मण लाकडे लागतात. रुद्रभूमीच्या स्मशानस्थळाचा हा महिमा विशेष आहे.

आदिरुद्राच्या भार्येचे नाव ताम्रगौरी. गोकर्ण क्षेत्राजवळ ताम्रगिरी नावाची टेकडी आहे. तेथे त्यांचा विवाह झाला. त्या पर्वतावर अद्यापिही आश्विन शुद्ध चतुर्दशीला ताम्रगौरीदेवीचा विवाह समारंभ थाटाने करतात. ताम्रगौरीचा हातात तराजू आहे ! काशीपेक्षा गोकर्ण श्रेष्ठ आहे, हे तिने तोलून दाखविले आहे, असे म्हणतात. त्या पर्वताच्या पायथ्याशी ताम्रपर्णी नदी वाहत आहे. ती पवित्र गंगा रुद्रभूमीला वळसा घालून वाहत जाते व समुद्राला मिळते. तिच्यात स्नान आणि पिंडदान केल्याने महापुण्य मिळते, असा भाविकांचा समज आहे. ताम्रगौरीदेवीच्या मंदिरासमोरच ह्या नदीचे एक कुंड आहे. तेथे मृताच्या अस्थी-विसर्जन केल्यास त्याला स्वर्गीय सुख मिळते असे म्हणतात. महात्मा गांधींचे चिताभस्म येथे विसर्जन केले होते.

ताम्रपर्णी गंगा समुद्राला ज्या ठिकाणी मिळते, त्या ठिकाणी "पितृस्थाली" हे पवित्र ठिकाण आहे. त्याच ठिकाणी रावण संध्यावंदनाला बसला होता. त्या स्थळी सुरभी कामधेनू हरिहराला उत्तरायण व दक्षिणा-

यन यांच्या संधिकालात आपल्या दुधाचा अभिषेक करते. या ठिकाणी केलेली श्राद्धे, नारायण बली वगैरे कर्मे पुण्यप्रद होतात. म्हणून या स्थळाला विधूतपापस्थाली असेही म्हणतात.

एकदा श्रीशंकराच्या शापाने ब्रह्मदेवाच्या पाच मस्तकांपैकी एकमस्तक तुटले आणि ब्रह्मदेव चतुर्मुख झाले. तरी ब्रह्मदेवाने शंकराला प्रसन्न करून घेण्यासाठी गोकर्ण क्षेत्राजवळ शतशृंग पर्वतावर तपश्चर्या केली. तेव्हा रुद्र प्रसन्न झाला आणि त्याने ब्रह्मदेवाला यज्ञाचा अधिकार देऊन सत्यलोकी पाठवून दिले. ब्रह्मदेवाचे ते तपस्थान समुद्राजवळ शतशृंग पर्वतावर ब्रह्मकुंड आणि ब्रह्मेश्वर या नावाचे मोठे रम्य ठिकाण आहे गोकर्ण क्षेत्राच्या यात्रेकरूंनी ह्या स्थळाला भेट देण्याचा प्रघात आहे. ब्रह्मा-विष्णू महेश ह्या तीन देवतांचे ते एक महान ऐक्याचे पवित्र स्थळ आहे.

श्रीक्षेत्र गोकर्णाचे माहात्म्य ऐकून मणिभद्र, सिध्देश्वर आणि भूतनाथ हे कैलासातील प्रमुख गण महाबळेश्वराच्या दर्शनासाठी आले आणि पाहतात, तो तेथे सर्वत्र " जळ तेथे तीर्थ, स्थळ तेथे लिंग " असा प्रकार आहे! तेव्हा त्या पुण्यभूमीवर पाय तरी कसा ठेवावा ?

सिध्देश्वर आणि भूतनाथ नंतर त्या क्षेत्राचे क्षेत्रपाल म्हणून बाहेरच उभे राहिले. मणिभद्र मात्र खाली डोके वर पाय करून क्षेत्रात शिरला. शतशृंग पर्वताजवळ ब्रह्मेश्वराच्या पायथ्याशी तो तसाच उलटा उभा राहून तप करू लागला. अद्यापही तो तसाच आहे. त्याला माणेश्वर हे नाव लोकांनी पिले आहे. माणेश्वराचे जागृतस्थान नवसाला पावते, असे म्हणतात. सर्व लोक मोठ्या भाविकतेने त्याच्या पावलांची पूजा करतात.

शतशृंग पर्वतावर गोगर्भ नावाची एक गुहा आहे. तेथे पूर्वी भूमातेने गोमातेचे रूप घेऊन राजन्वती होण्यासाठी तप केले होते. त्या गुहेत प्रवेश करून आलेल्या भाविकाला पुनर्जन्माची चिंता राहत नाही असा समज आहे.

" गोकर्ण मंडले, गोराष्ट्रदेशे, शतश्रृंगपर्वतोपान्ते " असा संकल्प करून गोकर्ण क्षेत्राचा पूजाविधी प्रत्येक यात्रिक करतो. शतशृंगपर्वत हा अत्यंत रम्य आणि दिव्यतीर्थांचे माहेर आहे. हा पर्वत पूर्वी हिमालयावर होता. तो ब्रह्मदेवाचे निवासस्थान होता. पण एकदा गरुडाच्या तोंडातून दुर्मुख नावाचा सर्प निसटला आणि तो त्या शतशृंग पर्वतात लपून बसला. गरुडाला तो सापडेचना! शेवटी गरुडाने तो पर्वतच उचलला आणि आकाशमार्गे दक्षिणेकडे आणला अगस्तीऋषींच्या आज्ञेने त्याने तो पर्वत गोकर्णक्षेत्राजवळ ठेवून दिला.

त्या शतश्रृंग पर्वतावर दोन कोटी तीर्थे होती, असे म्हणतात. ब्रह्मदेवाचे कमंडलुतीर्थ, गरुडतीर्थ, अगस्तीतीर्थ, मणिनागाची सरपटत गेल्याची खूण आणि कोटितीर्थही वगैरे अनंत तीर्थे अद्यापही तेथे आहेत.

त्या सर्वांत कोटितीर्थ महत्त्वाचे आहे. ह्यातील स्नानाचे पुण्य विशेष मानतात. त्रिपुरी पौर्णिमेला येथे थाटाचा दीपोत्सव होतो. सर्व यात्रेकरू या तीर्थात स्नान करतात. प्रथम पद्मविनायकाचे दर्शन आणि नंतर महाबळेश्वराचे दर्शन करतात.

येथील नागतीर्थाच्या कृपेने सर्पशाप, मातृशाप वगैरे शापताप नाहीसा होतो. प्रत्येक पंचमीला आणि विशेष करून नागपंचमीला येथे लोक नागाची प्रतिमा स्थापन करतात.

उमा वनातील उमाह्रदतीर्थात कार्तिक शुद्ध द्वादशीला स्नान करून उमा-महेश्वरांची केलेली पूजा सकल मनोरथ पूर्ण करते. श्रीविष्णूने कार्तिकी पौर्णिमेला आपले एक नेत्रकमल अर्पण करून शंकराची पूजा केली होती. तिची आठवण म्हणून श्रीवेंकटरमण क्षेत्रपालाची पूजा भाविक लोक मोठ्या निष्ठेने करतात.

इंद्रेश्वराला अभिषेक करून त्याची धारा समुद्राला मिळाली तर चांगला पाऊस पडतो असा समज आहे. ह्याच देवेंद्रतीर्थाला कोणी ' रावणाची

लघुशंका ' म्हणतात !

पांडव वनवासात असता गोकर्णक्षेत्री शतशृंग पर्वतावर चार वर्षे राहिले होते. त्यांची गुहा येथे दाखवितात. दुर्गाकुंड आणि भद्रकाली हे विष्णु-मायेचे स्थानही प्रेक्षणीय आहे.

ह्याखेरीज ह्या गोकर्णक्षेत्रात अनेक तीर्थे, पवित्र स्थळे, पुण्यस्थळे आहेत. जटायूतीर्थ, वेदेश्वर, गायत्री, शाल्मलीगंगा वगैरे अनंत स्थळे आहेत. त्या सर्वांचे स्नान, दर्शन व स्मरण पुण्यकारकच आहे. येथे आलेले यात्रेकरू शक्य तेवढी स्थळे पाहतो. सर्वजण मुंडण करून घेतात आणि गोकर्ण क्षेत्राची यात्रा सफल करतात.

" यदा प्राप्नोति गोकर्णं यो वा का वाऽपि मानवः ।
मुंडनं चोपवासं च श्राद्धं कुर्याच्च भक्तितः ॥ "

आदिगोकर्ण, गुहातीर्थ, ताम्रगौरी, गायत्री, कोटितीर्थ, ब्रह्मकुंड, रामतीर्थ आणि संगम ह्या अष्टतीर्थात यात्रेकरूने स्नाने करून श्रीमहाबळेश्वराची पूजा करावी म्हणजे यात्रा सफल होते. असा प्रघात आहे.

रामतीर्थ हे स्थान तर अत्यंत रमणीय स्थळ आहे. गोड्या पाण्याचा झरा सतत रामकुंडात वाहत असतो. ते स्थळ समुद्रकाठी आहे. जवळच टेकडीवर भरताचे सुंदर मंदिर आहे. येथील मूर्ती प्रेक्षणीय आहे.

गोकर्ण महाबळेश्वर हे ज्योतिर्लिंग नाही, ते आत्मलिंग आहे. त्याचा महिमा विशेष आहे. रावणाने बळ लावून पिळलेल्या ह्या लिंगाचे तुकडे फेकले; ते चार दिशांना शेजेश्वर, गुणवतेश्वर, मुरडेश्वर आणि धारेश्वर असे चार आणि मूळचे आत्मलिंग मिळून ही पंचक्षेत्री आहे.

हे आत्मलिंग गंडकी शिळेत झाकलेले असते. चाळीस वर्षांनी शुभ शकुन झाल्यावर वरची पिंडी काढून मूळ आत्मलिंग उघडे करतात, आणि रावणाच्या अंगुलिमुद्रा असलेले ते गोकर्ण लिंग सर्वांच्या दर्शनासाठी खुले ठेवतात. त्या वेळी तेथे भयंकर गर्दी असते ! नंतर त्यावर नवा

बंध घालून मोती वाटून त्यांच्या चूर्णाने अष्टबंध करतात. हा अष्टबंध महोत्सव फारच थाटाचा होत असतो. प्रत्येक वर्षी महाशिवरात्रीला थाटाची पूजा होते. आणि नंतर रथोत्सवही केला जातो. गोकर्ण महाबळेश्वराच तो रथ फारच भव्य, प्रचंड आणि सुंदर आहे.

बंगळूरहून हुबळी आणि हुबळीहून गोकर्ण किंवा समुद्रमार्गे कारवार व कारवारहून गोकर्ण असा या क्षेत्राला जाण्याचा सुलभ मार्ग आहे.

गोकर्ण महाबळेश्वराचे मंदिर भव्य द्राविड शिल्पाचे आहे. सुमारे साठ फूट उंचीचे शिखर असून त्यावर अष्टदिक्पाल, नवनाग, दशावतार वगैरे सुंदर मूर्ती कोरलेल्या आहेत. हे मंदिर कर्नाटकामधील प्रसिद्ध जक्कणाचार्याने बांधले आहे असे म्हणतात.

मंदिरापुढील ६०×४० चा सभामंडप तुलव ब्राह्मणाने बांधलेला असून भोवती अग्रशाळाही बांधल्या आहेत. चंद्रशाळेचे बांधकाम मात्र अपूर्णच आहे. सर्वच काम अत्यंत भव्य आणि सुंदर असे आहे!

एकंदरीने पाहता हे शिवक्षेत्र, सिद्धिक्षेत्र किंवा मुक्तिक्षेत्र म्हणून विशेष प्रसिद्ध असून कालिदास, शंकराचार्य, हरिहर बुक्क आणि शिवछत्रपती, वगैरे थोर लोकांनी ह्या क्षेत्राचे महत्त्व मानले होते. देवी अहिल्याबाईंनी येथे अन्नछत्र स्थापले. अशा ह्या पुण्यक्षेत्राची यात्रा प्रत्येक भाविकाने केली तर त्याच्या जन्माचे सार्थकच होईल! कारण म्हटलेच आहे :

गोकर्ण तैशी महाकाशी, विश्वेश्वर महाबल ।
कोटितीर्थ तशी गंगा, समुद्राचे अधिक फल ॥

♧

४

बाहुबली

म्हैसूर राज्यात श्रवणबेळगोळ येथे दिगंबर जैनांचे महान तीर्थक्षेत्र आहे. त्या ठिकाणी गोमटेश्वर बाहुबलीची अतिप्रचंड मूर्ती आहे.

चंद्रगिरीच्या अत्यंत मनोहर तपोभूमीवर हजारो श्रमण तपसाधनेत आणि ज्ञानसाधनेत कालक्रमणा करीत असतात.

चंद्रगिरी आणि इंद्रगिरी किंवा विंध्यगिरी यांच्यामध्ये बेळकोळ म्हणजे धवल जलाशय आहे. त्या तीर्थाचा परिसर म्हणजे दिगंबर जैनांचे श्रद्धास्थान आहे. लाखो यात्रेकरू त्या स्थळी येऊन पावन होतात. तेथील विंध्यगिरीच्या माथ्यावर श्री बाहुबलीची भव्य मूर्ती आहे. हा विंध्यगिरीचा माथा म्हणजे एकसंध, प्रचंड, नव्हे अतिप्रचंड अशी शिळ वाटते. टेकडीच्या पायथ्यास पोचल्यावर, पायथ्याच्या प्रवेशद्वारातून आत जाताच या प्रचंड शिळेची कल्पना येते. या शिळेतून दोन अडीच फूट लांबी रुंदीच्या पायऱ्या फोडून काढून रस्ता तयार केला आहे. जवळ-जवळ सात आठशे पायऱ्या आहेत. पायऱ्या चढून जात असताना तांबूस पांढऱ्या रंगाची ही प्रचंड शिळा भोवताली असलेली दिसते.

पायऱ्या चढून जात असताना भोवताली, मागे वळून पाहिल्यावर पायथ्याला बसलेले गाव व त्यातील बांधून काढलेला तो धवल जलाशय

दिसतो आणि भोवतालच्या टेकड्यांवर नजर फिरते. हत्तीच्या आकाराच्या प्रचंड शिळा या टेकड्यांवर घडलेल्या आहेत. आणि मनात उगीचच शंका येते की यांतील एखादी शिळा गडगडली तर?

पायऱ्या चढत चढत मुख्य मंदिराच्या प्रवेश द्वारी पोचल्यावर सुद्धा प्रत्यक्ष मूर्तीची भेट होत नाही. पुन: अनेक पायऱ्यांची चढण चढून निरनिराळ्या प्रवेश-द्वारांतून आत जावे लागते.



गोमटेश्वराचा प्रचंड पुतळा

अगदी शेवटच्या प्रवेशद्वारातून आत गेल्यावर आपणाला काय दिसते? बाहुबलीच्या मूर्तीची फक्त पावले! आणि प्राकारात आल्यावर आकाशातील चांदणीकडे पाहावे तसे वर पाहताच त्या प्रचंड मूर्तीचे दर्शन घडते. या प्रचंड शिल्पापुढे उभे राहणारा माणूस स्वत:चे क्षुद्रत्व आणि मूर्तीचे विशालत्व यांनी भारून जातो. विशाल छाती, आजानु बाहू, शांत चेहरा, त्यावर किंचित स्मित, अर्धवट उघडलेले नेत्र यांचा प्रेक्षकांच्या मनावर विलक्षण प्रभाव पडतो, व या शिल्पाचा शिल्पकार परमेश्वरी प्रेरणेनेच एवढी विशाल मूर्ती घडविता झाला असला पाहिजे याची मनोमन खात्री पटते.

भोवतालच्या ओवऱ्यांतून जिन्याने धाब्यावर जाता येते व पुन: एकदा भोवतालचा विशालपणा दृष्टीस पडतो आत दृष्टी वळवली तर

बाहुबलीच्या प्रचंड मूर्तीची उंची थक्क करते. तसा भव्य गोमटेश्वराचा पुतळा इतरत्र कोठेही नाही.

समुद्रसपाटीपासून सुमारे साडेतीन हजार फूट उंचीच्या टेकडीवर उभ्या असलेल्या एक प्रचंड शिळेतून बाहुबलीची अवाढव्य मूर्ती कोरलेली आहे. तिची उंची अठावन्न फूट आहे. त्या मूर्तीच्या प्रत्येक पावलाची लांबी सव्वाआठ फूट असून पायाचे अंगठे पावणेतीन फूट लांबीचे आहेत. मांड्यापर्यंतच्या भागाला मागील खडकाचा आधार आहे.

गोमटेश्वराची मूर्ती पाषाणकमलावर उभी असून तिचे सर्व अवयव रेखीव कोरलेले आहेत. या प्रचंड मूर्तीचे दोन्ही हात सरळ खाली सोडलेले, बोटे मोकळी, अशी ती दिगंबर मूर्ती आहे. छातीचा भाग रुंद आणि भव्य आहे. पायापासून दंडापर्यंत माधवी लतेचे वेष्टन आहे. तिच्या वेढ्यांची कलाकुसर नाजुक आणि प्रेक्षणीय आहे. सपाट पाठ, मुखावर मंद स्मित, अर्धवट उघडे डोळे, विशाल भालप्रदेश अशी त्या मूर्तीची घडण आहे. शांतता, ज्ञान आणि वैराग्य यांच्या त्रिवेणी तेजाने ओथंबलेली बाहुबलीची ती विशाल मूर्ती आज किती तरी वर्षे उघड्यावर उन्हापावसाचे व वाऱ्यावादळाचे आघात सहन करीत उभीच्या उभी आहे! भारताच्या शिल्पस्थापत्याची ती विजयध्वजाच आहे!

इतकी प्रचंड, विशिष्ट घडणीची आणि भावनांनी भारावलेली मूर्ती जगात अन्यत्र कोठेच नाही. ह्या मूर्तीमुळे श्रवणबेळ गोळ ह्या तीर्थक्षेत्राला एक आगळेच महत्त्व प्राप्त झालेले आहे. ते महत्व जाणून घेण्याची जिज्ञासा प्रत्येक यात्रेकरूला आणि प्रवाशाला असते.

बाहुबलीची ही एवढी महाकाय मूर्ती याच श्रवणबेळगोळ ठिकाणी कोणी आणि का उभारली ह्या प्रश्नांच्या मागे मोठा भावनात्मक इतिहास आहे. वेणूर, कारकाळ, कोल्हापूरजवळच्या कुंभोजगिरी येथील बाहुबलीच्या मूर्तीपेक्षा येथील गोमटेश्वर पुतळ्याला आहेच तसे वेगळे महत्त्व!

त्याचे असे झाले. नाभिराजा आणि मेरुदेवी यांच्या पोटी श्रीविष्णूने ऋषभदेवाच्या रूपाने जन्म घेऊन प्रजेचे उत्तम पालनपोषण केले. त्यालाच पुरुदेव किंवा आदिनाथ हे नाव होते. जैन लोकांचा तो पहिला तीर्थंकार मानला जातो.

यशस्वती राणीचा भरत आणि सुनंदा राणीचा बाहुबली हे ऋषभदेवाचे दोन सुपुत्र अनुक्रमे अयोध्या आणि तक्षशिलेजवळील पोद्दनापूर येथे राज्य करीत होते. ते दोघेही उत्तम राजे म्हणून प्रसिद्ध होते.

भरताचा पराक्रम पाहून सर्व राजे त्याला शरण आले होते. पण बाहुबलीला जिंकल्याशिवाय भरताला सम्राटपद लाभले नसते. म्हणून भरताने बाहुबलीशी युद्ध पुकारले. त्या दोघा भावांचे दृष्टियुद्ध, मुष्टियुद्ध, गदायुद्ध, मल्लयुद्ध वगैरे अनेक प्रकारचे युद्ध झाले. त्यात बाहुबलीने भरताचा पराभव केला आणि शेवटी भरताला चक्रवर्तिपद मिळण्याऐवजी बाहुबलीच सम्राट बनला. भरताचा गर्व उतरला. बाहुबली विजयी झाला.

एके दिवशी बाहुबलीने विचार केला की, “ ज्या राज्यामुळे अथवा ज्या संपत्तीमुळे माणसामाणसांतच काय पण प्रत्यक्ष भावाभावांतही वैर उत्पन्न होते, त्या राज्याचा अथवा त्या संपत्तीचा उपयोग काय ? ” शेवटी बाहुबलीने त्या राज्याचा आणि संपत्तीचा त्याग केला. सम्राटपदाच्या सिंहासनावरून उतरून त्याने वनवास पत्करला. त्याने गृह, संपत्ती, संसार वगैरे सर्वस्वाचा त्याग केला आणि सतत ध्यान–चिंतनात तो मग्न झाला. “ जन्ममृत्यूच्या फेऱ्यात गुंतून, स्वार्थांध होऊन, ऐश्वर्योपभोगाच्या मागे लागून प्रत्येक मानव शेवटी इतरांबरोबर आपलाही घात करून घेतो, त्याला खरे ज्ञान प्राप्त होतच नाही. ” ते खरे ज्ञान आपणांस प्राप्त व्हावे म्हणून बाहुबलीने अन्नपाण्याचा त्याग करून उग्र तप आरंभिले. तो एका जागी निश्चल उभा राहिला. त्याने आपली सर्व हालचाल बंद केली.

भरताला ही वार्ता कळाली. तेव्हा तो पिता ऋषभदेवाकडे गेला. त्या वेळी ऋषभदेव रानात परमहंस वृत्तीने राहत होते. ते भरताला म्हणाले, " बाहुबलीने जे केले ते अध्यात्म आणि परमार्थ या दृष्टींनी योग्यच आहे. पण अद्यापही त्याच्या मनात ' मी आणि तू ' चा किंतु आहे ! ती द्वैताची भावना नष्ट होईल, तेव्हाच त्याला खरे ज्ञान प्राप्त होईल आणि नंतरच तो मोक्षाचा धनी होईल ! "

नंतर भरत आपल्या ब्राह्मी आणि सुंदरी ह्या दोन ब्रह्मवादीनी भगिनींसह थेट बाहुबलीकडे गेला. त्या बहिणी बाहुबलीला म्हणाल्या, " बंधुराया, मोहरूपी हत्तीवरून खाली उतरा, द्वैतभावनेचा छंद सोडा म्हणजे आपण केवलज्ञानी व्हाल आणि त्यानंतर जगाचे कल्याण करण्याचा अधिकार तुम्हांला प्राप्त होईल ! जीव, जन आणि जग यांच्या ऐक्याचा ज्ञानी तो केवल ज्ञानी बनतो. तोच सर्वांचा उद्धार करून सर्वत्र मंगल करतो ! "

ब्राह्मी-सुंदरींचा तो ब्रह्मोपदेश ऐकून त्या तपस्वी बाहुबलीला परमसंतोष झाला. त्याच्या मनातील सर्व किन्तु सरले, भेदभाव हटले आणि त्याने अर्धवट डोळे उघडून ह्या जगाकडे पाहिले. त्याबरोबर चमत्कार असा झाला की, बाहुबलीच्या भोवती केवलज्ञानाचा दिव्य प्रकाश पसरला आणि त्याचा जीव शिवात विलीन झाला. तो मुक्त झाला.

त्या केवलज्ञानी बाहुबलीच्या दिगंबर मूर्तीचे दर्शन घेऊन सर्व लोक पावन झाले. नंतर भरताने त्या बाहुबलीची एक विशाल सुवर्णमूर्ती बनवून पोदनापुरानजीक अरण्यात स्थापन केली.

अनेक वर्षे लोटली. बाहुबलीच्या त्या मूर्तीभोवती सापानागांची वारुळे वाढली. भोवती दाट अरण्य वाढले. वेलींच्या जाळ्यांनी ती मूर्ती वेष्टून टाकली. त्या ठिकाणी जाऊन त्या मूर्तीचे दर्शन घेणे दुरापास्त झाले. लोकांनी बाहुबलीच्या कथेवर अनेक दंतकथा रचल्या ! बाहुबलीची स्मृती पिढ्यान्‌पिढ्या कायम राहिली, कीर्ती वाढत गेली.

इसवी सनाच्या दहाव्या शतकात म्हैसूर येथे सत्यवाक्य राजमल्ल नावाचा गंगवंशीय राजा राज्य करीत होता. त्याचा प्रधान व सेनापती चामुंडराय हा धार्मिक वृत्तीचा असून मोठा मातृभक्त होता.

" पोद्दनापूरच्या जंगलातील भरताने जी बाहुबलीची मूर्ती स्थापिली होती, ती शोधून काढून तिची चांगल्या ठिकाणी स्थापना करावी आणि त्या मूर्तीचे आपणास नित्य दर्शन घडावे " अशी इच्छा चामुंडरायच्या आईने दर्शविली. तिला त्या विशेष मूर्तीचा ध्यासच लागला.

मातेची ती इच्छा पूर्ण करण्यासाठी तो सुपुत्र चामुंडराय म्हैसूरहून पोद्दनापूरकडे निघाला. पण श्रवणबेळगोळच्या चंद्रगिरीने त्याला अडविले. त्या विशेष स्थानापलीकडे त्याला जाताच येईना! जणू काय तो महान श्रेष्ठ श्रमण बाहुबली त्या रम्य श्वेतकुंडाजवळील गिरीगव्हरात स्वतःच येऊन उभा राहिला होता. अदृश्य रूपाने तो चामुंडरायाला सांगत होता की, " थांब! मी येथेच आहे! मी येथेच आहे! "

चामुंडरायाने नंतर त्या बाबतीत आपल्या अरिष्टनेमी मुनी नावाच्या गुरुजींचा विचार घेतला आणि त्यांच्या सांगण्यावरून तो तेथेच चंद्रगिरी पर्वतावर चढला. तेथून त्याने समोरच्या विंध्यगिरीवर सोन्याचा एक बाण मारला. तोच काय आश्चर्य!

इंद्रपुरी टेकडीवरील ज्या उभ्या शिळेला तो बाण लागला त्या शिळेत बाहुबलीच्या प्रचंड मूर्तीचा साक्षात्कार त्याला झाला. लगेच त्याने नामांकित शिल्पकार आणवून त्या शिळेत बाहुबलीचे मस्तक, छाती. भुजा मांड्या आणि चरणकमल कोठे कोठे आहेत ते त्यांना दाखविले. शिल्पकारांनी ते सर्व नीट लक्षात घेऊन त्या शिळेतून बाहुबलीची विशाल मूर्ती शोधून काढली आणि चामुण्डरायाचे कार्य पूर्ण केले.

हे काम संवत १०२८ चैत्र शुद्ध पंचमी रविवारी पूर्ण झाले. त्या दिवशी त्या भव्य मूर्तीला प्रथमच संपूर्ण महामस्तकाभिषेक करण्यात आला

आणि ती मूर्ती सर्वांच्या दर्शनासाठी प्रगट केली गेली.


बाहुबलीच्या या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्याच्या वेळी पय, दधी, घृत, मधू, शर्करादि पंचामृताचा अभिषेक करण्यासाठी हजारो घागरी भरून आणल्या. साठ फूट उंचीच्या त्या मूर्तीवर मस्तकाभिषेक करण्यासाठी सभोवती उंच पहाड रचण्यात आले. त्या पहाडावरून त्या मूर्तीच्या मस्तकावर पंचाममृतांचे हजारो घडे ओतले. पण काय आश्चर्य ! पंचामृताच्या धारा मूर्तीच्या कमरेपर्यंतच येऊन सुकल्या. त्या धारा पायांपर्यंत ओघळून आल्याच नाहीत !

हे असे का झाले ? याचे सर्वांना विलक्षण कोडे पडले. चामुण्डराय तर दिङ्मूढ होऊन बसला. इतक्यात आणखी एक नवल घडले. पाठीला पोक आला आहे, अंग सुरकतलेले आहे, अशी एक म्हातारी हातात वांग्याच्या आकाराची एक छोटी लोटी घेऊन तेथे आली. ती म्हणाली, " चामुण्डराया, मला हे माझे थोडेसे दूध त्या बाहुबलीच्या मस्तकावर घालू दे ! माझी एवढी इच्छा पूर्ण करू दे. माझी ही सेवा त्या देवाला पावू दे. "

चामुंडराय हसला. तो मनाशीच म्हणाला, " जगात कोठेही नाही, एवढी ही बाहुबलीची प्रचंड मूर्ती मी बनविली आहे. हजारो घागरी ओतल्या तरी त्या मूर्तीच्या मस्तकापासून त्यांचे ओघळ फक्त कमरेपर्यंतच येऊ शकले ! अशा ह्या प्रकारात या म्हातारीने आणलेले हे एवढेसे दूध काय करणार ! पण हिची तरी इच्छा का मोडावी ! ही म्हातारीही माझ्या आईसारखीच नाही का ? "

म्हातारीला परवानगी मिळाली. ती त्या पहाडावर चढली. बाहुबलीच्या मस्तकावर तिने आपली दुधाची लोटी उपडी केली. तोच केवढे आश्चर्य ! त्या सर्व पंचामृतांच्या धारा थेट त्या मूर्तीच्या पावलांपर्यंत ओघळू लागल्या. इतकेच नाही, तर त्या मूर्तीला आपादमस्तक

न्हाऊन काढून त्या श्वेतधारांचे लोंढे वाहत वाहत पर्वताखाली गेले आणि त्यांचे एक विस्तीर्ण श्वेतकुंड तयार झाले. चामुंडरायाचा गर्व वाहत गेला. म्हातारीच्या सेवेचे सार्थक झाले. तिची इच्छा पूर्ण झाली.



चामुंडराय बस्ती, श्रवणबेळगोळ

वांग्याच्या आकाराचे भांडे हातात घेऊन आलेली ती म्हातारी प्रत्यक्ष कुष्मांडिनी–पद्मावती देवीच होती. महामस्तकाभिषेकाच्या त्या प्रथम समारंभाच्या वेळी घडलेल्या त्या घटनेची आठवण म्हणून चामुंडरायाने बाहुबलीच्या तोरणदाराशी त्या म्हातारीची मूर्ती कोरून ठेवली आणि तो तिचा अंशतः उतराई झाला. अद्यापही ती मूर्ती तेथेच आहे.

एका अखंड दगडातून कोरून काढलेल्या ' बागळ् 'वर (दरवाजावर) पद्मासन घालून बसलेली लक्ष्मी आणि तिच्यावर सोंडेतून पाण्याचे घडे ओतून अभिषेक करणारे दोन प्रचंड हत्ती अशी गजान्त लक्ष्मीची सुंदर मूर्तीही कोरलेली आहे. आणखी एके ठिकाणी लक्ष्मीच्या एका बाजूला हत्ती व दुसऱ्या बाजूला सवत्स धेनू कोरलेली आहे.

आणि ती मूर्ती सर्वांच्या दर्शनासाठी प्रगट केली गेली.


बाहुबलीच्या या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्याच्या वेळी पय, दधी, घृत, मधू, शर्करादि पंचामृताचा अभिषेक करण्यासाठी हजारो घागरी भरून आणल्या. साठ फूट उंचीच्या त्या मूर्तीवर मस्तकाभिषेक करण्यासाठी सभोवती उंच पहाड रचण्यात आले. त्या पहाडावरून त्या मूर्तीच्या मस्तकावर पंचाममृतांचे हजारो घडे ओतले. पण काय आश्चर्य ! पंचामृताच्या धारा मूर्तीच्या कमरेपर्यंतच येऊन सुकल्या. त्या धारा पायांपर्यंत ओघळून आल्याच नाहीत !

हे असे का झाले ? याचे सर्वांना विलक्षण कोडे पडले. चामुण्डराय तर दिङ्मूढ होऊन बसला. इतक्यात आणखी एक नवल घडले. पाठीला पोक आला आहे, अंग सुरकतलेले आहे, अशी एक म्हातारी हातात वांग्याच्या आकाराची एक छोटी लोटी घेऊन तेथे आली. ती म्हणाली, " चामुण्डराया, मला हे माझे थोडेसे दूध त्या बाहुबलीच्या मस्तकावर घालू दे ! माझी एवढी इच्छा पूर्ण करू दे. माझी ही सेवा त्या देवाला पावू दे. "

चामुंडराय हसला. तो मनाशीच म्हणाला, " जगात कोठेही नाही, एवढी ही बाहुबलीची प्रचंड मूर्ती मी बनविली आहे. हजारो घागरी ओतल्या तरी त्या मूर्तीच्या मस्तकापासून त्यांचे ओघळ फक्त कमरेपर्यंतच येऊ शकले ! अशा ह्या प्रकारात या म्हातारीने आणलेले हे एवढेसे दूध काय करणार ! पण हिची तरी इच्छा का मोडावी ! ही म्हातारीही माझ्या आईसारखीच नाही का ? "

म्हातारीला परवानगी मिळाली. ती त्या पहाडावर चढली. बाहुबलीच्या मस्तकावर तिने आपली दुधाची लोटी उपडी केली. तोच केवढे आश्चर्य ! त्या सर्व पंचामृतांच्या धारा थेट त्या मूर्तीच्या पावलांपर्यंत ओघळू लागल्या. इतकेच नाही, तर त्या मूर्तीला आपादमस्तक

न्हाऊन काढून त्या श्वेतधारांचे लोंढे वाहत वाहत पर्वताखाली गेले आणि त्यांचे एक विस्तीर्ण श्वेतकुंड तयार झाले. चामुंडरायाचा गर्व वाहत गेला. म्हातारीच्या सेवेचे सार्थक झाले. तिची इच्छा पूर्ण झाली.




चामुंडराय बस्ती, श्रवणबेळगोळ

वांग्याच्या आकाराचे भांडे हातात घेऊन आलेली ती म्हातारी प्रत्यक्ष कुष्मांडिनी–पद्मावती देवीच होती. महामस्तकाभिषेकाच्या त्या प्रथम समारंभाच्या वेळी घडलेल्या त्या घटनेची आठवण म्हणून चामुंडरायाने बाहुबलीच्या तोरणदाराशी त्या म्हातारीची मूर्ती कोरून ठेवली आणि तो तिचा अंशतः उतराई झाला. अद्यापही ती मूर्ती तेथेच आहे.

एका अखंड दगडातून कोरून काढलेल्या ' बागल् 'वर (दरवाजावर) पद्मासन घालून बसलेली लक्ष्मी आणि तिच्यावर सोंडेतून पाण्याचे घडे ओतून अभिषेक करणारे दोन प्रचंड हत्ती अशी गजान्त लक्ष्मीची सुंदर मूर्तीही कोरलेली आहे. आणखी एके ठिकाणी लक्ष्मीच्या एका बाजूला हत्ती व दुसऱ्या बाजूला सवत्स धेनू कोरलेली आहे.

गोमटेश्वर बाहुबलीच्या प्रचंड मूर्तीजवळच वारुळासारखे उंचवटेही आहेत. ती मूर्ती इतकी प्रचंड आहे की दर्शनार्थी माणूस भारावूनच जातो.



पार्श्वनाथबस्ती, श्रवणबेळगोळ

बाहुबलीच्या मूर्तीच्या पायापाशी छत्रचामरधारी सहा फूट उंचीच्या दोन सुंदर मूर्ती आहेत. त्यांपैकी उजवीकडील यक्षाची आणि डावीकडील यक्षिणीची असून त्या मूर्ती अत्यंत रेखीव आहेत.

बाहुबली मूर्तीच्या पायाशीच शिळेवर "चामुंडरायें करवियलें" आणि "गंगरायसुत्तालें करवियलें" ही दोन वाक्ये जुन्या नागरीलिपीत कोरलेली आहेत. मराठी भाषेतील हाच पहिलाच शिलालेख मानला जातो; म्हणून याला विशेष मान देण्यांत येतो. कानडी मुलुखात मराठी भाषेचा हा आद्यशिलालेख मोठा ऐतिहासिक चिंतनाचा विषय आहे.

बाहुबलीच्या प्रचंड मूर्तीची संपूर्ण पूजा रोज करणे अशक्यच म्हणून सव्वा आठ फूट लांबीच्या पावलांचीच पूजा रोज करतात. अंगठ्याला फुले वाहून आरती करतात. मात्र मूर्तीला दर बारा पंधरा वर्षांनी संपूर्ण

महामस्तकाभिषेक करतात त्या वेळी लाखो रुपये खर्च करतात. त्या वेळी जैनांचा प्रचंड मेळावा ह्या ठिकाणी भरतो. तो सोहळा प्रेक्षणीय असतो.

बाहुबलीच्या मूर्तीसमोरील चंद्रगिरी ह्या टेकडीवर भद्रबाहूची गुंफा, ब्रह्मस्तंभ, मानस्तंभ आणि अनेक शिलालेख आहेत. चामुंडराय बस्ती, पार्श्वनाथ बस्ती, चंद्रगुप्त बस्ती, शासन बस्ती, शांतीनाथ बस्ती वगैरे अनेक प्रेक्षणीय मंदिरे आहेत.

याच ठिकाणी उत्तर भारतातील राजा चंद्रगुप्त याने जैनपंथ स्वीकारून तपसाधना केली होती, असे म्हणतात. चंद्रगिरीचा परिसर म्हणजे दिगंबर जैनांची स्वर्गभूमीच आहे. शांतीनाथबस्ती (मंदिर) मधील मूर्ती अकरा फूट उंचीची काळ्या पाषाणाची असून ती फारच सुंदर आहे. जवळच भरतेश्वराची मूर्ती नऊ फूट उंचीची पण अपूर्ण अशी आहे. त्या मूर्तीचे वैशिष्ट्य असे की तिच्यावर कोठेही आघात केला तर त्या मूर्तीमधून एक प्रकारचा कर्णमधुर आवाज निघतो.

बाहुबलीच्या दर्शनासाठी जाणारा प्रत्येक यात्रेकरू ह्या चंद्रगिरीच्या आसमंतात रमून जातो आणि तेथे त्याला खरे समाधान मिळते.

८

द्वारका

अयोध्या मथुरा माया काशी कांची अवंतिका ।
पुरी द्वारावती चैव सप्तैते मोक्षदायिका ॥

ज्यांच्या निवासामुळे, दर्शनामुळे, स्मरणचिंतनामुळे मोक्ष मिळतो अशा सात ' पुरी ' तीर्थक्षेत्रांमध्ये द्वारकापुरी हे अत्यंत पुण्यपावन असे तीर्थक्षेत्र आहे.

हिंदुस्थानच्या चारी धाम यात्रेत द्वारकेला महत्त्वाचे स्थान आहे. श्री शंकराचार्यांनी भरतखंडामध्ये जी चार पीठे स्थापन केली, त्यांपैकी एक श्रेष्ठ हिंदुधर्मपीठ द्वारकेला आहे. त्याला ' शारदा मठ ' म्हणतात.

सौराष्ट्र म्हणजे चांगला देश. नद्या, स्त्रिया, घोडे, सोमनाथ आणि द्वारका अशा पाच रत्नांचा सौराष्ट्र हा देश आहे; असे सौराष्ट्राचे वर्णन प्राचीन काळी केले आहे. या पाच रत्नांपैकी सुवर्णनगरी द्वारका ही श्रीकृष्णांनी वसविली.

द्वारका हे क्षेत्र भारताच्या पश्चिम बाजूचे महत्त्वाचे द्वार आहे. ते नाक्याचे आणि मोक्याचे ठिकाण आहे. पश्चिम समुद्राच्या उत्तरकडील महत्त्वाचे बंदर म्हणून द्वारका प्रसिद्ध आहे.

मथुरेच्या बंदीशाळेत वसुदेव-देवकीचा पुत्र म्हणून भगवान

श्रीकृष्णाने जन्म घेतला. जन्मतःच पडत्या पावसात त्या बालकृष्णाला गोकुळात जावे लागले. तेथे नंद-यशोदेने त्याला वाढविले.

मथुरेच्या दुष्ट कंसमामाला श्रीकृष्णाने ठार मारले आणि आपल्या माता-पित्यांची कारागृहातून सुटका केली. कंसाचा सासरा मगधाधिपती जरासंध याने मथुरेवर हल्ला केला, पण कृष्ण-बलरामांनी त्याला पिटाळून लावले.

जरासंधाने नंतर सतरा वेळा मथुरेवर हल्ले केले. त्यामुळे मथुरेची जनता हवालदिल झाली. "नको हा युद्धाचा त्रास," म्हणून मथुरा सोडून दुसरी-कडे जाण्याचा आग्रह लोकांनी चालविला. तेव्हा श्रीकृष्णाने यादवांची नवी राजधानी म्हणून द्वारका पसंत केली.

श्रीकृष्णाच्या आज्ञेने विश्वकर्म्याने पश्चिम समुद्राच्या काठावर एक नवीन सुंदर अशी नगरी बांधली. राजधानीच्या त्या नव्या वास्तूला श्रीकृष्णाने नाव दिले द्वारका!

विश्वकर्म्याने जी द्वारका वसविली, तिच्यात सोन्याचांदीचे मोठमोठे महाल, रत्नखचित भिंती, ठिकठिकाणी हिऱ्यामोत्यांची नक्षी केलेली अशी अपूर्व वैभवसंपन्न आरास रचली होती. या नगरीला पोरबंदरच्या स्फटिका-सारख्या दगडांच्या भव्य भिंती होत्या आणि ह्या भक्कम तट होता. नगरप्रवेशासाठी चार दिशांना चार प्रचंड दरवाजे होते. त्यावरून या नव्या नगरीला "द्वारावती" हे नाव दिले होते.

मथुरेचे [illegible]ारिक नव्या राजधानीत राहण्यासाठी द्वारकेला आले, त्या वेळी त्यांचा त[illegible] ज्या स्थळी पडला आणि जेथे विश्वकर्म्याने श्रीकृष्णाचे स्वागत केले, त्या स्थळाला 'मूळद्वारका' असे म्हणतात. अद्यापही त्या मूळद्वारकेचे दर्शन घेण्यासाठी यात्रेकरू भक्तिभावाने जातात. त्या ठिकाणी खूप मंदिरे आहेत.

द्वारकेजवळच 'रैवतक' नावाचा पर्वत आहे. द्वारकेची जागा, रैवतक नावाच्या राजाच्या राज्यात होती. त्या राजाने आपली मुलगी

रेवती ही बळरामास दिली आणि तो स्वतः तपश्चर्येस गेला.

" रत्नाकरासन्निध सोन्याची द्वारका वसली. स्वतः भगवान श्रीकृष्ण आपल्या यादव कुटुंबियांसह तेथे राहू लागले." ही वार्ता सर्वत्र कळताच अनेक ऋषी मुनी द्वारकेच्या आसमंतात येऊन निर्भयपणे राहिले.

प्रभास क्षेत्र हे एक महान तपस्थान बनले. स्वतः चंद्राने तेथे तप करून शंकराला प्रसन्न करून घेतले. भगवान सोमनाथाच्या रूपाने श्रीशंकर तेथे राहू लागले. रैवतक पर्वताप्रमाणेच प्रभासतीर्थही यादवांचे आणि ऋषिमुनींचे आवडते यात्रास्थान बनले.

दुर्वास मुनी महाकोपिष्ट पण ते ह्या द्वारकेच्या दर्शनाने अत्यंत प्रसन्न झाले आणि तेही तेथेच राहू लागले. श्रीकृष्णाचा आतेभाऊ अर्जुन हा अत्यंत तेजस्वी पांडव, कृष्णाचा फार लाडका मित्र आणि भक्त. तो तीर्थयात्रा करीत करीत द्वारकेला आला, तेव्हा रैवतक पर्वतावर त्रिदंडी संन्यास घेऊन राहू लागला. श्रीकृष्णाने आपली बहीण सुभद्रा हिच्याशी त्याचा विवाह लावला. सुभद्राहरणाची कथा महाभारतात प्रसिद्ध आहे.


मावळतीचा सूर्यनारायण पश्चिम समुद्रात बुडी घेताना दररोज आपली सोनेरी किरणे द्वारकानगरीच्या सुवर्णकळसांवर उधळून ती सोन्याची द्वारका उजळून टाकतो आणि पश्चिम समुद्र तर द्वारावतीचे चरण अहोरात्र धुऊन काढतो. त्या वेळी लाटांचा आवाज मृदंगासारखा घनगंभीर होतो आणि जणू काही त्या परमात्म्याच्या जयघोषांचे मंत्र चालू असतात.

निसर्गरम्य, सुरक्षित आणि वैभवशाली अशा ह्या द्वारकेत सम्राट श्रीकृष्ण सुखाने नांदत होता.

" विझले रत्नदीप नगरात,
आता जागे व्हा यदुनाथ "

असे म्हणून त्याच्या अष्टनायिका त्याला सुखशय्येवरून रोज पहाटे उठवीत.

राज्यकारभाराच्या गर्दीतही तो श्रीकृष्ण आपल्या दीन दरिद्री बाळमित्र सुदाम्यासारख्या पाहुण्यांचे यथोचित स्वागत करी. पांडवांचा कैवार घेऊन दुष्ट कौरवांचा नाश करण्यासाठी धाव घेई. दुर्योधन, शिशुपाल, जरासंध अशा महा दुष्टांचा नाश ह्याच द्वारकाधीशाने केला.



गोमतीघाट द्वारका

द्वारका म्हणजे व्यापाराचे केंद्र, द्वारका म्हणजे बलिष्ठ राजधानी आणि द्वारका म्हणजे पुण्यक्षेत्र अशी होती द्वारकापुरी!

नरकासुरासारख्या दुष्टाला मारण्यासाठी श्रीकृष्णाला थेट कामरूप देशाला जावे लागले. जरासंधाचा वध करण्यासाठी मगधाचा प्रवास करावा लागला. कौरवांच्या नाशासाठी हस्तिनापुराकडे जावे लागले. अशा प्रकारे श्रीकृष्णाला द्वारका सोडून बराच काळ बाहेर राहावे लागले.

इकडे द्वारकेतील यादव सुख-विलासात राहत होते. त्यांना कशाचेही काही कमी नव्हते. त्यांना आपल्या वैभवाचा गर्व झाला. एकदा त्यांचा गर्व मारुतीने पार उतरून टाकला. तरीही यादव आपल्याच नादात

राहत होते. ऐश्वर्यमदाने मस्त झालेले यादव वीर इतर सर्वांना तुच्छ लेखू लागले. आणि मग त्यांच्यांत आपसांतील तंटेबखेडे, वैर वाढत चालले.

एकदा तर श्रीकृष्णाच्या सांब वगैरे मुलांनी काही ऋषिमुनींची थट्टा केली. त्या अपमानाचा बदला म्हणून त्या ऋषींनी यादव कुळाच्या नाशाचा शाप दिला. कौरवांची माता गांधारी हिनेही श्रीकृष्णाला वंशनाशाचा शाप दिला. त्या सर्व शापांच्या प्रभावाने आणि सर्व यादवांच्या अंदाधुंदीमुळे पुढे लौकरच तसे झाले.


प्रभास तीर्थाच्या यात्रेसाठी सर्व यादव गेले. त्या वेळी त्यांच्यांत यादवी माजली आणि मग भयंकर भांडणात त्यांनी तेथील लोहतृणाच्या पात्यांनी एकमेकांवर वार करून आपला सर्वनाश करून घेतला. भगवान श्रीकृष्णाच्या अवतार समाप्तीसंबंधी एक दंतकथा अशी आहे : भगवान श्रीकृष्ण म्हणजे विष्णूचा आठवा अवतार. सातव्या म्हणजे प्रभू रामचंद्राच्या अवतारात त्यांनी सुग्रीवाचा भाऊ वाली याचा वध केला. "मी आपला कोणताही अपराध केला नसताना तुम्ही झाडाआड्न माझ्यावर शरसंधान का बरं केलंत !" वालीने विचारले.

प्रभू म्हणाले, "तुला मारण्यात मी माझं कर्तव्य केलं ! या जन्मी मी तुझा वध केला आहे; पुढील जन्मी ही संधी तुला प्राप्त होईल."

अशा प्रकारे वालीचा शेवट झाला. पुढे कृष्णावतातील गोष्ट.

भारतीय युद्ध संपले. श्रीकृष्णही उदास बनले. यादवांचा वंश समूळ नष्ट झाला. ते पाहून श्रीकृष्ण जंगलात निघून गेले. तेथे एका झाडाखाली ते महासमाधी लावून बसले. त्या वेळी त्यांच्या उजव्या पायाचा अंगठा हरिणाच्या डोळ्याप्रमाणे चमकत होता. जरा नावाच्या भिल्लाने बाण सोडला. तो श्रीकृष्णाच्या त्या अंगठ्यात घुसला आणि तात्काळ श्रीकृष्णाचा देह खाली कोसळला. ते पाहून तो भिल्ल शोक करू लागला. तेव्हा भगवान श्रीकृष्णाने त्याला मागील जन्माची आठवण करून दिली. आणि

शोक न करण्याची विनंती केली. नंतर श्रीकृष्णाने आपला देह ठेवला. येथे जवळच असलेले "बाणतीर्थ" म्हणजे भगवान श्रीकृष्णाचे निर्वाणस्थळ होय. बेट द्वारकेजवळील वेरावळ बंदराजवळ हिरण्या, सरस्वती आणि कपिला ह्या तीन नद्यांच्या संगमाजवळ देहोत्सर्ग नावाचे पवित्र स्थळ आहे. याठिकाणी भगवान श्री कृष्णाच्या पार्थिव देहाला अग्नीसंस्कार करण्यात आला. या जागी एक विस्तीर्ण स्मारक बांधण्यात येत आहे. सर्व लोक तेथे जाऊन त्या स्थळाचे दर्शन घेतात आणि भगवान श्रीकृष्णाचे स्मरण करतात.



जगन्मंदीर द्वारका

द्वारका क्षेत्रात आणि द्वारकेच्या परिसरात श्रीकृष्णाच्या अनेक आठवणी अद्यापही जपून ठेवल्या आहेत.

द्वारका हे शहर नाही. ते एक छोटेसे क्षेत्र आहे; पण जरुरीच्या सर्व जिनसा तेथे मिळतात. यात्रेकरू तेथे नित्य येत असतात. त्यांना उतरण्यासाठी तेथे मोठमोठ्या धर्मशाळा आहेत. सर्व सोयी आहेत. द्वारकेच्या सभोवती अद्यापही तट आहे. त्या तटातच द्वारका क्षेत्र आणि अनेक सुंदर मंदिरे आहेत.

दक्षिण बाजूला एक मोठा तलाव आहे. तो समुद्राच्या पाण्याने

सदोदित भरलेला असतो. या तलावाला गोमती तलाव म्हणतात. त्यात स्नान करणे हे मोठे पुण्यकृत्य मानतात. या तलावाला नऊ घाट बांधले आहेत. सरकारी घाटाजवळ जे कुंड आहे त्याला ‘ निष्पाप कुंड ’ असे म्हणतात. या कुंडात गोमतीतीर्थ आहे म्हणून प्रत्येक यात्रेकरू प्रथम याच कुंडात स्नान करतो आणि आपल्या पूर्वजांना पिंडदान करतो. नंतर बाकीच्या कुंडांत स्नान करून शुद्ध होतो आणि मग रणछोडजीच्या मुख्य मंदिराकडे दर्शनाला जातो.


वाटेत किती तरी मंदिरे आहेत गोमतीमाता, महालक्ष्मी कृष्ण वगैरेंची मंदिरे आणि दुतर्फा अनेक दुकाने यांच्या गर्दीतून वाट काढीत त्याला जावे लागते. द्वारकेचे श्रीकृष्ण मंदिर हे भारतातील अतिप्राचीन आणि महत्त्वाचे तीर्थक्षेत्र होय. हे श्रीकृष्ण मंदिर श्रीकृष्णाचा नातू वज्रनाभ याने बांधले. पाचव्या शतकात गुप्त राजांनी त्याची डागडुजी केली. इ. स. १४६० मध्ये सुलतान महंमद बेगडा याने ते फोडले. १८५७ मध्ये इंग्रजांनी ते उध्वस्त केले. त्यानंतर खंडेराव गायकवाड यांनी ते पुन: बांधले.

रणछोडजी म्हणजेच भगवान श्रीकृष्ण. त्याचे हे भव्य सुंदर मंदिर. द्वारकेचे प्रमुख पूजास्थान ! या मंदिरात लोकांची नित्य गर्दी असते. वारंवार घंटानाद होत असतात.

गाभाऱ्यात चांदीच्या सिंहासनावर चार फूट उंच अशी रणछोडजींची मूर्ती आहे. काळ्या तुळतुळीत दगडाची ती सुंदर मूर्ती पाहून भक्तगण हरखून जातो. देवाला उंची पीतांबर नेसवतात. हिऱ्यामोत्यांचे खूपच दागिने घालतात. सुवर्णाच्या अकरा माळा देवाच्या गळ्यात असतात.

शंख चक्र, गदा, पद्मविभूषित किरीटकुंडलांनी सुशोभित अशा त्या चतुर्भुज मूर्तीचे दर्शन घेऊन लोक फुले व तुळशी वाहतात. नंतर प्रदक्षिणा करतात. दोन भिंतीच्यामध्ये चिंचोळा असा प्रदक्षिणेचा मार्ग आहे. देवालयातील स्फटिकाची फरशी इतकी चमकदार आहे की, आरशाप्रमाणे

तीत आपले प्रतिबिंब दिसते. चौकटीवर चांदीचे पत्रे मढविले आहेत. छतावरून खाली सुंदर सुंदर हंड्या, झुंबरे लटकत आहेत. ह्या देवळाला सात मजले असून वर जाण्यासाठी प्रशस्त जिने आहेत. देवळाची एकंदर उंची सुमारे दीडशे फूट आहे.



रुक्मिणीमंदिर द्वारका

मेवाडची महाराणी मीरा श्रीकृष्णालाच आपला स्वामी मानीत होती. ती कृष्णवेडी भक्त मीरा रात्रंदिवस श्रीकृष्णाच्या भजन पूजनात आणि गाण्या-नाचण्यात मग्न असे. ती मेवाड सोडून गोकुळ-वृंदावनात गेली. नंतर द्वारकेत येऊन रणछोडजीच्या मंदिरात राहू लागली. मेवाडचे लोक तिला नेण्यासाठी आले, पण ती परमभक्त मीरा शेवटी याच मंदिरात कृष्णस्वरूपी विलीन झाली.

रणछोडजींच्या मंदिरासमोर जगमोहनचे देऊळ आहे. ते सुमारे शंभर फूट उंचीचे असून त्यालाही पाच मजले आहेत. साठ खांबांवरील हे सुंदर शिल्पाचे मंदिर अगदी प्रेक्षणीय आहे.

दुर्वास मंदिर आणि त्रिविक्रमाचे मंदिर ही दोन मंदिरे जवळच आहेत. त्रिविक्रमाला तेथे 'टिमकजी' असे म्हणतात. टिकमजीचे मंदिर अत्यंत वैभवशाली आहे. टिकमजीची मूर्ती तर अत्यंत मनमोहक असून ती सतत मौल्यवान वस्त्रालंकारांनी नटविलेली असते.

असे सांगतात कीं, कुश नावाच्या राक्षसाला मारण्यासाठी दुर्वास ऋषींनी पाताळात जाऊन बळीराजाकडून त्रिविक्रमाला येथे आणले होते. ते नंतर येथेच राहिले.

कुश राक्षसाचा नाश करून त्याला ज्या ठिकाणी पाताळात घातले तेथे त्या त्रिविक्रमाने महादेवाचे लिंग स्थापन केले. कुशेश्वर शंकराशेजारीच पार्वतीची मूर्ती आहे. ह्या महादेवाला तुपाचा अभिषेक आणि लाडवांचा नैवेद्य लागतो.

प्रद्युम्नमंदिर, अंबामाता आणि देवकीमाता यांची मंदिरे. राधा, रुक्मिणी, सत्यभामा, जाम्बवती ह्यांची मंदिरे; अशी किती तरी सुंदर मंदिरे येथे आहेत. त्यांत श्रीकृष्णाची आवडती राणी रुक्मिणी हिचे मंदिर प्रेक्षणीय आहे या मंदिरातील रुक्मिणीची मूर्ती सोन्याने मढविलेली आहे.

भारत सरकारच्या पुराणवस्तु संशोधन खात्याने द्वारकेतील प्रसिद्ध देवळांच्या जीर्णोद्धारासाठी पंचेचाळीस लक्ष रुपये खर्चाची एक योजना १९६४ मध्ये आखली आहे, अशी माहिती जीर्णोद्धार समितीचे अध्यक्ष श्री. डी के. लडवा यांनी जाहीर केली आहे. ही योजना तीन भागांत पुरी होईल आणि तिच्यासाठी दहा वर्षांचा काळ लागेल. द्वारकाधीश पुरुषोत्तम, देवकी, राधाकृष्ण, वेणी माधव आणि त्रिविक्रम या देवळांचा या जीर्णोद्धारात समावेश केलेला आहे.

भांडारखान्याजवळच श्रीमत् शंकराचार्यांचा शारदामठ आहे. ह्या शारदा मठात महान विद्वान पंडित राहतात. ते हिंदुधर्म संस्कृतीच्या संवर्धनाचे कार्य करतात.

ही सर्व स्थळे पाहून झाल्यावर यात्रेकरू गोमतीच्या तीरावर जातात. तेथील नऊ घाटांवरील सावलियाजी, गोवर्धननाथ यांची मंदिरे पाहून महाप्रभूच्या बैठकीचे दर्शन घेतात. वासुदेव घाटावरील हनुमानाच्या मंदिराला भेट देऊन शेवटी संगमघाटावर थांबतात. तेथे संगमनारायणाचे सुंदर मंदिर आहे. गोमती समुद्रसंगमाजवळील वाळवंटात सुंदर रंगीत शंख, शिंपले, कवड्या आणि चक्रे सापडतात. त्या पवित्र वस्तू आणून आपल्या घरी देवपाटात ठेवतात. संगम घाटाजवळच चक्रतीर्थ आणि रत्नेश्वर व सिद्धनाथ ही महादेवाची मंदिरे आहेत. जवळच एक ज्ञानकुंड नावाचे पवित्र तीर्थस्थान आहे.



रुक्मिणीमंदिरातील मूर्ती, द्वारका

जुन्या रामवाडीतील राम-लक्ष्मण-सीतेच्या मूर्ती अत्यंत सुंदर असून नवे राममंदिर, लक्ष्मण तलाव, कालीमाता, आशापुरीमाता, यांच्याही मूर्ती प्रेक्षणीय आहेत. द्वारका-प्रदक्षिणेत अशी कितीतरी स्थळे आहेत.

द्वारकेतील कैलास कुंडातील पाणी गुलाबी रंगाचे असते. त्याबद्दल

येथील लोक पुढील गोष्ट सांगतात. ही गोष्ट भागवत ग्रंथात आहे ती अशी :

एक होता राजा. त्याचे नांव नृग. तो मोठा दानशूर होता. यज्ञयाग अनेक प्रसंगी तर तो अनेक प्रकारचा दानधर्म करीच पण इतर प्रसंगीही त्याच्या दानात कधी खंड पडला नाही. म्हणून दान करणाऱ्याच्या मालिकेत त्याचे नाव श्रेष्ठ ठिकाणी झळकत असे.

त्या वेळेस दान गोधनाच्या रूपाने देण्यात येई. त्यातील गाई भरपूर दूध देणाऱ्या, सुंदर व कपिल वर्णाच्या असत. त्यांच्या शिंगांना सोन्याच्या शिंब्या आणि खुरास रुपेरी टोपणे बसविली जात. मोठ्या आदराने विधिपूर्वक त्या ब्राह्मणांस दिल्या जात.

हे ब्राह्मणही सदाचारसंपन्न, वैराग्यशील, शांतिमान; तसेच अध्यापन करण्यात दक्ष असेच होते. त्यामुळे दान देण्यात त्याला मोठे समाधान वाटे. तो इतरही दाने सर्वांना देई.

सोने, भूमी, रत्ने अश्व, रथ, वस्त्रे, घरे, भांडी, इत्यादी सर्व अवश्य वस्तू त्याच्या दानांत असत. शिवाय अन्नसंतर्पणेही नित्य चालत. कित्येक देवळेही तळी, विहिरीही त्याने लोकांना बांधून दिल्या. दान करणारा म्हणून नृगाची मोठी कीर्ती जगभर पसरली.

एकदा असाच दानधर्माचा विधी चालू होता. अनेक ब्राह्मणांना त्याने गाई दिल्या. इतक्यात एका ब्राह्मणाची गाय गोठ्यातून सुटून आली व नृगाच्या दान द्यावयाच्या गाईच्या कळपात मिसळली. ती गोष्ट नृगाच्या लक्षात येणे शक्य नव्हते. राजाने इतर गाईंच्या बरोबर त्या गाईचेही दान करून टाकले.

ज्याला दान दिले तो ब्राह्मण ती गाय घेऊन आपल्या घरी चालला. त्याच वेळी ज्याच्या गोठ्यातून ती गाय सुटून नृगाच्या गाईच्या कळपात आली होती, तो ब्राह्मण आपल्या गाईच्या शोधात होता. त्याने आपली

गाय ओळखली आणि तो त्या ब्राह्मणास म्हणाला, " भूदेव, ही गाय माझी आहे. ती आपणांस नेता येणार नाही. "

तो ब्राह्मण म्हणाला, " अहो, ही गाय मला आताच नृग राजाने दान म्हणून अर्पण केली आहे. ही तुमची कशी ? ती माझी आहे. "

गाईचे दान घेणारा ब्राह्मण व गाईचा खरा मालक यांच्यांत गाईच्या मालकीबद्दल भांडण सुरू झाले. आणि न्याय मागण्याकरिता ते दोघे नृगाकडे गेले.

नृगाने दोघांचे म्हणणे ऐकून घेतले. दानात ती गाय नुकतीच ज्याला अर्पण केली तो ब्राह्मण त्याच्या समोरच होता. तेव्हा ती गाय त्याचीच आहे, याची त्याला शंका नव्हती. पण दुसरा ब्राह्मण गाईवर आपला हक्क सांगत आहे. त्याच्या राज्यातील ब्राह्मण सत्यनिष्ठ होते, हाही त्याचा दृढ विश्वास होता. म्हणून तो खरा काय प्रकार झाला याचा शोध करू लागला. आज दान दिलेल्या गायींत एक गाय जास्त दिली गेली, ती गाय त्या ब्राह्मणाचीच असली पाहिजे अशी त्याची खात्री झाली. आणि दुसऱ्याची वस्तू आपण चुकून दान दिली याबद्दल त्यास फार वाईट वाटले. पण आता ती गोष्ट होऊन गेली होती.

नृग त्यांना म्हणाला, " या बाबतीत अपराधी मीच आहे. अज्ञानानं ही गोष्ट मजकडून घडली आहे. आपण मला क्षमा करावी. आपण दयाळूपणे अनुग्रह केला नाही, तर माझ्या दानाचं चीज होणार नाही. मला नरकात जावं लागेल. त्यातून उद्धार करणारे आपणच आहांत. "

त्यानंतर त्याने ' एक लक्ष गायी घेऊन वाद मिटवून टाकावा, ' अशी ब्राह्मणास प्रार्थना केली. पण त्याची ती प्रार्थना फुकट गेली.

दान स्वीकारलेला ब्राह्मण म्हणाला, " दानात ही गाय मला मिळाली आहे. ती माझ्या मालकीची झाली आहे. एक लक्ष गायींच्या मोबदल्यात ती देणे म्हणजे तिचा विक्रय करणे होय. ते पाप मला नको. मला

माझीच गाय पाहिजे."

गायीचा खरा मालक म्हणाला, "माझ्या मालकीच्या गायीवर दुसऱ्या कोणाचाही हक्क नाही. नृगा, हिचे दान तू करू शकत नाहीस. तसेच दानात गाय मिळाली आणि तिच्यावर मालकी प्राप्त झाली, असे या ब्राह्मणास म्हणता येणार नाही. ही गाय त्याची नाही, माझीच आहे. लक्ष गायी घेऊन तिची मी विक्रीही करीत नाही. मी माझी गाय नेणार!"

अशा प्रकारे खरा मालक ती गाय घेऊन गेला.

दानात मिळालेली स्वतःची गाय राजा आपणास देऊ शकला नाही म्हणून तो दुसरा ब्राह्मणही असमाधानी होऊन चालता झाला. ब्राह्मण असंतुष्ट झाला, आपणाकडून मोठे पातक घडले, असे पाहून राजाचे मन त्याला खाऊ लागले. अशा स्थितीत त्याचे आयुष्य निघून गेले.

अंती यमाच्या न्यायासनासमोर तो उभा असताना यमाने त्याला विचारले, "नृगा, तुझं पुण्यकर्म तर पुष्कळच आहे. पण तुझ्याकडून पातकही घडलं आहे. तेव्हा अगोदर पापफल भोगावयाचं की पुण्यफल?"

नृग म्हणाला, "प्रथम पापफल भोगू द्या. नंतर पुण्यफल." नृगाकडून झालेल्या पापाबद्दल त्याला सरडा होऊन पृथ्वीवर वावरावे लागले.

फार मोठा होता तो सरडा. उपजीविकेकरता फिरता फिरता तो एका कुंडात पडला. त्या विहिरीजवळ एक बगीचा होता. त्यात प्रद्युम्न, सांब वगैरे कुमार खेळत होते. बराच वेळ खेळ झाल्यावर ते तृषाक्रांत होऊन पाणी पिण्याकरिता कैलास कुंडाजवळ आले. तेव्हा त्यांना कुंडात तो भला मोठा सरडा दिसला. दोऱ्यात सरड्याला अडकवून त्यास बाहेर काढण्याचा त्यांनी प्रयत्न चालविला. पण तो सरडा त्यांना मुळीच उचलेना. त्यांना मोठे आश्चर्य वाटले. तेव्हा मुलांनी ती गोष्ट श्रीकृष्णाच्या कानांवर घातली.

श्रीकृष्ण तो चमत्कार पाहण्याकरिता तेथे आले. त्यांनी डाव्या हाताने तो सरडा सहज बाहेर काढला. तेव्हा सारी मुले आश्चर्यचकित झाली.

श्रीकृष्णाचा हात लागताच सरड्यास दिव्य देह प्राप्त झाला. तो नृग राजाच होता. श्रीकृष्णदर्शनाने त्याचे पाप नष्ट झाले. त्यास स्वर्गलोकी नेण्याकरिता तेथे विमान आले. त्यात बसून पुण्यफल भोगण्याकरिता तो तिकडे निघून गेला.

या प्रसंगाची आठवण म्हणून कैलासकुंडाचे पाणी सतत गुलाबी रंगाचे झाले.

कैलासकुंडानंतर प्रदक्षिणेच्या मार्गावर सूर्यनारायणाचे मंदिर लागते. नंतर द्वारकेचा पूर्व दिशेचा भव्य दरवाजा येतो. ह्या दरवाजावर जय-विजय ह्या दोन द्वारपाळांच्या सुंदर मूर्ती आहेत.

येथून यात्रेकरू पुनः निष्पापकुंडावर जातात आणि नंतर वाटेतील अनेक देवदेवतांचे दर्शन घेऊन रणछोडजीचे दर्शन घेऊन यात्रा संपवितात.

मूळ द्वारका आणि गोमती द्वारका पाहून झाल्यावर वीस मैलांवरील बेट द्वारकेची यात्रा पूर्ण केल्याशिवाय सांगता होत नाही.

कच्छच्या खाडीतील ह्या बेट द्वारकेला जाण्यासाठी जलमार्गानेही सोय आहे. परंतु जमिनीवरील मार्गाने जाताना वाटेत तेरा मैलांवर गोपी तलाव लागतो तो फारच प्रेक्षणीय आहे. याच्या काठची जमीन पिवळ्या मातीची आहे. तलावाचे पाणीही पिवळ्या रंगाचे आहे. जणू सोन्याच्या द्वारकेचा हा शेष अंशच आहे म्हणून प्रत्येक यात्रेकरू येथील माती घेऊन ती गोपीचंदन म्हणून कपाळावर लावतो. ह्या पवित्र गोपी तलावाशेजारील उपवनात खूपच मोर आहेत.

गोपी तलावाच्या पुढे तीन मैलांवर नागेश्वर महादेव आणि पार्वती यांची प्रेक्षणीय मंदिरे आहेत. त्यानंतर यात्रेकरू बेट द्वारकेला पोहोचतात आणि तेथील अत्यंत सुंदर शोभा पाहून थक्क होतात. सुमारे सात मैल लांबीचे हे खडकाळ बेट फारच निसर्गरम्य आहे. भगवान श्रीकृष्ण

आपल्या परिवारासह विश्रांतीसाठी बेट द्वारकेला येत असत. येथेच श्रीकृष्णाने आपल्या परमभक्त नरसी मेहत्याची हुंडी पटविली होती.

गोमती द्वारकेप्रमाणेच बेट द्वारकेलाही सुंदर तट आहे. तेथील सर्व मंदिरांच्या प्रतिकृती येथेही आहेत. अनेक तलाव, भांडारखाने, धर्मशाळा, अन्नछत्रे आणि सदावर्ते वगैरेंनी हे ठिकाण सतत गजबजलेले असते. किनाऱ्याच्या सहलीसाठीही खूप लोक येथे नित्य येत असतात.


बेटाच्या पूर्व बाजूला एका उंच दरडीवर मारुतीचे सुंदर मंदिर आहे. त्या ठिकाणाला तेथे "हनुमानजीका टीला" म्हणतात. चिरंजीव असलेला हनुमान त्या ठिकाणी दररोज कृष्णस्वरूपी रामाच्या भेटीस येत असावा असे म्हणतात.

श्रीकृष्ण आणि त्याच्या चार राण्यांचे महाल बेट द्वारकेवर आहेत. कृष्णमहालाच्या दक्षिणेला सत्यभामा आणि जाम्बवती यांचे आणि उत्तरेला रुक्मिणीचा असे महाल आहेत. ह्या सर्व महालांची शोभा अवर्णनीय आहे. दरवाजे आणि चौकटी चांदीच्या पत्र्यांनी मढवून त्यावर अत्यंत मनोहर नक्षीकाम केलेले आहे. सिंहासनाचे काम अप्रतिम आहे. मूर्तीचा साज-शृंगार तर फारच मोलाचा आहे. सोने, हिरे, मोती, यांच्या अलंकारांची रेलचेल आहे. खऱ्या जरीच्या कपड्यांनी मूर्ती सुशोभित केलेल्या असतात, रणछोडजीचा थाट तर आगळाच असतो. आरसे महाल, शेजघर, पाळणे, चोपाळे, सारीपाट वगैरे विलासाची स्मारके पाहून श्रीकृष्णाच्या विश्रांतिस्थानाची कल्पना येते. त्या द्वारकाधीश सम्राटाचे येथील वैभव पाहून मन थक्क होते.

प्रत्येक मंदिराचे भांडारखाने सजावटीचे सर्व साहित्य तयार करण्याचे कारखाने, पूजा – आरत्यांचे नित्य कार्यक्रम, यात्रेकरूंची गर्दी ह्या सर्व गडबडीमुळे हा सर्व भाग दिनरात्र जागा असतो, गजबजलेला असतो.


पाच महालांखेरीज ह्या बेट द्वारकेत इतरही अनेक मंदिरे आहेत

प्रद्युम्न, त्रिविक्रम, पुरुषोत्तम, माधव, देवकीमाता, अंबा, गरुड, साक्षी-गोपाळ गोवर्धन-नाथ, लक्ष्मी-नारायण वगैरेच्या मंदिरांचा थाट आणि सजावट अत्यंत नयनमनोहर आहे.



देहोत्सर्ग स्मारक

रणछोड-तलाव, रत्न-तलाव, कचौरी-तलाव, शंख-तलाव वगैरे किती तरी तलाव आणि घाट येथे आहेत. तलावाच्या काठी मुरली-मनोहर, शंख-नारायण, नीलकंठ, रामचंद्र वगैरे देवतांची मंदिरे आहेत.



देहोत्सर्गाच्या जागी होणाऱ्या स्मारकाचा आराखडा


भगवान श्रीकृष्णाने शंख नावाच्या राक्षसाला मारून लोकांना सुखी केले. त्या स्थळी शंख तलाव आहे. तेथे स्नान करून शंख-नारायणाचे दर्शन घेणे म्हणजे महान् पुण्यकर्म आहे असे सर्व लोक मानतात.

बेट द्वारकेजवळ वेरावळ नावाचे बंदर आहे. त्याच्या जवळ हिरण्या, सरस्वती आणि कपिला ह्या तीन नद्या आहेत. त्यांच्या संगमस्थानी भगवान श्रीकृष्णाच्या देहावर अंत्यसंस्कार केला होता. म्हणून हे स्थान ‘ देहोत्सर्ग ’ या नावाने ओळखले जाते. या ठिकाणी हिरण्या-नदीला लहानसा घाट बांधला आहे. यात्रिक या घाटावर स्नान करतात आणि वर येऊन भगवान श्रीकृष्णाच्या चितास्थानी बांधलेल्या चौथऱ्या वरच्या अश्वस्थ वृक्षाला भक्तिभावाने वंदन करतात. या ठिकाणी अनेक स्तंभावर उभे असलेले एक लांब स्मारक उभारण्याचा संकल्प आहे.

संगमस्थानाच्या पश्चिमेला सुमारे एक मैलावर बाणतीर्थ आहे. त्याच ठिकाणी जरा नावाच्या व्याधाने कृष्णाच्या पादांगुष्ठाला बाण मारला होता आणि त्यामुळे श्रीकृष्ण निजधामाला गेले होते. वैशाख महिन्यात दरसाल ह्या बाणतीर्थावर मोठी यात्रा भरते. बाण-तीर्थाजवळच उत्तरेकडे भालपूर नावाचे एक ठिकाण आहे. तेथे पद्मकुंड तीर्थ आहे. या तलावात श्रीकृष्णाने बाण लागलेला आपला अंगठा धुतला होता असे सांगतात. हिरण्या नदीच्या उजव्या तीरावर वडाचे एक झाड आहे त्या ठिकाणी बलरामाने आपला देह ठेवला. त्या स्मारकाचे दर्शन यात्रेकरू लोक निष्ठेने घेतात. हिरण्या नदीच्या काठी सोमनाथ पट्टणच्या जवळ यादवस्थान आहे. तेथील गवताची पाती तरवारीसारखी धारदार असतात. याच प्रसिध्द लोहतृणाने यादवांचा समूळ नाश केला.

द्वारका आणि तिचा आसमंत अशा प्रकारे पुण्यपावन प्रदेश आहे; आणि म्हणूनच भारतातील ते एक महान तीर्थक्षेत्र आहे.

सोमनाथपट्टण हे द्वारकेजवळील एक मोठे प्राचीन, पौराणिक व



सोमनाथ मंदिर.

ऐतिहासिक महत्त्वाचे क्षेत्र आहे. गजनीच्या महमुदाने याच सोमनाथ मंदिरावर हल्ला करून अगणित संपत्ती लुटून नेली होती.

सोमनाथ मंदिराचे भग्नावशेष समुद्रतीरी इतस्ततः दिसतात. महमूद गिझनीच्या स्वारीनंतर सुमारे सातशे वर्षांनी हिंदूंच्या ह्या पवित्र वैभवमंदिराचा जीर्णोद्धार इंदूरच्या अहिल्यादेवी होळकर यांनी केला होता. त्यांनी एक नवे सोमनाथ मंदिर गावातही बांधले आणि सोमनाथाचे महत्त्व वाढविले.

अलीकडे स्वातंत्र्यकाळात ह्या सोमनाथ मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचे काम चालू आहे. ते पूर्ण झाल्यावर हिंदूंच्या या पवित्र स्थळाचे वैभव पूर्वीप्रमाणे तळपू लागेल, असे वाटते.

अशा प्रकारे द्वारकापुरी हे चारी धाम-यात्रेतील पश्चिमेकडील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र अत्यंत पुण्यपावन आणि मोक्षदायी मानलेले आहे. त्या पवित्र स्थळाचे दर्शन प्रत्येक भारतीयाने आयुष्यात निदान एकदा तरी करावे म्हणजे त्याच्या जन्माचे सार्थक होईल. जय द्वारका ! जय श्रीकृष्ण !

६

भुवनेश्वर

भारताच्या चारी धाम-यात्रेत जगन्नाथपुरीची यात्रा करणे पुण्यप्रद आहे, पण पुरीच्या जगन्नाथाचे दर्शन घेण्याआधी भुवनेश्वर येथील श्रीलिंगराजाचे दर्शन घेतले पाहिजे, असा रूढ संकेत आहे. श्रीलिंगराजाच्या त्या दर्शनाशिवाय पुरीच्या जगन्नाथाचे दर्शन फलदायी होत नाही म्हणून पुरीला जाण्याअगोदर यात्रिकांना भुवनेश्वर क्षेत्राला जावे लागते.

पूर्वी माळव्याचा राजा इंद्रद्युम्न याने प्रथम भुवनेश्वरच्या श्रीलिंगराजाची सेवा केली आणि त्यामुळेच त्याला पुरीच्या जगन्नाथाचे दर्शन घडले, अशी कथा आहे.

बंगालचे वैष्णव संत श्रीचैतन्य महाप्रभू हेही पुरीला जाण्याआधी भुवनेश्वर क्षेत्रात आले होते. त्यांनीही तोच संकेत पाळला आणि हरिहर ऐक्याचा महान आदर्श असलेल्या श्रीक्षेत्र भुवनेश्वराचा महिमा मान्य केला. भुवनेश्वर हे क्षेत्र शिवस्थान आहे. सकल मंगलांचे माहेर आहे. भुवनेश्वराचा महिमा विशेष श्रेष्ठ आहे.

मुंबईहून निघालेल्या यात्रेकरूला नाशिक, भुसावळ, नागपूर, कटकमार्गे थेट भुवनेश्वराला जाता येते. सुमारे बाराशे मैलांचा हा प्रवास

आहे. पुरी जिल्ह्यातील खुर्दा विभागात कटकपासून अवघ्या अठरा मैलांवर हे भुवनेश्वर क्षेत्र आहे. ओरिसा प्रांताची ती सध्याची राजधानीही आहे.

कलिंग देशाच्या प्राचीन, पौराणिक आणि ऐतिहासिक वैभवाला आधुनिक राजधानीच्या भुवनेश्वर क्षेत्रामुळे खूपच उजळा मिळाला आहे.

उत्कल प्रदेशातील गंधवती नदीच्या काठच्या एकाम्र काननात भगवान शंकराचा विहार आणि निवास होता, त्यामुळे भुवनेश्वर क्षेत्राला काशीपेक्षाही जास्त महत्त्व प्राप्त झाले आहे.

एकाम्रके शिवक्षेत्रे वाराणसीसमे शुभे ।
स्नानं करोति यस्तत्र मोक्षं स लभते शुभम् ॥

कैलासाहून सुंदर असलेल्या त्या एकाम्र वनात सुख-निवास करण्यासाठी एकदा स्वतः माता पार्वती गौळणीच्या रूपाने आली. त्या अति सुंदर गौळणीला पाहून कृत्ती आणि वास या नावाचे दोन राक्षस मोहित झाले. ते तिला विनवणी करू लागले, तेव्हा ती म्हणाली, " आधी तुम्ही दोघे मला खांद्यावर घेऊन ह्या वनातून फिरवून आणा. "

झाले. ते राक्षस कबूल झाले. त्याप्रमाणे ती महाशक्ती त्या दोन्ही राक्षसांच्या खांद्यांवर दोन पाय देऊन उभी राहिली आणि क्षणात तिने आपल्या वज्रशक्तीने त्या दोन्ही राक्षसांना दाबून ठार मारले.

उमेचा तो प्रताप पाहून भगवान शंकरांनी तिची तहान शांतविण्यासाठी त्या एकाम्रवनात बिंदुसागर नावाचा एक प्रचंड जलाशय निर्माण केला त्या बिंदुसागराच्या काठावर मग उमा-शंकरांनी आपले भुवन बांधले आणि ती दोघे तेथे आनंदाने राहू लागली.

'गोपालिनी' उमेसाठी बिंदुसागर निर्माण झाला. त्या जलतीर्थाला पवित्र करण्यासाठी भगवान शंकरांनी पृथ्वीवरील सर्व देव-देवतांना आणि सकल तीर्थांना बोलावले. त्याप्रमाणे सर्व तीर्थांनी त्या बिंदु-

सागरात आपल्या पवित्र जलाचा एकेक बिंदू टाकला आणि तो बिंदुसागर पवित्र केला.

ह्या बिंदुसागरात प्रथम स्नान केल्याशिवाय यात्रिकाला शिवदर्शन घेता येत नाही. सुमारे चौदाशे फूट लांबीच्या आणि अकराशे फूट रुंदीच्या ह्या विशाल जलाशयाच्या तीरावर देवदेवतांची सुमारे शंभर मंदिरे आहेत. पर्वकाळात येथे स्नानासाठी अलोट गर्दी उसळते. वैशाखमासी त्या ठिकाणी चंदनयात्राउत्सव म्हणजे जल-विहाराचा उत्सव होतो.

भुवनेश्वराचा हा बिंदुसागर म्हणजे पृथ्वीवरील सर्व तीर्थांचे सार आहे. सिंह राशीत गुरू येतो तेव्हा दर बारा वर्षांनी श्रीगोदावरीचे तीर्थ ह्या बिंदुसागरात येते, असे सांगतात. बिंदुसागराला 'गोसागर' हेही नाव आहे. येथे श्राद्ध-तर्पणादी धार्मिक कृत्येही चालतात. हल्ली ह्या बिंदुसागर परिसरात मोठी बाजारपेठ वसलेली आहे.

यात्रेकरू भुवनेश्वरला गेले म्हणजे त्यांना तेथे तीन दिवस आणि तीन रात्री राहावे लागते. प्रथम बिंदुसागर तीर्थात स्नान करून अनंत-वासुदेवाचे दर्शन घ्यायचे. नंतर पापहरा देवीचे दर्शन आणि भुवनेश्वर मंदिराच्या सिंहद्वारात नमस्कार. त्यानंतर गणेश, गोपालिनी-देवी, कार्तिकेय, नंदी, चंडेश्वर, कल्पतरू आणि सावित्री अशा क्रमाने दर्शने घेऊन शेवटी श्रीलिंगराजाचे दर्शन घेण्याचा परिपाठ आहे.


कृत्तिवास नमस्तेस्तु लिंगराज महेश्वर ।
स्वर्णकूटपणे शंभो जयः त्रिभुवनेश्वर ।।

अशी प्रार्थना म्हणत श्रीलिंगराजाच्या भव्य मंदिरात प्रवेश करणारे यात्रेकरू त्या मंदिराची जडणघडण पाहतात आणि त्या भव्य मंदिराचे शिल्पसौंदर्य पाहून थक्क होतात.

अकराव्या शतकात बांधलेले हे मंदिर आहे. या मंदिराच्या प्राकाराला

चार प्रवेशद्वारे आहेत. पूर्वेकडील सिंहद्वारातून आत प्रवेश करताच गणेशाचे मंदिर आणि नंदीस्तंभ दिसतो. समोरच्या भव्य अशा भोगमंडपात लिंगराजाला भोग समर्पण करतात. हा विधी अत्यंत विशेष असा मानतात.

जगमोहनचे नट-मंदिर, मुखशाला, श्रीमंदिर इत्यादी भाग याच मंदिरात आहेत. दक्षिणेकडील भागात गणेश, उत्तरेकडील भागात कार्तिकेय आणि पाठीमागे पार्वती यांची मंदिरे विशेष प्रेक्षणीय आहेत. त्याचप्रमाणे कीर्तिमुख, नाटयेश्वर, दशदिक्पाल यांच्याही मूर्ती ह्याच मंदिराच्या वरच्या भागात आहेत.


लिंगराज मंदिर, भुवनेश्वर

ओरिसातील विशिष्ट बांधणीच्या विशेष पद्धतीची रचना असलेल्या भुवनेश्वर येथील अनेक मंदिरांचा मुकुटमणी म्हणून श्रीलिंगराजाचे हे मंदिर आहे. याच्या रचनेत विविध-कला वैशिष्ट्यांची विपुलता अत्यत आकर्षक असून सौंदर्यपूर्ण आहे.

लिंगराज मंदिराच्या आवाराची लांबी ५२० फूट असून रुंदी ४६५ फूट आहे. लिंगराजाच्या मुख्य शिखरांची उंची जोत्यापासून १४७ फूट आहे. भव्यता हा या मंदिराचा विशेष आहेच; पण येथील मोहकताही काही कमी नाही. सुमारे पाच फूट उंचीची काळ्या पाषाणाची पार्वतीची एक दगडी मूर्ती येथे आहे. तिच्या अंगावरील वस्त्र इतक्या नाजुक हाताने खोदलेले आहे की त्यावरील रेषा अन् रेषा स्पष्ट दिसतात.

लिंगराज मंदिराच्या आवारातच महाकालेश्वर, लक्ष्मीनृसिंह, यमेश्वर, विश्वकर्मा, भुवनेश्वरी, गोपालिनी-पार्वती वगैरे देवतांची मंदिरे आहेत. भुवनेश्वराच्या भव्य मंदिरापुढील नंदी तर अत्यंत प्रचंड आणि विशेष सुंदर घडणीच्या शिल्पाचा आहे.

लिंगराजालाच त्रिभुवनेश्वर, भुवनेश्वर, कृत्तिवास वगैरे नावे असून त्या शिवाचे प्रचंड लिंग चक्राकार, हरिहरात्मक, हरगौर्यात्मक, कालरुद्रात्मक आहे.

जमिनीपासून सुमारे आठ-नऊ इंच उंचावलेली आठ-नऊ फूट घेराची प्रचंड शिळा हेच श्रीलिंगराजाचे स्वयंभू शिवलिंग आहे. त्याच्याभोवती काळ्या पाषाणाची भव्य अशी शाळुंका आहे. ह्या लिंगराजाचे दर्शन सर्वांना मुक्तपणे आत जाऊन घेता येते. कोणालाही देवाला भोग अर्पण करता येतो. देवाचा प्रसाद आणि महाप्रसाद कोणालाही घेता येतो. शिजविलेला भात येथे सर्वांना महाप्रसाद म्हणून मिळतो. येथे जातिभेद मानीत नाहीत.

ह्या मंदिराची व्यवस्था सरकारनियुक्त समितीकडे आहे. शूद्र जातीच्या सेवकांना बरू (मुख्य) म्हणतात. त्यांच्याकडे देवासाठी बेल फुले आणण्याचे काम असते. या लोकांना या देवाचे मूळ सेवक मानतात.

चैत्र शुद्ध अष्टमी म्हणजे अशोकाष्टमी. या दिवशी भुवनेश्वर येथे फारच थाटाचा रथयात्रेचा उत्सव होतो. याशिवाय इतर चौदा उत्सव प्रसिद्ध आहेत.

श्रीलिंगराजाच्या नित्योपासनेत पहाटे घंटा वाजवून देवाला जागे करतात. नंतर त्याच्या गाभाऱ्याचे दार उघडतात. काकडारती करून देवाचे मुखप्रक्षाळण करतात. स्नानानंतर देवाला पोषाख चढवितात. नंतर मिठाई, दही, नारळ यांचा उपाहार देऊन दुपारी मुख्य नैवेद्य दाखवितात. आसन, भोजन, भोग, पंचारती, वामकुक्षी; त्यानंतर पुनः

वाद्यगीतांच्या घोषांनी देवाला जाग आणल्यावर मिठाईचा नैवेद्य दाखवितात आणि पुनः स्नान, पोषाख व नैवेद्यसमर्पणाचा विधी होतो.

सायंस्नानानंतर देवाला बहुमोल वस्त्रांनी आणि अलंकारांनी सजवून सुगंधी द्रव्ये व पिवळी फुले अर्पण करतात. पुनः रात्रीचा नैवेद्य दाखवितात. पाच मुखवटे व डमरू गाभाऱ्यात आणून त्यांना नैवेद्य दाखवितात. शेजारतीनंतर देवाची शय्या गाभाऱ्यात ठेवून दारे बंद करतात. ती पुनः दुसऱ्या दिवशी पहाटेच घंटानादांनी देवाला जागे केल्यानंतर उघडतात. असा नित्य क्रम चालतो. ती नित्यपूजा पाहण्यास भक्तांची खूप गर्दी असते.


भुवनेश्वर क्षेत्रात बिंदुसागर तीर्थाप्रमाणेच नऊ प्रमुख जलतीर्थे आहेत. पापनाशिनी, कोटितीर्थ, गंगायमुना, देवीपापहरा, मेघतीर्थ, अलावुतीर्थ आणि अशोककुंड किंवा रामह्रदकुंड, शेवटी ब्रह्मकुंड! ह्या सर्व तीर्थकुंडाजवळ देवदेवतांची मंदिरे आहेत. स्नान व दर्शनासाठी भाविकांची येथे नित्य गर्दी असते.

भुवनेश्वर हे मंदिराचे प्रसिद्ध क्षेत्र आहे. येथील शेकडो मंदिरांत श्रीलिंग-राजाचे प्रमुख मंदिर जसे भव्य, विशाल व सुंदर शिल्पाचे आहे; तशीच आणखी काही मंदिरेही प्रेक्षणीय आहेत. काही मंदिरांचे शिल्प-सौंदर्य आणि कला-कौशल्य तर अत्यंत मनोहर आणि अप्रतिम आहे.

राजाराणी-मंदिर हे असेच एक अतिसुंदर मंदिर आहे. वालुकामय पिवळसर रंगाच्या विशिष्ट 'राजाराणिया' नावाच्या दगडांचा उपयोग करून हे मंदिर बांधले आहे. याच्या भिंतींवरील मूर्तींचे शिल्प म्हणजे कलावंतांची कमाल किमया आहे. शृंगारभावातील मूर्ती तर अत्यंत प्रेक्षणीय आणि अभ्यसनीय आहेत. त्या सर्व सुरक्षित राखल्या आहेत. या मंदिरात मूर्ती नाही. मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यापूर्वीच त्याचे बांधकाम अर्ध-वट सोडून देण्यात आले असावे.

उत्कल शिल्पमालेतील कौस्तुभ म्हणून शोभणारे, कलासौंदर्याचे उत्तुंग शिखर म्हणून प्रसिद्ध असणारे श्रीमुक्तेश्वरमंदिर हे भुवनेश्वराचे एक महान भूषण आहे.

ह्या मुक्तेश्वर मंदिराच्या प्रांगणाचे प्रवेशद्वार म्हणजे अत्यंत सुंदर बांधणीचे एक भव्य तोरण आहे. मुखमंडपही अत्यंत कौशल्यपूर्ण वास्तुकलेने बांधलेला आहे. मंदिरात उंदीर, मोर आणि हाती बालके घेतलेल्या मातृकांच्या मूर्ती आहेत. नर्तिका, उपदेशक ऋषी, पोथी वाचणारे पंडित, छत्रधारिणी युवती आणि पोपटांशी गुजगोष्टी करीत उभी राहिलेली स्त्री वगैरे मूर्ती फारच प्रेक्षणीय आणि कलापूर्ण आहेत.




तोरण, मुक्तेश्वर मंदिर, भुवनेश्वर

केवळ पस्तीस फूट उंचीचे हे मुक्तेश्वर मंदिर लहानसे असले तरी अत्यंत रेखीव आणि बारीकसारीक बांधणीतही प्रमाणबद्ध असे नाजुक मंदिर आहे. कलिंग संप्रदायातील शिल्पशैलीचा हा छोटासा पण बहारदार नमुना पाहून जगातील तज्ज्ञांनी धन्योद्गार काढले आहेत. मुक्तेश्वरमंदिराचे सौंदर्य सतत ताजे राहिले आहे.

मुक्तेश्वर मंदिरानजीकच पश्चिम दिशेला अत्यंत जुने असे परशुरामेश्वर मंदिर आहे. या मंदिराच्या भिंतींवर रामायणातील प्रसंग कोरले आहेत.

शिव-पार्वती विवाह आणि किरातार्जुन यांचीही चित्रे कोरलेली असून ती अद्यापही चांगल्या स्थितीत आहेत.

बिंदू सरोवराच्या पूर्ण तीरावर ' अनंत वासुदेव ' या एकाम्र वनाच्या मुख्य देवतेचे भव्य मंदिर आहे. ह्याच अनंत वासुदेवाच्या अनुमतीने भगवान् श्रीलिंगराज भुवनेश्वर येथे राहायला आले, असे सांगतात. हरिहर ऐक्याचा तो आदर्श आहे. अनंत वासुदेव मंदिरात नारायण, लक्ष्मी आणि सुभद्रा यांच्या मूर्ती आहेत. ह्या मंदिराचा जीर्णोद्धार झालेला असून मूर्तीही नवीन आहेत. हे मंदिरही लिंगराज मंदिराच्या घडणीप्रमाणे सुंदर आहे. हरिहर ऐक्याचे आणि प्रीतीचे हे प्रतीक आहे.



अनंत वासुदेव मंदिर, भुवनेश्वर

ह्याखेरीज भुवनेश्वर येथे अनेक मंदिरे अत्यंत प्रेक्षणीय आहेत. किती पाहावे असे होते. त्यातल्या त्यात आणखी एक विशेष प्रेक्षणीय असे मंदिर आहे ते म्हणजे केदार-गौरीमंदिर हे होय. या मंदिरासंबंधी एक दंतकथा आहे. ती पुढीलप्रमाणे :

दररोज शिकारीला जाणाऱ्या केदार नावाच्या एका गरीब पण सुदृढ तरुणावर उत्कल राजकन्या गौरी हिचे प्रेम बसले. त्या दोघां प्रेमिकांच्या अनेक गाठीभेटी झाल्या; आणा-भाका झाल्या.

पण ही गोष्ट राजाला आवडली नाही. त्याने केदारचा काटा काढण्याचे ठरविले. आपल्या शिकारखान्यामधील एक सिंह नोकराहाती त्याने केदारच्या वाटेवर लपवून बसविला.

केदार शिकारीसाठी जात असता त्या नोकराने तो सिंह केदारवर सोडला. खूप झटापट झाली. शेवटी केदार घायाळ होऊन पडला. नोकराने सिंहाला आवरले आणि तो निघून गेला.

ही गोष्ट राजकन्येला कळली. ती धावतच त्या अरण्यात गेली. पण गौरीला तेथे केदार दिसला नाही. रक्ताच्या थारोळ्यात त्याचे फाटलेले कपडे फक्त तिला दिसले. तिला वाटले, सिंहाने केदारला खाल्ले !

झाले. तिने आपल्या प्रियकराच्या वियोगाच्या दुःखामुळे त्याच जागी आत्महत्या करून घेतली आणि अशा रीतीने त्या प्रेमळ गौरीचा तेथे अंत झाला.

झटापटीत घायाळ झालेल्या केदारला आदिवासी जंगली लोकांनी उचलून नेले होते. तो मेला नव्हता. त्या लोकांनी त्याला औषधोपचार करून बरा केला. आणि नंतर त्याला सोडून दिले.

गौरीचा शोध घेत केदार राजवाड्यात आला. तेव्हा त्याला समजले की, आपल्यासाठी गौरीने थेट स्वर्गाची वाट धरली आहे. त्याला खूप दुःख झाले. त्याच्या मनावर इतका परिणाम झाला की, त्यानेही तेथेच " गौरी, गौरी " असे म्हणत प्राण सोडला.

केदार आणि गौरी ह्या प्रेमी जोडप्याचा असा दुःखद शेवट झालेला पाहून राजाला पश्चात्ताप झाला. त्यालाही खूप दुःख झाले.

एके दिवशी राजाला स्वप्नात दृष्टान्त झाला की, त्या प्रेमी युगुलाच्या शांतीसाठी राजाने एक भव्य शिवमंदिर बांधावे म्हणजे सर्व पाप नाहीसे होईल आणि त्या उभयतांची स्मृती कायम राहील.

राजाने त्याप्रमाणे हे ' केदार-गौरीमंदिर ' बांधले आणि गौरीकेदारांची प्रीती अमर बनविली. केदार-गौरी शिवमंदिर हे त्या अमर प्रीतीचे स्मारक आहे.

भुवनेश्वरच्या नैर्ऋत्येस तीन कोसांवर " दया" नावाच्या नदीकाठी

धौली नावाचे एक प्रसिद्ध स्थान आहे. ' दया ' म्हणजेच मूळच्या ' दधिभद्रा ' नदीच्या तीरावर पूर्वी महर्षी दधीची राहात होते. त्यांनी आपल्या अस्थी इंद्राला दिल्या होत्या. त्यांच्या अस्थापासून इंद्राने वज्र बनविले आणि दानवांवर विजय मिळविला. ह्या धौली स्थानाला ' धवलगिरी ' असेही म्हणतात.

तेथील टेकड्यांमधून अशोकाच्या काळातील ऐतिहासिक अवशेष सापडले आहेत. गौतमबुद्धाचे प्रतीक असलेला हत्ती तेथे सध्या गणेश-देवता म्हणून उभा आहे. या ठिकाणी अशोकाचे तीन शिलालेख आहेत.

भुवनेश्वरच्या वायव्येस तीन मैल अंतरावर खण्डगिरी नावाचे आणखी एक महान् ऐतिहासिक पुराणस्थान आहे. उदयगिरी, खंडगिरी आणि नीलगिरी ह्या तीन टेकड्यांत जैन आणि बौद्ध यांच्या प्राचीन इतिहासाची लेणी खोदलेली आहेत. या लेण्यांची संख्या एकंदर सहासष्ट आहे. जयविजय गुंफा, पनस गुंफा, स्वर्गपुरी, मंचपुरी, हाथी गुंफा, गणेश गुंफा, राणी गुंफा, अनंत गुंफा, नवमुनी गुंफा, ललिते केसदुरी गुंफा वगैरे लेणी फारच प्रेक्षणीय आहेत.

कलिंग सम्राट खारवेल याच्या पराक्रमाची गाथा आणि मगध सम्राट अशोकाच्या आक्रमणाविरुद्ध कलिंग देशाने केलेली प्रतिक्रिया हाथी गुंफेतील एका लेखात खोदलेली आहे.

राणीनहर गुंफेतील मनोहर कोरीव काम आणि जैन तीर्थंकराच्या मिरवणुकीचे दृश्य, जयविजय गुंफेतील स्त्री आणि पुरुष द्वारपाल आणि वृक्षपूजेचे विशेष दृश्य, स्वर्गपुरी गुंफेतील खारवेलाच्या पट्टराणीने साधूंच्या निवासासाठी केलेल्या सोयींचा उल्लेख वगैरे अनेक आठवणी ह्या सर्व लेण्यांतून कोरून ठेवल्या आहेत.

भुवनेश्वरजवळच शिशुपालगड नावाचे एक अत्यंत प्राचीन असे

खंडावशेषांनी गजबजलेले ऐतिहासिक स्थान आहे. कलिंगाचा प्रशासक म्हणून स्वतः अशोक याच ठिकाणीं राहात होता. त्याचे तोसली नावाचे प्रसिद्ध आणि मजबूत निवासस्थान ते हेच होते. आज त्याच्या तटाचे प्रचंड अवशेष, इमारतींचे चौथरे, टेहळणी बुरूज वगैरे अवशेष नव्या इतिहास-संशोधकांना जणू बोलावीत असतात. या स्थानाजवळ गंधवती किंवा गंगुआ नदीचा प्रवाह शांतपणे वाहात आहे.

एकंदरीत हे हरिहरऐक्याचे मंगल असे त्रिभुवन क्षेत्र पौराणिक प्रसिद्धीचे, ऐतिहासिक स्मृतींचे आणि आधुनिक विकासाचे त्रिवेणीसंगमासारखे पवित्र क्षेत्र आहे. भाविक यात्रेकरूंप्रमाणेच हौशी प्रवासी आणि धार्मिक, राजकीय, सामाजिक जिज्ञासू यांचे ते एक विशेष केंद्र बनले आहे.

भुवनेश्वर येथे ता. १३ एप्रिल १९४८ रोजी ओरिसा प्रांताच्या नव्या राजधानीची कोनशिला भारताचे महामंत्री पंडित नेहरू यांनी बसविली. आज हे नगर सर्व दृष्टींनी भरभराटीस आले आहे. या प्राचीन थोर क्षेत्राचा महिमा नव्या दृष्टीने वाढत आहे.

जगन्नाथपुरीला जाण्याअगोदर सर्वांनी भुवनेश्वरला जावे आणि आपली जीवन-दृष्टी विशाल बनवून घ्यावी. तेथील उडिया भाषा थोडी तरी शिकावी आणि भुवनेश्वराच्या पंच-क्रोशीत फिरून सर्व प्रकारचा पौराणिक-ऐतिहासिक भाग अभ्यासावा. यात्रिकांसाठी भुवनेश्वरला खूपच चांगल्या सुखसोयी आहेत. भारताच्या सांस्कृतिक ऐक्यासाठी भुवनेश्वरची यात्रा हे एक मोठे पुण्यकार्य आहे.

" ज य त्रि भु व ने श्व र लिं ग रा ज ! "

७

जगन्नाथपुरी

जुन्या काळची गोष्ट. एक भयंकर दाट अरण्य होते. त्यात एक टेकडी होती. तिला ' नीलाचल ' असे नाव होते. त्या नीलाचलावर कल्पवृक्षाखाली श्रीविष्णूची अत्यंत सुंदर मूर्ती होती. तिला ' नीलमाधव ' म्हणत.

विश्वावसू नावाचा एक शबर त्या नीलमाधवाची पूजा नित्यनियमाने पण कोणालाही न कळेल अशा पद्धतीने करीत होता. माळव्याचा राजा इंद्रद्युम्न याला ती नीलमाधवाची सुंदर मूर्ती आपल्या राज्यात पाहिजे होती. म्हणून त्याने विद्यापती नावाचा आपला दूत विश्वावसूकडे पाठविला. पण विश्वावसू त्या गोष्टीला तयार होईना.

शेवटीं युक्तीप्रयुक्तीने विद्यापतीने त्या अरण्यातील त्या नीलमाधवाचा शोध घेतला आणि इंद्रद्युम्न राजाला तेथे नेले; पण काय चमत्कार ! राजा तेथे जाताच ती मूर्ती अदृश्य झाली आणि त्याला दृष्टान्त झाला, तो असा :

" राजा, तू केवळ माझ्या सुंदर मूर्तीला लोभला होतास; पण मी तुला सागरातून येणाऱ्या लाकडी ओंडक्याच्या रूपाने दर्शन देणार आहे. अंतःकरण शुद्ध कर आणि त्या लाकडी ओंडक्याची भक्ती कर ! "

राजा सागरकिनारी गेला. तप करताना त्याला एके दिवशी एक मोठा लाकडी ओंडका चमुतीर्थात मिळाला. देशातील चतुर कारागिरांना त्या लाकडी ओंडक्यातून सुंदर मूर्ती तयार करण्यास त्याने सांगितले. पण त्या लाकडावर हत्यारच चालेना. शेवटी एका सुताराने एकान्तात एकवीस दिवस राहून त्या लाकडातून तीन मूर्ती तयार करण्याचे काम निष्ठापूर्वक केले.

त्या काळात इंद्रद्युन्म राजाला आणखी दृष्टान्त झाला की, भगवान् विष्णूचा अंश जो द्वारकाधीश श्रीकृष्ण, त्याच्या अवतारसमाप्तीनंतर त्याचा नाभिभाग चितेत जळाला नाही, म्हणून तो समुद्रात लोटला गेला होता. तो वाहात वाहात त्या लाकडी ओंडक्यामध्ये आला आहे. त्या लाकडी ओंडक्याचे महत्त्व जाणून त्यातून श्रीकृष्ण, बलराम आणि सुभद्रा यांच्या मूर्ती तयार करून त्यांची प्रतिष्ठापना तेथे करावी.

इंद्रद्युम्न राजाने त्या दृष्टान्ताप्रमाणे सर्व केले आणि त्या तीन मूर्ती 'जगन्नाथ' म्हणून तेथे स्थापन केल्या. जगन्नाथाच्या त्या तीन मूर्ती म्हणजे हस्तपादविरहित असे तीन लाकडी ठोकळे फक्त आहेत. डावीकडील बलराम, मध्ये सुभद्रा आणि उजवीकडील श्रीकृष्ण म्हणजे जगन्नाथ अशा तीन मूर्ती आहेत.

ह्या मूर्तींविषयी आणखीही एक कथा अशी सांगतात : द्वारकाधीश श्रीकृष्णाच्या राण्यांनी एकदा रोहिणीमातेजवळ हट्ट घेतला की, "कृष्णाच्या गोकुळातील बाळलीला आम्हांला सांगा." नंतर रोहिणीने आपली मुलगी सुभद्रा हिला 'दाराबाहेर उभे राहून कोणाला आत सोडू नकोस' असे सांगून त्या राण्यांना कृष्णाच्या खोड्या सांगितल्या.

त्या वेळी बाहेरून बलराम आणि कृष्ण आले होते. त्यांना सुभद्रेने अडविले. ती तीन भांवडे दाराआडून आतील गमतीच्या कृष्णलीला ऐकत होती. नारदमुनी तेवढ्यातच तेथे आले आणि ते म्हणाले, "तुम्हां

तिघांचे प्रसन्न रूप सर्वांना सदैव दिसावे म्हणून तुमच्या तीन मूर्ती एकत्र जगन्नाथपुरी येथे स्थापन होतील."

श्रीकृष्ण, बलराम आणि सुभद्रा यांच्या मूर्ती एकत्र असण्याचे हे विशेष पवित्र ठिकाण म्हणजे भारतातील प्रसिद्ध जगन्नाथपुरी हे क्षेत्र आहे. चार धाम यात्रेतील पूर्वेकडील ते एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. ह्याला 'पुरुषोत्तम क्षेत्र' असे ही नाव आहे.



बलराम, सुभद्रा आणि श्रीकृष्ण यांच्या मूर्ती

भारतात पूर्व समुद्राच्या काठावर ओरिसा प्रांतात हे क्षेत्र असून, लोकनाथ मंदिर, मरिया प्रवाह, बालेश्वर मंदिर आणि स्वर्गद्वार ह्या चार स्थानांनी मर्यादित अशा ह्या क्षेत्राचा आकार शंखाप्रमाणे असल्यामुळे जगन्नाथपुरीला 'शंखक्षेत्र' हेही नाव दिलेले आहे.

दररोज पहाटेचा सूर्य पूर्व समुद्राच्या पाण्यातून वर येतो, त्यावेळचे रमणीय दृश्य पाहण्यात या ठिकाणी विशेष मौज येते. तो भगवान् सहस्र-रश्मी आपल्या सोनेरी किरणांनी समुद्राचे पाणी सुवर्णमय बनवून रोज सकाळी त्या प्रभु जगन्नाथाचे चरण प्रक्षाळण करतो, ती शोभा अवर्णनीय दिसते.

नीलाचल टेकडीवर जगन्नाथाच्या मूर्ती इंद्रद्युम्न राजाने स्थापन केल्या. त्यानंतर दहाव्या शतकातील अनंतवर्मन् चोडगंग राजाने त्या स्थली सुंदर मंदिर बांधले. अनंग भीमदेव राजाने सात लक्ष रुपये खर्चून चौदा वर्षे त्या मंदिराची विशाल भव्य बांधणी केली.

जगन्नाथाच्या निजमंदिराभोवती शेकडो इतर मंदिरेही बांधलेली आहेत.

त्या मंदिरांच्या भोवती जगन्नाथपुरी क्षेत्राची वस्ती उभारलेली आहे. सुमारे वीस फूट उंचीच्या दुहेरी कोटात ही मंदिरे आहेत. कोटाला चार महाद्वारे असून पूर्व बाजूच्या द्वाराला ' सिंहद्वार ' म्हणतात.

सिंहद्वारासमोर पस्तीस फूट उंचीचा काळ्या संगमरवरी दगडांचा गरुडस्तंभ उभा आहे. त्याला ' अरुणस्तंभ ' असेही नाव आहे. तटांच्या आतील इतर शेकडो मंदिरांत श्रीजगन्नाथाचे निजमंदिर मुख्य असून, त्याचे उंचच उंच शिखर सुदर्शन चक्राने भूषविलेले आहे. त्या शिखरावर देवाचा ध्वज सतत फडकत असतो.



श्रीजगन्नाथ मंदिर, सिंहद्वार


ओरिसातील विशिष्ट शिल्पपद्धतीच्या बांधणीप्रमाणे श्रीजगन्नाथाचे मंदिरही विशाल आणि भव्य असून, त्यावर ठायी ठायी कोरीव कामांची गर्दी केलेली आहे. हे काम अत्यंत प्रेक्षणीय आहे.

भोगमंडपात देवाला भोग समर्पण करण्याचा विधी भक्तजन करतात, तर नटमंदिरात देवापुढे गायन-नर्तनाचे कार्यक्रम चालतात. जनमोहन-मंदिरात यात्रेकरू आणि दर्शन घेणाऱ्या लोकांची गर्दी असते. श्रीमंदिरात (गाभाऱ्यात) देवाच्या मुख्य तीन मूर्ती आहेत. श्रीजगन्नाथाच्या मंदिराचे हे चारही भाग नित्य गजबजलेले असतात.

श्रीमंदिरात सोळा फूट लांब आणि सहा फूट उंच अशा वेदीवर

आपल्या उजव्या बाजूस कृष्ण, डाव्या बाजूस बलराम आणि मध्ये सुभद्रा अशा देवाच्या तीन लाकडी मूर्ती आहेत. त्यांना हातपाय नाहीत. त्यांचे चेहरे रंगविलेले असून कृष्ण म्हणजे जगन्नाथ काळा, बलराम पांढरा व सुभद्रा पिवळी अशा रंगांचे ते देव आहेत.

श्रीमंदिरातील त्या रत्नवेदीवर तीन मूर्तीखेरीज सहा फूट व्यासाचे एक सुदर्शनचक्र आणि नील-माधव, लक्ष्मी आणि सरस्वती यांच्याही मूर्ती आहेत.



जगन्नाथ–मंदिर, जगन्नाथपुरी

कृष्ण, बलराम व सुभद्रा यांच्यात्या लाकडी तीन मूर्ती दर सतरा वर्षांनी नव्या बनवितात. त्या नव-कलेवर महोत्सवाच्या वेळी विशिष्ट मुहूर्त पाहतात आणि विशेष प्रकारच्या निंबाच्या लाकडाची निवड करतात. ते सर्व काम विशिष्ट घराण्यातील सुताराकडेच अगदी परंपरागत चालत आलेले आहे. हा महोत्सव अत्यंत पुण्यप्रद मानून मोठ्या थाटाने आणि भाविकतेने केला जातो. या वेळी यात्रेकरूंची मोठी गर्दी असते.

सर्व जाती-पंथांच्या स्त्री-पुरुषांना श्रीजगन्नाथाचे दर्शन थेट गाभाऱ्यात जाऊन घेता येते. आदिवासी, बौद्ध आणि वैष्णव या तिन्ही परंपरांचा प्रभाव जगन्नाथमूर्तीत आहे. तसेच शैव लोकही ह्या तीन मूर्तींना शिवाच्या त्रिशूळाचे प्रतीक मानतात. वस्त्रालंकारविभूषित अशा ह्या तीन

मूर्तींचे दर्शन अत्यंत आनंददायक आहे. श्रीजगन्नाथाला पाहून भाविक भक्तजन हरखून जातात.

इंद्रद्युम्न राजाकडून आलेल्या विद्यापती या ब्राह्मणाच्या वंशजाकडेच श्रीजगन्नाथाच्या नित्यपूजेची व्यवस्था आहे. मात्र स्नानयात्रा व रथयात्रा वगैरे विशेष उत्सवाच्या वेळीं तो मान तेथील आदिवासी " दैत " घराण्याकडे असतो.


त्या दारुब्रह्म पुरुषोत्तमाचा प्रसाद म्हणून शिजविलेला भात सर्वांना मडक्यातून मिळतो. मंदिराच्या आवारातच तो विशेष प्रसादाचा बाजार भरतो. त्या भाताबरोबरच भाजीभाकरी व डाळ हे पदार्थही तेथे स्वल्प किंमतीत विकत मिळतात. तेथे सोवळेओवळे नसते. भेदभाव कसलाही नसतो.

श्रीकृष्णाच्या निरनिराळ्या स्मृतींचे प्रसंग साजरे करणारे अनेक उत्सवसमारंभ जगन्नाथपुरी येथे होत असतात. वैशाखातील चंदनयात्रा आणि स्नान-समारंभाचा सोहळा प्रेक्षणीय असतो. ज्येष्ठ मासात रुक्मिणीहरणलीला आणि स्नानयात्रा हे उत्सव विशेष थाटाने केले जातात. स्नान-मंडपात एकशेआठ जलकुंभातून देवाला स्नान घालून जगन्नाथाला श्रीगणेशाचा वेष चढवितात आणि त्याच्या भक्तवत्सलतेची आठवण मोठ्या भाविकतेने त्या वेळी करतात.

आषाढ शुद्ध द्वितीयेपासून दशमीपर्यंत नऊ दिवस अत्यंत प्रसिद्ध अशी " जगन्नाथाच्या रथाची यात्रा " असते. श्रीकृष्णाच्या मथुरागमनाची स्मृती म्हणून हा उत्सव येथे होत असतो. श्रीजगन्नाथ, बलराम आणि सुभद्रा यांच्या मूर्ती पहिल्या दिवशी मोठ्या थाटाने सिंहद्वारातून बाहेर काढून तीन रथात बसवितात. हे रथ फारच प्रचंड असतात.

" बुरादंडा " रस्त्याने निजमंदिराच्या उत्तरेस मैलभर अंतर असलेल्या " गुंडीचा बारी " या स्थळी हे रथ थाटाने मिरवत जातात. रथ

ओढण्यास प्रारंभ करण्याचा आणि ह्या नऊ दिवसांतील पूजाअर्चाविधी करण्याचा मान " दैत " आदिवासींना असतो. हजारो लोक रथ ओढण्याचे पुण्य मिळविण्यासाठी गर्दी करीत असतात.



रथयात्रा, जगन्नाथपुरी

" गुंडीचा बारी " येथे देव सात दिवस राहतात. आणि नंतर दशमीला परत ती रथयात्रा थाटाने मिरवत निजमंदिरात येत असते. ह्या काळातील दर्शनाला महापुण्यप्रद असे " अडप दर्शन " म्हणतात. या उत्सवासाठी जगन्नाथपुरीला सारा भारत लोटतो.

रथयात्रेच्या पहिल्या दिवशी श्रीजगन्नाथाचे मंदिर सोन्याच्या खराट्याने झाडण्याचे काम ओरिसाच्या राजाकडे असते. ही प्रथा फार प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. त्या दिवशी तो राजा " देवाघरचा चांडाळ " म्हणून मानला जातो. या संबंधी एक ऐतिहासिक कथा आहे ती अशी :

इ. स. १४७८ मध्ये ओरिसाच्या गादीवर असलेला राजा पुरुषोत्तमदेव

याने कांजीवरम्च्या लावण्यवती राजकन्येला मागणी घातली होती. पण "देवाच्या मंदिरात एक दिवस का होईना, पण झाडूवाल्याचे काम करणाऱ्याला मी माझी मुलगी साफ देणार नाही!" कांजीवरम्च्या राजाने भर दरबारात स्वच्छ सांगून टाकले.

ओरिसाच्या राजकुलगुरूंनी त्याला वारंवार सांगितले, "महाराज पुरुषोत्तमदेव हे महान् प्रतापी आहेत. त्यांचे सौजन्य अप्रतिम आहे. केवळ कुलाचार म्हणून जगन्नाथमंदिरात रथयात्रेच्या दिवशी साफ-सफाईचे काम भक्तिभावाने त्यांचे राजघराणे करीत असते. त्यावरून 'झाडूवाला राजा' असे आपण म्हणू नये. आपल्या स्वरूपसुंदर गुणी राजकन्या पद्मावतीला त्यांनी होऊन मागणी घातली आहे. या मागणीला आपण नकार देऊ नये; या सोयीरसंबंधामुळे ओरिसा आणि कांजीवरम् या दोन्ही राज्यांचे प्रेमाचे संबंध वाढणार आहेत. महाराजांनी या विवाहाला आपली संमती देऊन कटकच्या या वृद्ध कुलगुरूचा मान राखावा, त्याचा शब्द मोडू नये!"

कटकच्या कुलगुरूंच्या या बोलण्याचा कांजीवरम्च्या राजावर काहीच परिणाम झाला नाहीं. त्याचे आपले एकच उत्तर: "मी त्या झाडूवाल्या राजाला माझी मुलगी देणार नाही! काय वाटेल ते होवो!"

राजा पुरुषोत्तमदेवाला हा निरोप कळला आणि नकाराचे कारण ऐकून त्याचे माथे भडकले. रागाच्या भरात सूडबुद्धीने त्याने प्रतिज्ञा केली की, "कांजीवरम्च्या पद्मावतीला बळजबरीने पकडून आणीन आणि तिचे लग्न मुद्दाम एका झाडूवाल्याशी करून देईन तरच नावाचा पुरुषोत्तमदेव!"

लगेच ओरिसाचे सैन्य कांजीवरम्वर चालून गेले. कांजीवरम्चा राजाही तयारीतच होता. पण या घनघोर युद्धात दुर्दैवाने त्याचा पराभव

झाला. पुरुषोत्तमदेवाने राजवाड्यातील कोनाकोपरा शोधून काढला आणि सौंदर्यदेवी राजकुमारी पद्मावतीला शोधून कैद केले?

कटकचे सैन्य परत फिरले. राजा पुरुषोत्तमदेव यांनी आपल्या प्रधानांच्या ताब्यात पद्मावतीला दिले आणि हुकूम दिला : "एखादा झाडूवाला शोधा आणि कांजीवरम्च्या राजकुमारीचे लग्न त्याच्याशी लावून द्या म्हणजे माझी प्रतिज्ञा पूर्ण होईल !"

प्रधानाने राजकुमारी ताब्यात घेतली. तिचे ते अप्रतिम सौंदर्य आणि तिचे ते दुर्दैव पाहून त्याच्या डोळ्यांत अश्रू आले. तो मनाशीच म्हणाला, "काय हा राजा ! एके वेळी या पद्मावतीला पट्टराणी करू इच्छिणारा हा राजा, पण केवळ सूडबुद्धीने आता तिला एका झाडूवाल्याला देऊन तिचे जीवन दुःखी करू इच्छित आहे. खरोखरच या राजाचे हृदयच चांडाळ बनले आहे. पण शक्तीपुढं....छे छे ! आपणही आता हा प्रश्न काही तरी युक्तीनेच सोडविला पाहिजे !"

झाला प्रकार हां हां म्हणता ओरिसाच्या प्रजेलाही कळाला. प्रजा हळहळली. पण प्रधानाच्या चातुर्याविषयी प्रजेला खात्री होती. ,, कंसेही करून प्रधानजी त्या राजकन्येचा विवाह राजा पुरुषोत्तमदेवाशीच करून देतील ! पाहू या ! " असे लोक म्हणत असत.

दिवसामागून दिवस निघून गेले ! राजा पुरुषोत्तमदेव मधून मधून चौकशी करी आणि प्रधानजी त्यांना सांगत, "राजकुमारी पद्मावतीसाठी योग्य असा चांडाळ अद्याप मिळाला नाही. कसोशीने वरसंशोधन चालू आहे."

काही काळानंतर रथयात्रेचा दिवस उगवला. पुरीच्या श्रीजगन्नाथ मंदिरात सकाळपासून मोठी धामधूम सुरू झाली. मोठ्या पहाटेच राजा पुरुषोत्तमदेव लवाजम्यानिशी मंदिरात आला. कुलाचारविधीप्रमाणे त्याने आपल्या हातात सोन्याचा खराटा घेतला.

राजकुटुंबातील मंडळी हंडेच्या हंडे सुगंधित चंदनी पाणी फरशीवर ओतीत होती. सोन्याच्या रत्नजडित खराट्याने स्वतः राजा ती फरशी घासून स्वच्छ करीत होता.

मोठ्या भक्तिभावाने ते राजकुटुंब आपला कुलाचार मनःपूर्वक आचरीत होते. समाधानाने राजा उल्हसित दिसत होता. वर्षातील तो स्मरणीय दिवस धन्य झाला होता.

जगन्नाथ मंदिर स्वच्छ झाले होते. गोपुरातील चौघडे झडू लागले. सनईतून भूपाळीचे मंजुळ मंगल स्वर बाहेर पडू लागले. देवाच्या पूजेची तयारी सुरू झाली. दर्शनासाठी दाराशी नागरिकांची तोबा गर्दी उडाली. इतक्यात—

प्रधानजी मोठ्या लगबगीने आले. आपले झाडण्याचे काम पूर्ण करून सोन्याचा खराटा राजा खाली ठेवणार तोच प्रधानजी हात जोडून म्हणाले, "महाराजांनी थोडे थांबावे! प्रभूच्या आजच्या रथयात्रेच्या दिवशी मागे पडलेला एक महान् मंगल संस्कार आपल्या शुभ हस्ते राहिला आहे!"

"कोणता संस्कार राहिला आहे? श्रीच्या मंदिरातील झाडलोटीचे सर्व विधी तर यथासांग व्यवस्थित पार पडले ना?" राजाने विचारले.

प्रधान नम्रपणे म्हणाला, "महाराज, ही पाहा कांजीवरम्च्या राजाची कन्या पद्मावती. ही स्वतः आपल्या हातांत वरमाला घेऊन आपणासमोर उभी आहे. एखाद्या झाडूवाल्याशीच हिचा विवाह करून द्या असा मला आपला हुकूम आहे. 'श्री जगन्नाथाचे मंदिर झाडणाऱ्या या थोर झाडूवाल्याच्याच गळ्यात हिने विवाहमाला घालावी' अशी तिची, माझी आणि प्रजेची इच्छा आहे! हिच्यासाठी आपणच यो य आहात. प्रभूसमोर आपणही आम्हां सर्वांची इच्छा पूर्ण करावी आणि आपलीही प्रतिज्ञा पूर्ण करून घ्यावी. प्रभू आपणा उभयतांचे कल्याण

करील ! आजचा कुलाचार धन्य होईल ! ”

प्रधानाचे हे चातुर्य, समोर वरमाला घेऊन तयार असलेली रूपसुंदर राजकन्या पद्मावती, तिच्यामागे आतुर नजरेने उभा असलेला प्रचंड जनसमुदाय आणि जगन्नाथाच्या मंदिरातील ते एकंदर मंगल वातावरण या सर्वांचा परिणाम राजावर एकदम झाला आणि त्याने मुकाट्याने त्या विधीला मान्यता दिली.

पद्मावतीने पुरुषोत्तमदेवाच्या गळ्यात माळ घातली. चौघडे झडले. टाळी वाजली. प्रजेचे, प्रधानाचे आणि राजकन्येचे नेत्र आनंदाश्रूंनी डबडबून गेले.

या वर्षीची जगन्नाथाची रथयात्रा संस्मरणीय ठरली. ओरिसा आणि कांजीवरम्‌च्या लोकगीतांतून ती पुढे कायमची रेखिली गेली. पुरुषोत्तम-देवाचा तो प्रसिद्ध सोन्याचा खराटा अमर झाला. आणि पुढे या थोर दंपतीच्या पोटी ओरिसाचा महान् पराक्रमी सम्राट प्रतापरुद्रदेव याचा जन्म झाला.

जगन्नाथाचा रथ निजमंदिरापासून गुंढीचा बारी येथे जाण्याच्या मार्गावर अनेक मंदिरे व मठ आहेत. सिंहद्वाराजवळच श्रीरामानुजाचार्य यांचा मठ (एमार मठ) आहे. तेथे गोपालकृष्णाची सुंदर मूर्ती आहे. जवळच नानक मठही आहे.

निजमंदिरापासून सरळ रस्त्याने समुद्रतटाक एक मैलावर आहे. तेथील स्नानाच्या जागेला “ स्वर्गद्वार ” म्हणतात. ते स्थान अत्यंत रमणीय आणि पवित्र आहे. तेथे दररोज सूर्योदयसमयी खूप गर्दी असते.

गुंडीचा बारी म्हणजे बागेतील मंदिर. येथे बागेतील कोटात श्रीजगन्नाथाच्या निजमंदिराच्या प्रतिकृतीचे विशाल, भव्य आणि सुंदर मंदिर आहे. रथयात्रेतील सात दिवस त्याच मंदिरात श्रीच्या मूर्ती असतात. हे स्थान फारच पवित्र मानतात.

ह्याखेरीज अनेक मंदिरे, मठ आणि पवित्र जलतीर्थे जगन्नाथपुरीत, समुद्र भागात आणि आसमंतात आहेत. त्या सर्वांची दर्शने घेतल्याशिवाय यात्रिकांचे समाधान होत नाही.

श्रीशंकराचार्यांनी भारतात चारही दिशेला स्थापन केलेल्या धर्मपीठांपैकी गोवर्धनपीठ हे जगन्नाथपुरी येथे आहे. हिंदूधर्मजागृतीचे हे एक महान् केंद्र आहे.

महोदधी, रोहिणीकुंड, इंद्रद्युम्न सरोवर, मार्कंडेय सरोवर, श्वेतगंगा, चंदन तलाव, लोकनाथ सरोवर आणि चमुतीर्थ ही आठ पवित्र जलतीर्थे जगन्नाथपुरी येथे प्रसिद्ध आहेत.

गंभीरामठ, सिद्धवकुल, गोपीनाथ, लोकनाथ, बेडी हनुमान्, कानवत हनुमान्, चक्रनारायण, कबीर मठ वगैरे अनेक मठ-मंदिरे आणि महापुरुषांची स्मारकस्थाने पुरी येथे आहेत. रघुनंदन ग्रंथशाळेत भूर्जपत्रावरील अनेक जुने ग्रंथ ठेवलेले आहेत.

जयदेव कवीने आपले " गीतगोविंद " हे अमर काव्य जगन्नाथपुरी येथेच पूर्ण केले. गौरांगप्रभु चैतन्य यांचे पुरीतच महाप्रयाण झाले. दण्डी रामायणकर्ता कवी जगन्नाथदास येथेच होता. अशा प्रकारे अनेक कवी, संत, प्रसिद्ध पुरुष यांनी याच जगन्नाथपुरीत आपले जीवनसाफल्य साधले आणि या पवित्र क्षेत्राचा महिमा वाढविला.

हजारो वर्षांपूर्वी कलिंग देशात अनार्य आदिवासी लोकांची वस्ती होती. नंतर तेथे आर्यांनी प्रवेश केला. इ. स. पूर्वी २६१ मध्ये सम्राट अशोकाने तो देश जिंकून घेतला. त्या वेळी भयंकर युद्ध होऊन अपरिमित मनुष्यहानी झाली. तेथील संहाराने अशोकाचे हृदयपरिवर्तन झाले आणि त्याने बौद्धधर्म स्वीकारला.

कलिंग देश पुनः स्वतंत्र झाला, पण अशोकाचे शिलालेख आणि त्याच्या स्मृती अद्यापही भुवनेश्वर व जगन्नाथपुरीच्या आसमंतात

कायम आहेत. त्यानंतर हिंदुधर्माचे उत्थान झाले आणि त्या काळी बांधलेली अनेक हिंदुमंदिरे धर्मसंस्कृतीची केन्द्रे बनली. भौम, केसरी, गंग वगैरे राजघराणी येथे नांदली. सूर्यवंशी राजे तर ह्या उत्कलभूमीचे खास पुत्र म्हणून प्रसिद्ध झाले. त्यांनी उडिया साहित्य आणि संस्कृतीचा विकास केला.

इ. स. १५०९ मध्ये हा प्रदेश मुसलमानांच्या ताब्यात गेला. त्यानंतर इ. स. १७६८ मध्ये मराठ्यांनी तेथे आपली सत्ता कायम केली. इ. स. १८०३ मध्ये इंग्रजांनीं त्याचा ताबा घेतला. असा इतिहास आहे.

आज ओरिसा प्रांत हा स्वतंत्र सार्वभौम भारत प्रजासत्ताकातील एक महान् संस्कृतीचा प्रांत बनला आहे. हे घटक राज्य लहान, पण त्याची कीर्ति महान् आहे. भुवनेश्वर ही त्याची नवी राजधानी आहे आणि जगन्नाथपुरी हे भारताचे थोर संस्कृतिकेंद्र आहे. हिराकूडसारखी नवी तीर्थक्षेत्रे येथे आहेत. विशाखापट्टणसारखी नवीन औद्योगिक केंद्रे येथे आहेत.

जगन्नाथपुरीला जाणारा प्रत्येक यात्रेकरू प्रथम भुवनेश्वर येथील श्रीलिंगराजाचे दर्शन घेतो आणि नंतर पुरी येथे येऊन आपली ही यात्रा सफल करतो. सुमारे साठ किलोमीटर अंतर असलेली ही दोन्ही क्षेत्रे हरिहर-ऐक्याची प्रतीके आहेत.

जगन्नाथपुरीपासून बारा मैलांवरील सखी गोपाळमंदिर आणि त्रेपन्न मैल अंतरावरील कोणार्कचे सूर्यमंदिर पाहिल्याशिवाय जगन्नाथपुरीची यात्रा पूर्ण होत नाही. इतर तीर्थक्षेत्रांशी असा विशेष संबंध जोडणारी ही जगन्नाथपुरी खरोखरच भारतीय ऐक्याचे एक महान् संस्कृतिकेन्द्र आणि पवित्र तीर्थक्षेत्र आहे.

" ज य ज ग न्ना थ "

ॐ

८

प्रयाग


त्रिवेणीं माधवं सोमं भारद्वाजं च वासुकीम् ।
वंदे अक्षय्यवटं शेषं प्रयागं तीर्थनायकम् ॥

सप्तसिंधूच्या प्रदेशातून आर्य लोक पूर्वेकडे सरकत सरकत आणि यमुना आणि गंगा यांच्या किनारी आले. हा प्रदेश त्यांना फारच आवडला. यमुना आणि गंगा या लोकमातांनी आर्यांच्या सर्वांगीण प्रगतीला खूपच हातभार लावला. गंगा आणि यमुना यांचा संगम ज्या स्थळी झाला आहे त्या स्थळावर ऋषिमुनींनी अनेक यज्ञयाग केले. ती पवित्र भूमी यज्ञभूमी म्हणून प्रख्यात झाली आणि त्या स्थळाला ‘ तीर्थराज प्रयाग ’ असे नाव मिळाले.

गंगा आणि यमुना यांच्या संगमातच त्या ऋषिमुनींनी आपल्या ज्ञानसाधनेच्या सरस्वतीला विलीन केले आणि तिचा गुप्त प्रवाह त्या संगमात मिसळून त्रिवेणी संगमाचे ते महान पवित्र तीर्थक्षेत्र बनविले. म्हणूनच भारतातील सर्व तीर्थक्षेत्रांत तीर्थराज प्रयाग क्षेत्राला अग्रपूजेचा मान मिळाला.

रामायणात या क्षेत्राची महती गायिलेली आहे : शृंगवेरपुराजवळ गंगा पार करून प्रभू रामचंद्र प्रयागतीर्थाजवळ आले. ते लक्ष्मणाला

म्हणाले, "अहाहा! लक्ष्मणा, ऐकलास ना हा आवाज! अरे, हा गंगा-यमुनांच्या संगमावरील जल-मीलनाचा आवाज आहे. त्या पवित्र



गंगेच्या प्रवाहाजवळचा जनसंमर्द मागे नदीवरील प्रचंड रेल्वेपूल.

तीर्थक्षेत्रावरील ऋषि-मुनींच्या यज्ञधूमाचा मंद सुगंध येथील वातावरणात दरवळला आहे. या पुण्यप्रदेशातील भारद्वाज मुनींच्या आश्रमात आपण विश्रांती घेऊ!"

नंतर राम, लक्ष्मण, सीता यांनी त्या पवित्र संगमात स्नान केले. गंगेचे पांढरे शुभ्र पाणी आणि यमुनेचे निळसर पाणी यांचा सुंदर संगम पाहून सीतेला खूपच आनंद झाला.

महात्मा गौतमबुद्ध प्रयागक्षेत्री येऊन राहिले होते. जवळच असलेल्या कौशाम्बी येथे ते दोन वर्षे राहिले होते. राजा उदयन आणि राणी वासवदत्ता यांच्या या कौशाम्बी राजधानीत सम्राट अशोक बाळपणी राहात होता.

पूर्वी देव-दानवांनी मिळून समुद्रमंथन केले. समुद्रातून निघालेल्या चौदा रत्नांपैकी अमृताबद्दल त्यांच्यांत भांडण झाले. धन्वंतरीने अमृताचा कुंभ देवांना दिला, पण राक्षसांनी तो कुंभ पळविला. तेव्हा श्रीविष्णूने

मोहिनीरूप धारण करून राक्षसांना भुलविले. त्यांच्यापासून तो अमृत-कुंभ परत घेतला आणि इंद्राचा मुलगा जयंत याच्या हाती दिला.

कुंभ घेऊन जयंत पळाला. तेव्हा राक्षसांनी त्याचा पाठलाग केला. पळता पळता जयंताने तो अमृतकुंभ चार जागांवर ठेवला. त्या चारही ठिकाणी अमृताचे काही थेंब पडले आणि ती चारही पवित्र स्थळे अमृत-तीर्थक्षेत्रे बनली. त्या चारही स्थळी सूर्य कुंभ राशीत येतो. तेव्हा सुमारे बारा वर्षांनी "कुंभमेळा" म्हणून प्रचंड यात्रा भरू लागली. प्रयाग, हरिद्वार, नाशिक आणि उज्जैन (उज्जयिनी) या चार कुंभतीर्थक्षेत्रांपैकी प्रयागला फारच मोठे महत्त्व आहे.

कुंभमेळा पर्वणीत प्रयाग येथील त्रिवेणी संगमात स्नाने करून महापुण्य मिळविण्यासाठी दूरदूरचे लोक येतात. तेथे साधू-संन्याशांची खूपच गर्दी होते. लाखो लोकांच्या त्या प्रचंड यात्रेत कोट्यवधी रुपयांची उलाढाल होते. त्या ठिकाणी दानधर्माला तर खूपच उधाण येते.

प्रयाग-तीर्थावर मुंडण करून पितरांना पिंडदान देणे, पंड्यांना आणि तीर्थोपाध्याय यांना मोठमोठी दाने देणे म्हणजे विशेष पुण्य मानले जाते. सुवासिनी स्त्रिया संगम-तीर्थावर "वेणीदान" करतात. त्या विशिष्ट दानविधीचे महत्त्व फार मानतात.

दर सहा वर्षांनी अर्ध कुंभमेळा भरतो. तसेच ग्रहणे, संक्रान्त वगैरे पर्वण्यांच्या वेळीही प्रयागच्या संगम-तीर्थांत स्नानासाठी अनेक भाविक लोकांची गर्दी असते. तीर्थराज प्रयाग क्षेत्र म्हणजे स्नानाचे महान पुण्यप्रद क्षेत्र मानले जाते.

प्रयाग काशी ह्या सारख्या क्षेत्रांच्या ठिकाणी हिंदू यात्रेकरूंवर असणारा कर दिल्लीच्या शहाजहान बादशहाने उठवावा म्हणून कवींद्राचार्य या काशीक्षेत्रात राहाणाऱ्या महाराष्ट्रीय पंडिताने दिल्लीस बादशाहाची भेट घेऊन खटपट केली. कवींद्राचार्यांची विद्वत्ता, वक्तृत्व

आणि युक्तिवाद पाहून बादशाहाने प्रयाग आदी क्षेत्रातील हिंदूंवरील कर माफ केला. हा प्रसंग इ. स. १६५० च्या सुमाराचा आहे.

प्रयाग येथील गंगाकाठी असलेल्या प्राचीन किल्ल्याच्या तळघरात अत्यंत जुन्या अशा प्रचंड वटवृक्षाचे मूळ आणि खोड आहे. येथेच किल्ल्यात निरनिराळ्या देवतांच्या पाषाणाच्या मूर्ती आहेत. त्यातील धर्मराजाची मूर्ती चित्रात दिली आहे. गंगाकाठापासून जवळ असलेल्या हनुमान-मंदिरात मारुतीची मूर्ती आडवी झोपलेली आहे.



प्रयागच्या किल्ल्यातील धर्मराजाची मूर्ती

प्रयागच्या किल्ल्यात एक गुप्तकालीन शिलास्तंभ ठेवलेला आहे. हा प्रयाग शहरापासून सुमारे अठ्ठावीस मैलावर असणाऱ्या कोसल (म्हणजे प्राचीन कौशाम्बी) येथे तो प्राचीन काळी उभारलेला असावा. कारण कौशाम्बीच्या प्रांताधिकाऱ्यांना उद्देशून काही मजकूर या स्तंभावर अशोकाने कोरलेला आहे.पुढे गुप्तकाळात म्हणजे प्राचीन भारताच्या इतिहासाच्या सुवर्णकाळात सम्राट समुद्रगुप्त याने दक्षिण भारताच्या विजययात्रेनंतर अश्वमेध यज्ञ केला. या प्रसंगी समुद्रगुप्ताच्या विजयाचे वर्णन हरिषेण नावाच्या कवीने संस्कृत भाषेत गद्य आणि पद्य अशा मिश्र रीतीने केले. ते वर उल्लेख केलेल्या अशोकाच्या स्तंभावर अशोकाने खोदलेल्या वर्णनाखाली असलेल्या रिकाम्या जागी-खोदलेले आढळते. अशा रीतीने एकाच शिलास्तंभावर अशोकाचा शांततेचा संदेश आणि त्याच्या मागून सहा शतकानंतर झालेल्या वैदिकधर्मीय समुद्रगुप्ताचा जयघोष असे आपणास प्रयाग येथे एकत्र आढळते.


प्रयाग क्षेत्राभोवतालचा सारा प्रदेश अतिशय सुपीक आणि समृद्ध आहे. गहू, कडधान्ये, मोहरी, ऊस वगैरे भरघोस पिके पिकविणारा हा प्रदेश आहे. मोठमोठ्या वृक्षांनी घनदाट बनलेली सुंदर उपवने भारताचे एक विशेष वैभव आपल्या समोर उभे करतात. प्रयाग म्हणजे देवभूमी; प्रयाग म्हणजे भारताचे दुसरे नंदनवन. यामुळेच तर मोगलकाळात या प्रयागला–या अलाहाबादला–मोगल सम्राट आपला तळ देऊन राहात. अकबराच्या आणि औरंगजेबाच्या सैन्यासारख्या प्रचंड सैन्याला सावली पुरविणारे येथील प्रचंड वृक्ष, घनदाट आंबराया आणि भव्य मजबूत किल्ले आजही त्या गोष्टींची साक्ष देत आहेत.

कनोजचा प्राचीन भारतीय सम्राट हर्षवर्धन हा प्रत्येक पाच वर्षांनी प्रयाग येथील त्रिवेणीसंगम तीर्थक्षेत्रावर येऊन येथे मोक्ष परिषद नावाची एक प्रचंड परिषद भरवीत असे. त्या परिषदेला अनेक राजे येत. तसेच विद्वान, साधू, संत, महंत, पुजारी, भिक्षुक, अनाथ लोक जमत. त्या वेळी सम्राट हर्ष आपले सारे भांडार तेथे दान देऊन टाकीत असे. आपले बहुमोल वस्त्रालंकारही उतरून तो दान करून टाकी आणि संपूर्ण निष्कांचन बने. भारताच्या इतिहासात हर्षासारखा दानशूर सम्राट दुसरा क्वचितच झाला असेल!

अलाहाबादेतील "खुशरू बाग" फारच प्रेक्षणीय आहे. उंच दगडी तटाच्या आत ही सुंदर बाग असून मधून मधून मोठमोठे महाल बांधलेले आहेत. खुशरू हा जहांगिराचा पुत्र होता. जहांगीरच्या दुसऱ्या पुत्राने म्हणजे खुर्रम ऊर्फ शहाजहानने राज्यलोभामुळे आपला भाऊ खुशरू याचा खून केला होता. त्या खुशरूची कबर जहांगीरने या बागेत बांधली.

खुल्दाबादची सराई, दारागंज, वगैरे मोगलकालीन ऐतिहासिक स्थळे प्रयागच्या परिसरात आहेत. शेवटचा बादशहा शहाआलम याने आपल्या

साम्राज्याचे दान इंग्रजांच्या हातांवर याच अलाहाबाद क्षेत्रात सोडले.



आनंद भवन; प्रयाग.

कर्नलगंज भागात पंडित मोतीलाल नेहरूंनी बांधलेले आनंद-भवन हे तर आधुनिक भारताचे एक विशाल आणि आदरणीय मंदिर बनले आहे. त्यांनी कॉंग्रेसला दिलेले स्वराज्य-भवन आणि तेथील कमला नेहरूहॉस्पिटल नेहरू कुटुंबाच्या अनेक आठवणी सांगत आजही उभे आहेत.

हायकोर्टाची इमारत, विश्वविद्यालय, नगरपालिकेचे वस्तुसंग्रहालय, हिंदी साहित्य संमेलन कार्यालय, हिंदुस्तानी ॲकॅडमी वगैरे अनेक इमारती या अलाहाबादेत पाहण्यासारख्या आहेत.

प्रयागला जाणारा प्रत्येक जण संगमस्थळाचे दर्शन घेतल्याशिवाय परत जात नाही. कारण याच स्थळामुळे या प्रयागला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

गंगा, यमुना आणि सरस्वती या तीन नद्यांच्या पवित्र संगमाला

'त्रिवेणीसंगम' म्हणतात. या तीन नद्यांपैकीं फक्त दोनच नद्या आपणाला दिसतात. तिसरी सरस्वती नदी गुप्त आहे असे म्हणतात. नदीकाठी तिचे एक कुंड दाखवितात. कदाचित प्राचीन काळीं ती नदी अस्तित्वात असेलही.

प्राचीन काळी या ठिकाणी फक्त यमुना नदीच वाहात होती. नंतर गंगा नदी तिला मिळण्यासाठी आली. यमुना आणि भगीरथाने स्वर्गातून आणलेली भागीरथी गंगा यांचा येथे संगम झाला.

गंगा यमुनांचा तो सुरेख संगम पाहून नरहरी कवी आपली कविता लिहितो :


भागीरथीचे अति शुभ्र वारी ।
काळी दिसे सूर्यसुताहि भारी ॥
दोघीमध्ये जे जळ लाल आहे ।
सरस्वती ती प्रकटोनी आहे ॥

स्वर्गंगेचा ओघ आपणाकडे आला आहे, असे पाहून यमुना अर्घ्य घेऊन तिच्या भेटीस गेली, पण गंगेने तिच्या अर्घ्याच्या स्वीकार केला नाही. गंगा म्हणाली, " यमुने, तू माझ्यापेक्षा वडील आहेस. तुझ्या अर्घ्याचा मी स्वीकार केला तर पुढे मी नामशेष होईन. तो दोष मला लागू नये ! "

त्यावर यमुना म्हणाली, " गंगामाई, तुझी योग्यता माझ्यापेक्षा श्रेष्ठ आहे. मी वडील असले तरी तुला मान देते. मला तुझ्यात सामावून घे. या संगमस्थळापासून शत योजनं अंतर आपण दोघी एक होऊन वाहू. आपल्या प्रवाहाला यापुढं तुझंच नाव राहील. "

अशा प्रकारे गंगा-यमुनेचा संगम झाला आणि त्यांचे प्रवाह एकत्र वाहू लागले. गंगानद एकाच प्रवाहाचा असला तरी हिमकन्या गंगेचे थंड पाणी व सूर्यकन्येचे उष्ण पाणी यांचा अलग अनुभव थंडीच्या दिवसांत सर्वांना कळून येतो.

त्रिवेणीसंगमावर स्नान करण्यासाठी आणि मृतांच्या अस्थी विसर्जन करण्यासाठी अनेक लोकांची गर्दी नित्य असते. येथे गंगा बालरूपाने विहार करीत आहे. गंगेच्या पात्रात तिचा ओघ कधी या बाजूने तर कधी त्या बाजूने वहात असतो म्हणून प्रयागक्षेत्री गंगेवर घाट आढळत नाहीत. प्रवाहाच्या काठावर पंडे लोक लाकडी तात्पुरती दुकानांची जागा उभारून असतात. तेथे शेकडो पंडे लोकांच्या झोपड्यांवर झेंडे



पं. जवाहरलाल आपल्या मातेच्या अस्थी त्रिवेणीसंगमात विसर्जन करण्या-पूर्वी स्नान करीत आहे.गळ यात यज्ञोपवीत असलेले नेहरूंचे दुर्मीळ चित्र.

फडकत असतात. नावा–होड्यांची ये-जा चालू असते. दानधर्माची घाई होत असते आणि पाण्याचा प्रवाह कधी निळा तर कधी पांढरा अशा रंगाने चमकत वेणीच्या पेडासारखा वर खाली होत वाहात असतो. ते दृश्य प्रेक्षणीय असते.

संगमस्थानाच्या तीरावरील सृष्टिसौंदर्य, तटावरील तो लाल दगडाचा

किल्ला, त्यातील अक्षय्यवट, घाटावरील अनेक मंदिरे यांचा देखावा अत्यंत नयनमनोहर आहे. किल्ल्यातील अक्षय्यवटाभोवती अनेक देवतांच्या पाषाणाच्या सुरेख मूर्ती आहेत. प्रयागयेथील वासुकी नागाचे मंदिर प्रेक्षणीय आहे.

गंगातीरावर प्राचीन प्रतिष्ठानपूर नावाच्या नगरीचे विशाल खंडावशेष पडलेले दिसतात. याच प्रतिष्ठानपुरात चंद्रवंशीय पुरुरवा, नहुष, ययाती, दुष्यंत, भरत वगैरे राजे राज्य करीत होते. त्या भग्नखंडावशेषांचे दर्शन घेताना तेथील इतिहास आपल्या डोळ्यांपुढे तरळतो.

प्रयागपासून सुमारे बारा कोस अंतरावर गंगातटाकावर एक प्रचंड टेकडी आहे. त्या टेकडीला सध्या ‘ लाक्षागिरी ’ असे म्हणतात. सोमवती अमावास्येला या ठिकाणी मोठी यात्रा भरत असते. याच ठिकाणी पूर्वी वारणावती नावाची नगरी होती असे सांगतात.

याच वारणावतीच्या यात्रेला पांडवांना नेऊन तेथील मुद्दाम तयार करून घेतलेल्या लाखेच्या घरात त्यांना जाळून टाकण्याचा कट कौरवांनी केला होता; पण त्यांचा तो बेत पांडवांनीं विदुरकाकांच्या साहाय्याने बिघडून टाकला. पांडव सुरक्षितपणे भुयारातून निसटून गेले आणि त्या प्रचंड लाक्षागृहाच्या आगीत एक म्हातारी व तिचे पाच पुत्र जळाले.

महाभारतातील या कथेच्या आठवणीचा हा प्रचंड ढिगारा तेथे अद्यापही दाखवितात. लाक्षागिरी खेड्यातील लोक यात्रेकरूंना ती कथा सांगून तेथील पवित्र आठवणी उजळून काढतात. प्रयागच्या परिसरात अशी अनेक स्थळे आहेत.

♧

१०

हरिद्वार

अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा ।
हिमालयो नाम नगाधिराजः ॥

भारताच्या उत्तर सरहद्दीचा रक्षणकर्ता पर्वतश्रेष्ठ हिमालय हा प्रत्यक्ष देवतांचा आत्मा आहे, असे कविश्रेष्ठ कालिदासाने हिमालयाचे वर्णन केले आहे. स्वर्ग म्हणतात तो या हिमालयावरच आहे.यातील गंगोत्री या अतिउंच पहाडावर गंगा नदी उगम पावते व ती पहाडातील सुमारे दोनशे मैलांचा अतिदुर्गम मार्ग ओलांडून हरिद्वार येथेच प्रथम मैदानी प्रदेशात प्रवेश करते. स्वर्गातून म्हणजे हिमालयाच्या जटिल भागातून खळाळत येऊन भू-सपाटीवर ज्या स्थळी गंगा पदार्पण करते, त्या स्थळी हरिद्वार हे अतिशय पुरातन काळापासून प्रसिद्ध असे तीर्थक्षेत्र आहे. हे क्षेत्र गंगेच्या उजव्या तीरावर शिवालिक टेकड्यांच्या पायथ्याशी वसलेले आहे.

पुराणात अयोध्या, मथुरा, मायावती, काशी, कांची, अवंतिका आणि द्वारावती अशा मोक्ष देणाऱ्या सात नगरींचे वर्णन केले आहे. त्यांपैकी मायावती म्हणजे हरिद्वार ही एक श्रेष्ठ नगरी आहे. ही नगरी म्हणजे स्वर्गाची, मोक्षाची किंवा पुण्याची पायरीच म्हणानात !


हिमालयातील हरी म्हणजे विष्णू (बदरीनारायण) आणि हर म्हणजे कैलासनाथ श्री शंकर (केदारेश्वर) यांच्या दर्शनासाठी जाण्याचा रस्ता

हरिद्वार या तीर्थक्षेत्रावरूनच जातो, म्हणून ‘ हरिद्वार ’ किंवा ‘ हरद्वार ’ असे नाव या क्षेत्राला प्राप्त झाले. गंगेच्या तीरावरचे हे पहिलेच मोठे गाव आहे. हे क्षेत्र म्हणजे हिमालयाच्या यात्रेचे मुख्य प्रवेशद्वार आहे. हरिद्वार हे हिमालयाच्या पायथ्याशी आहे. या ठिकाणी गंगा जोराने वाहाते. येथील सृष्टिसौंदर्य, पर्वतप्रदेशाचे सान्निध्य आणि भारतातील सर्वात मोठ्या गंगा नदीचा थंड आणि आसमंतात घुमणारा असा प्रवाह यांमुळे मनुष्याच्या मनाला शांती देणारे व मोक्ष मिळवून देणारे असे तीर्थक्षेत्र येथे निर्माण झाले. या ठिकाणी शंकर पार्वतीसह राहतात. म्हणून येथे राहून शंकराची भक्ती करणाऱ्या व येथील गंगेत स्थान करणाऱ्या मनुष्याला मोक्ष मिळतो, असे या स्थानाचे माहात्म्य आहे. म्हणून येथे स्नानासाठी, देवदर्शनासाठी आणि यात्रेसाठी दरवर्षी येणाऱ्या लाखो भाविकांची नित्य गर्दी असते. या पुण्यक्षेत्राच्या दर्शनाचा प्रभाव असा आहे की, कितीही नास्तिक मनुष्य असला तरी तो आस्तिक बसून जातो.

या क्षेत्राचा उल्लेख महाभारतातही आढळून येतो. अर्जुन जेव्हा तीर्थक्षेत्राला निघाला होता, तेव्हा तो या गंगाद्वार तीर्थक्षेत्रावर काही दिवस राहिला होता.

हरिद्वार येथेच कपिल ऋषींचा आश्रम होता. एकदा सगर राजाने अश्वमेध यज्ञ सुरू केला. इंद्राने भिऊन सगर राजाच्या यज्ञाचा घोडा पळविला व तो कपिल ऋषींच्या आश्रमाजवळ आणून बांधला. सगर राजाच्या साठ हजार मुलांनी घोडा शोधून काढला. कपिल ऋषींनी घोडा चोरल्याचे आढळून आल्यावर त्या राजपुत्रांनी तपश्चर्येच्या समाधीत असलेल्या कपिल ऋषींच्या गळ्यात मेलेला साप अडकविला आणि ते घोड्याला घेऊन निघून गेले. समाधी उतरल्यानंतर कपिल ऋषींना आपल्या गळ्यात साप बांधल्याचे दिसून आले. सगर राजाच्या मुलांनी आपला अपमान करण्यासाठी ही गोष्ट केली, असे त्यांनी अंतर्ज्ञानाने

ओळखले. कपिल ऋषींना या गोष्टीचा राग आला आणि त्यांनी सगर राजाच्या साठ हजार मुलांना जाळून टाकले. नंतर सगर राजाच्या कुळात भगीरथ नावाचा पराक्रमी राजा झाला. त्याने आपल्या पूर्वजांचा उद्धार करण्यासाठी गंगेला स्वर्गातून पृथ्वीवर आणले. गंगेच्या तीर्थाने सगरपुत्रांचा उद्धार झाला. हरिद्वारजवळ कपिलस्थान या ठिकाणी अजूनही कपिल ऋषींच्या आश्रमाची जागा दाखविली जाते.



हरीची पायरी हरिद्वार

हरिद्वार या ठिकाणी गंगेच्या पात्राची रुंदी जवळजवळ एक मैल भरेल. नदीचे तीर घाट व देवळे यांनी गजबजून गेले आहेत. या ठिकाणी गंगेच्या पात्रातील पाणी अतिशय स्वच्छ व पवित्र असे आहे. या ठिकाणी गंगेचे पाणी इतके स्वच्छ आहे की, कुणालाही गंगेचा तळ सहज दिसून येतो.

हरिद्वार, कनखल व ज्वालापूर ही तीन गावे जवळजवळ वसलेली असून हल्ली या तिघांचे मिळून एकच नगरपालिका असलेले एक संयुक्त

शहर निर्माण झाले आहे.

गंगाद्वारे कुशावर्ते बिल्वके नीलपर्वते ।
तीर्थे च कनखले स्नात्वा पुनर्जन्मो न विद्यते ।।

गंगाद्वार, कुशावर्त, बिल्वतीर्थ, नीलपर्वत आणि कनखल अशी जी पाच तीर्थे, त्यांत स्नान केल्याने मनुष्याची जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून सुटका होते.

फार प्राचीन काळापासून हरिद्वार हे क्षेत्र पवित्र साधू व संन्यासी यांचे राहण्याचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. यात्रेकरूच येथील कार्यक्रम म्हणजे गंगेत स्नान करणे, घाटावरील देवतांचे दर्शन घेणे व कुशावर्तावर जाऊन श्राद्धविधी करणे असा असतो.

हरिद्वारमधील प्रसिद्ध मुख्य घाट म्हणजे 'हरी की पौडी' (हरीची पायरी) हा आहे. यात्रेकरू लोक स्टेशनवरून सरळ या घाटावर येतात. यात्रेकरूंची व्यवस्था करण्यासाठी पंडे लोक असतात. ते यात्रेकरूंची चौकशी करून त्यांची सोय करतात. यात्रेकरूंना उतरण्यासाठी येथे अनेक धर्मशाळा आहेत. या धर्मशाळा यात्रेकरूंनी नेहमी भरलेल्या असतात.

'हरी की पौडी' या घाटावर स्नान करण्यात विशेष पुण्य मानले जाते. कारण या ठिकाणी भगवान विष्णूच्या पावलांचा ठसा आहे. वैशाख महिन्यात येथे दर बारा वर्षांनी कुंभमेळा भरतो. त्या वेळी लाखो यात्रेकरू स्नानासाठी येथे गोळा होतात. तसेच ग्रहणाच्या वेळीही येथे अनेक यात्रेकरू स्नानासाठी येतात.

हरीकी पौडी म्हणजे लहान लहान देवळे, आणि पंड्यांची छोटी छोटी छपरे यांची गर्दी असलेला एक लहानसा घाट. हिमालयाची गिरीकुहरे फोडून गंगामातेने भारताच्या मैदानात येथे प्रवेश केला आहे.

त्या प्रवेशाच्या वेळी ब्रह्मदेव वगैरे सर्व देवांनी येथे गंगेचे स्वागत केले. या ठिकाणी हरीकी पौडी जवळच ब्रह्मकुंड आहे. यात्रेकरूंनी गंगामातेची पूजा करून तिला अर्पण केलेले साखरफुटाणे दाणे लाह्या वगैरे वस्तू खाण्याच्या आशेने कुंडात माशांचे थव्याच्या थवे गोळा होत असतात. माशांची गर्दी आणि त्याचा मळकट हिरवट रंग, बटबटीत डोळे व थबकडी पसरट तोंडे पाहून गंमत वाटते. थोड्या लाह्या किंवा दाणे प्रवाहात टाकताच माशांचा समूह एकदम त्या जागी गोळा होतो व ते सारे खाणे पटकन गिळून टाकतो. सूर्यनारायणाच्या कोवळ्या किरणात माशांची अंगे रुपेरी शिंपल्यासारखी चमकतात. कितीही वेळ घाटावर उभे राहून आणि प्रवाहात खाण्याचे पदार्थ फेकून त्यांची गंमत पाहात उभे राहिले तरी कंटाळा कसा तो येत नाही. आंघोळीला येणाऱ्या भाविकांनी गंगेला अर्पण केलेल्या लाह्या फळे वगैरे अमूप वस्तू खायला मिळतात आणि कोणी पकडील, मारील अशी भीती नाही; त्यामुळे तर हे मासे इतक्या धीटपणे पाण्यात गर्दी करीत नसतील ना ?

कुंभमेळ्यासंबंधी पौराणिक कथा अशी आहे की, देवांनी आणि दानवांनी समुद्रमंथन करून अमृत काढले. त्या अमृतासाठी त्यांच्यात भांडण सुरू झाले. धन्वंतरीने तो अमृतकुंभ इंद्रपुत्र जयंत याच्या स्वाधीन केला. जयंत पळून गेला. दैत्यांनी त्याचा पाठलाग केला. तेव्हा पळताना जयंताने तो अमृतकुंभ प्रयाग, हरिद्वार, उज्जयिनी व नाशिक या चार ठिकाणी ठेवला. या चार ठिकाणी त्या कुंभातील अमृत थोडे सांडले. म्हणून या स्थळांना अमृत क्षेत्राचा मान मिळाला. म्हणून या चार स्थळी "कुंभमेळा" नावाची यात्रा भरण्यास सुरवात झाली. या चार तीर्थक्षेत्रांपैकी हरिद्वारचा कुंभमेळा फार मोठा भरतो. सूर्य जेव्हा कुंभ राशीत येतो, तेव्हा वैशाख महिन्यात हा मेळा फार मोठ्या प्रमाणात भरतो. दर बारा वर्षांनी ही कुंभमेळ्याची यात्रा फार मोठ्या प्रमाणात भरते.

घाटावर गंगापुत्राची गर्दी असते. या ठिकाणी संकल्पपूर्वक स्नान करावयाचा प्रघात असतो. हे गंगापुत्र प्रत्येक यात्रेकरूला स्नानाचा संकल्प सांगतात. संकल्पपूर्वक गंगेत तीन बुचकळ्या मारल्या व गंगास्नान करून गंगापुत्रांना दान दिले म्हणजे गंगास्नानाचे पुण्य मिळते. येथे कोणी यात्रेकरू काठावर कमरेइतक्या पाण्यात आंघोळ करतात तर कोणी प्रवाहाच्या मध्यावर जाऊन पोहतात.

"स्मरणे, स्तवने, स्नाने शुचि करते विश्व चित्त, वाक्, अंगा" य कव्युक्तीप्रमाणे ही गंगा नदी स्मरणाने स्तवनाने व स्नानाने माणसाचे मन, वाणी व अंग पवित्र करीत असते. गंगास्नानाने मनुष्य अंतर्बाह्य पवित्र बनतो व आपल्या जन्माचे सार्थक झाल्याचे मानतो. आपल्या मुलाच्या समवेत वृध्द माता–पितरांना तर येथील गंगास्नानामुळे धन्यता वाटते.

पूर्वीच्या काळी हा घाट फारच लहान म्हणजे ३४ फूट रुंदीचा होता. या घाटाला १० पायऱ्या होत्या. कुंभमेळ्याच्या दिवसात येथे यात्रेकरूंची फारच गर्दी होत असे व अपघातात बरेच यात्रेकरू मृत्युमुखी पडत. तेव्हा सरकारने यात लक्ष घालून घाटाची रुंदी वाढविली व अनेक पायऱ्या नवीन बांधल्या. येथील पुलावर फरसबंदी करून यात्रेकरूंना स्नानाच्या वेळी लोखंडी साखळ्यांची सोय केली.

'हरी की पौडी' या घाटाला लागूनच गंगाद्वार नावाचे मंदिर आहे. येथे असलेल्या अनेक देवळांपैकी हे सर्वात मोठे व महत्त्वाचे आहे. रोज सांज-सकाळ या ठिकाणी पूजा व आरती होत असते. आरतीचा देखावा अविस्मरणीय असतो.

येथील घाटावर उभे राहून गंगाप्रवाहाची अपूर्व शोभा पाहण्यात यात्रेकरू रमून जातो. बराच वेळ गंगेचे पात्र पाहिले तरी मनाचे समाधान होत नाही. श्रीहरीच्या पायरीजवळील ब्रह्मकुंडात सदैव छाती-इतके पाणी असते. येथील स्फटिकासारख्या स्वच्छ व शांत जलाशयात

स्नान करताना अतिशय मौज वाटते व मन प्रसन्न होते. आपल्यासारख्याच जमलेल्या भाविक यात्रेकरूच्या गंगापूजनाचे विधी पाहून मन हरपून जाते. प्रत्येक यात्रेकरू आपल्याबरोबर येथील स्वच्छ असे गंगोदक "तीर्थ" म्हणून बरोबर घेतो.

येथील घाटांवर पहाटे पाच वाजल्यापासून ते दुपारी बारा वाजेपर्यंत यात्रेकरूंची स्नानाची गडबड चाललेली असते. दुपारी कथाकीर्तने, पुराण-प्रवचने निरनिराळ्या घाटांवर चालू असतात. सूर्यास्ताच्या सुमारास आरत्यांचा थाट दिसून येतो. हा सोहळा पाहण्यासाठी यात्रेकरूची गर्दी झालेली दिसून येते.

मुख्य पुजारीबुवा गंगेला ओवाळण्यासाठी पन्नास-पाऊणशे वातींची आरती घेतो. त्याचप्रमाणे यात्रेकरूं सुद्धा आपापल्या ऐपतीप्रमाणे आरत्या विकत घेतात. या आरत्या गुलाबांच्या फुलांनी भरलेल्या द्रोणांत विकत मिळतात. निरनिराळ्या वाद्यांच्या घोषात व घंटांच्या निनादात या आरत्या चालू असतात. नंतर या आरत्याचे द्रोण गंगेच्या प्रवाहात सोडण्यात येतात. हे तरते दिवे गंगा प्रवाहात पसरत जातात. हा देखावा तर फारच अप्रतिम असा असतो. गंगेच्या आरतीच्या वेळी सारा घाट माणसांनी फुलून गेलेला असतो. सर्व प्रकारची आणि पंथांची भजने व प्रवचने इथे संध्याकाळच्या वेळी चाललेली असतात.

गंगेच्या घाटावरील शोभा वाढविण्यासाठी श्रीमंत बिर्लाशेट यांनी एक मोठे घंटाघर बांधले आहे. त्यावर उंच जागी चारी बाजूना चार घड्याळे बसविली आहेत.

या घाटाजवळच महंत शांतानंद यांनी बांधलेले श्रीश्रवणनाथमंदिर (शंकराचे देऊळ) प्रेक्षणीय आहे. त्या मंदिरात भगवान श्रीशंकराची पिंडी सुमारे अडीच फूट उंचीची आहे. येथील नंदीही मोठा असून फार सुंदर आहे.

हरिद्वारात गंगाद्वार, स्वर्गद्वार, मोक्षद्वार वगैरे अनेक घाट आहेत. सुभाषघाटावर नेहमी कथाकीर्तने चालू असतात. गोघाटावर प्रायश्चित्तविधी केला जातो. कुशावर्तघाट, श्रवणघाट, विष्णुघाट, आणि गणेशघाट वगैरे अनेक घाटांवरील शोभा प्रेक्षणीय असते. प्रवाशांच्या सोयीसाठी सरकारने अनेक पूल बांधले आहेत. सुंदर बागबगीचे केले आहेत. प्रवाशांना थांबण्यासाठी व फिरावयास येणाऱ्या लोकांसाठी विश्रांतिस्थळे केली आहेत. अशा तऱ्हेने हे आता चांगलेच मोठे शहर झाले आहे.

कुशावर्त घाट हा अहिल्यादेवी होळकर यांनी बांधला आहे. कुशावर्त घाटाशेजारीच गावातील सांडपाण्याचा नाला गंगेला मिळाला आहे; पण गंगेला मिळालेले सर्व पाणी पवित्र आणि शुद्ध होऊन जाते. गंगा माता सर्व मानवांचे पाप आणि ताप शांत करून टाकते. मग सांडपाण्यालाही ती आपल्या पोटात सामावून शुद्ध करून टाकते यात नवल ते काय ?

कुशावर्त तीर्थाचे पावित्र्य फार थोर आणि प्राचीन आहे. या स्थानासंबंधी पंडे आपणाला पुढील दंतकथा सागतात :

ह्या ठिकाणी प्राचीन काळी दत्तात्रेयाने दहा हजार वर्षे एका पायावर उभे राहून तपश्चर्या केली. त्या काळात गंगा मातेचा प्रवाह हिमालयावरून खाली आला आणि त्या प्रवाहाने दत्तात्रेयाचे कुशासन (दर्भाचे आसन,) कमंडलू, दंड वगैरे गोष्टी वाहून नेल्या. पण या वस्तूंसह तिला पुढे जाता येईना. ती तेथेच चक्राकार फिरत राहिली. भगवान् दत्तात्रेय गंगेला शाप द्यायला सिद्ध झाले पण त्यामुळे राजर्षी भगीरथाची मोठी पंचाईत झाली. इतकी तपश्चर्या करून पितरांच्या मुक्तीसाठी स्वर्गातून गंगेला पृथ्वीवर आणली आणि ती जर येथेच हरिद्वाराशी घुटमळत राहिली किंवा दत्ताच्या शापाने भस्म झाली तर कसे व्हायचे ? मग भगीरथाने गंगेच्या स्वागतासाठी हरिद्वारला आलेल्या देवाची—विशेषतः ब्रह्मदेवाची

करुणा भाकली. ब्रह्मदेवाने दत्ताला गंगेचा प्रवाह पुढे जाऊ देण्याची विनंती केली. गंगामातेने वाहून नेलेले कुशासन, दंडकमंडलू वगैरे सर्व साहित्य परत केले मग दत्तात्रेयांचा राग शांत झाला. ते म्हणाले, "हे देवतांनो तुम्ही सारेजण येथे अवश्य राहा. गंगेला पुढे जाण्यास मी अनुमती देतो. माझे कुशासन घेऊन गंगा ज्या जागी गोल गोल फिरली त्या भागाला कुशावर्त हे नाव पडेल आणि जे कोणी आपल्या पितरांचे श्राद्ध या पवित्र ठिकाणी करतील त्यांचे पूर्वज जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मुक्त होतील"

दत्तात्रेयाच्या या वरानंतर गंगामातेचा प्रवाह पुढे गेला व येथील तीर्थाला 'कुशावर्त' हे नाव पडले.

गंगेच्या सान्निध्यामुळे हरिद्वारचे आकर्षण इतिहास काळातही अनेकांना वाटले आहे. अकबराचा एक कर्तबगार कारभारी राजा तोडरमल्ल काही काळ लाहोर येथे राहून कारभार पाहात होता. वृद्धापकाळ झाल्यामुळे गंगेच्या काठी हरद्वार येथे जाऊन राहाण्यासाठी त्याने अकबर बादशाहाची परवानगी मागितली आणि तो हरिद्वार येथे येऊन राहिला. "गंगातिरी रिकामे बसण्यापेक्षा लाहोरासच स्वस्थ राहा!" असा बादशाहाने फार आग्रह केल्यामुळे तो मोठ्या नाखुषीने लाहोरला परत गेला आणि थोड्याच दिवसात दि ११-११-१५८९ रोजी मरण पावला. हिंदुमनाला गंगेची आणि हरिद्वारची केवढी ही ओढ!

आता दुसरा प्रकार पाहा :

इ. स. १३९९ मध्ये तैमूरलंग दिल्लीवर स्वारी करून परत निघाला. वाटेत मीरतहून तो हरिद्वारला गेला. तेथे गोमुखातून गंगा पडते ही आख्यायिका ऐकून त्याचा संताप झाला. या समजुतीबद्दल शेकडो लोकांना त्याने यमसदनाला पाठविले आणि हरिद्वारच्या लोकांना चांगलीच अद्दल घडविली.

हरिद्वारात गंगाद्वार, स्वर्गद्वार, मोक्षद्वार वगैरे अनेक घाट आहेत. सुभाषघाटावर नेहमी कथाकीर्तने चालू असतात. गोघाटावर प्रायश्चित्तविधी केला जातो. कुशावर्तघाट, श्रवणघाट, विष्णुघाट, आणि गणेशघाट वगैरे अनेक घाटांवरील शोभा प्रेक्षणीय असते. प्रवाशांच्या सोयीसाठी सरकारने अनेक पूल बांधले आहेत. सुंदर बागबगीचे केले आहेत. प्रवाशांना थांबण्यासाठी व फिरावयास येणाऱ्या लोकांसाठी विश्रांतिस्थळे केली आहेत. अशा तऱ्हेने हे आता चांगलेच मोठे शहर झाले आहे.

कुशावर्त घाट हा अहिल्यादेवी होळकर यांनी बांधला आहे. कुशावर्त घाटाशेजारीच गावातील सांडपाण्याचा नाला गंगेला मिळाला आहे; पण गंगेला मिळालेले सर्व पाणी पवित्र आणि शुद्ध होऊन जाते. गंगा माता सर्व मानवांचे पाप आणि ताप शांत करून टाकते. मग सांडपाण्यालाही ती आपल्या पोटात सामावून शुद्ध करून टाकते यात नवल ते काय ?

कुशावर्त तीर्थाचे पावित्र्य फार थोर आणि प्राचीन आहे. या स्थानासंबंधी पंडे आपणाला पुढील दंतकथा सागतात :

ह्या ठिकाणी प्राचीन काळी दत्तात्रेयाने दहा हजार वर्षे एका पायावर उभे राहून तपश्चर्या केली. त्या काळात गंगा मातेचा प्रवाह हिमालयावरून खाली आला आणि त्या प्रवाहाने दत्तात्रेयाचे कुशासन (दर्भाचे आसन,) कमंडलू, दंड वगैरे गोष्टी वाहून नेल्या. पण या वस्तूंसह तिला पुढे जाता येईना. ती तेथेच चक्राकार फिरत राहिली. भगवान् दत्तात्रेय गंगेला शाप द्यायला सिद्ध झाले पण त्यामुळे राजर्षी भगीरथाची मोठी पंचाईत झाली. इतकी तपश्चर्या करून पितरांच्या मुक्तीसाठी स्वर्गातून गंगेला पृथ्वीवर आणली आणि ती जर येथेच हरिद्वाराशी घुटमळत राहिली किंवा दत्ताच्या शापाने भस्म झाली तर कसे व्हायचे ? मग भगीरथाने गंगेच्या स्वागतासाठी हरिद्वारला आलेल्या देवाची—विशेषतः ब्रह्मदेवाची

करुणा भाकली. ब्रह्मदेवाने दत्ताला गंगेचा प्रवाह पुढे जाऊ देण्याची विनंती केली. गंगामातेने वाहून नेलेले कुशासन, दंडकमंडलू वगैरे सर्व साहित्य परत केले मग दत्तात्रेयांचा राग शांत झाला. ते म्हणाले, "हे देवतांनो तुम्ही सारेजण येथे अवश्य राहा. गंगेला पुढे जाण्यास मी अनुमती देतो. माझे कुशासन घेऊन गंगा ज्या जागी गोल गोल फिरली त्या भागाला कुशावर्त हे नाव पडेल आणि जे कोणी आपल्या पितरांचे श्राद्ध या पवित्र ठिकाणी करतील त्यांचे पूर्वज जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मुक्त होतील"

दत्तात्रेयाच्या या वरानंतर गंगामातेचा प्रवाह पुढे गेला व येथील तीर्थाला 'कुशावर्त' हे नाव पडले.

गंगेच्या सान्निध्यामुळे हरिद्वारचे आकर्षण इतिहास काळातही अनेकांना वाटले आहे. अकबराचा एक कर्तबगार कारभारी राजा तोडरमल्ल काही काळ लाहोर येथे राहून कारभार पाहात होता. वृद्धापकाळ झाल्यामुळे गंगेच्या काठी हरद्वार येथे जाऊन राहाण्यासाठी त्याने अकबर बादशाहाची परवानगी मागितली आणि तो हरिद्वार येथे येऊन राहिला. "गंगातिरी रिकामे बसण्यापेक्षा लाहोरासच स्वस्थ राहा!" असा बादशाहाने फार आग्रह केल्यामुळे तो मोठ्या नाखुषीने लाहोरला परत गेला आणि थोड्याच दिवसात दि ११-११-१५८९ रोजी मरण पावला. हिंदुमनाला गंगेची आणि हरिद्वारची केवढी ही ओढ!

आता दुसरा प्रकार पाहा :

इ. स. १३९९ मध्ये तैमूरलंग दिल्लीवर स्वारी करून परत निघाला. वाटेत मीरतहून तो हरिद्वारला गेला. तेथे गोमुखातून गंगा पडते ही आख्यायिका ऐकून त्याचा संताप झाला. या समजुतीबद्दल शेकडो लोकांना त्याने यमसदनाला पाठविले आणि हरिद्वारच्या लोकांना चांगलीच अद्दल घडविली.

स्टेशनच्या वाटेवरील गीताभवन व तेथील भव्य कृष्णमूर्ती पाहण्यासारखी आहे. गीतेतील तत्त्वज्ञान येथे मूर्तिमंत उभे केले आहे. या क्षेत्री अनेक पाठशाळा आहेत. राजा मानसिंहाची समाधीही येथे आहे.


हरिद्वारापासून सुमारे एक मैल अंतरावर मायाघर नावाचे गाव आहे. या ठिकाणी मायादेवी, भैरव व नारायण यांची जुनी देवळे आहेत. मोक्ष देणाऱ्या सात नगरींपैकीच ही एक आहे. हरिद्वारची जुनी वस्ती या भागात असावी. मायापुरीपासून कनखलकडे जाताना मोठमोठ्या बागा मंदिरे आणि उदासी, सत्नामी, निरंजन इत्यादी वेगवेगळ्या पंथांच्या गोसाव्यांचे मठ दिसू लागतात. सर्वसंगपरित्याग केलेले, भस्माने आपली शरीरे माखलेले, पिंगट केसांच्या जटा वाढलेले गोसावी आपणास येथे आढळतात.

मायापुराच्या दक्षिणेला एक मैल अंतरावर कनखल गाव आहे. कनखल याचा अर्थ असा सांगतात की, येथे कोणी खल नाही. म्हणजे या ठिकाणी सर्वांना मोक्ष मिळतो. या गावात ब्राह्मण व संन्यासी यांचीच वस्ती जास्त आहे. हे गाव हरिद्वारपेक्षा मोठे आहे. एकंदर गावाचा देखावा स्वच्छ व सुंदर आहे. या भागात मुख्यतः सधन लोकांची वस्ती आहे.

याची पौराणिक कथा अशी सांगतात : प्राचीन काळी दक्षप्रजापतीने येथे यज्ञ केला. या प्रसंगी त्याने आपल्या मुलीला-सतीला व जावई शंकर याला आमंत्रण दिले नव्हते. शंकर व सती दोघेही यज्ञाला आली. परंतु दक्षाने दोघांचा अपमान केला. म्हणून सतीने स्वतःला जाळून घेतले. हे कळल्यावर शंकराच्या गणांनी व वीरभद्राने दक्षाचा शिरच्छेद केला. यज्ञमंडपाचा विध्वंस केला आणि भयंकर युध्द केले. तेव्हा देवांनी शंकराची आराधना केली. शंकर प्रसन्न होऊन त्यांनी दक्षप्रजापतीला दिव्य स्वरूप दिले. ही जागा दक्षस्थान म्हणून आज ओळखली जाते व येथे प्रसिद्ध असे दक्षेश्वर नावाचे दक्षाचे देऊळही

आहे. ज्या ठिकाणी सतीने जाळून घेतले तेथे सतीकुंड आहे.

कनखल तीर्थक्षेत्राजवळच साधुसंतांचे व महंतांचे मोठमोठे मठ आहेत. त्यांपैकी निर्मला आखाडा फारच प्रसिद्ध आहे. कुंभमेळ्याच्या वेळी या महंत मठाधिपांच्या व साधूसंन्याशांच्या मिरवणुका फारच भव्य अशा निघतात. उदासी, निर्मला, निर्वाणी व निरंजनी यांचे आखाडे व त्यांच्या "साही" नावाच्या मिरवणुका फार प्रसिद्ध आहेत.



भीमगोडा

कनखलच्या हरिहर आश्रमात मृत्युंजय महादेवाचे मंदिर आहे. ते सुंदर व कलाकौशल्यपूर्ण आहे. श्रीकृष्णनिवास आश्रमामध्ये पाताळेश्वर, लक्ष्मीनारायण, शंकर यांच्या मूर्ती आहेत. शिवाय जगद्‌गुरू शंकराचार्यांचीही तेथे मूर्ती आहे. या ठिकाणी श्रीरामकृष्ण मिशनचे अनेक मठ आहेत. तेथील दवाखान्यात रोगी लोकांच्या उपचाराची सोय उत्तम आहे.

गंगेच्या डाव्या किनाऱ्यावर स्वामी श्रद्धानंद यांनी स्थापन केलेले "गुरुकुल विश्वविद्यालय" नावाचे एक महान विद्याभुवन आहे. भारतीय संस्कृतीच्या शिक्षणाची सोय येथे आहे. पंजाबच्या आर्यप्रतिनिधी सभेने येथे विद्यादानाचे पवित्र कार्य आदर्श रीतीने केले आहे. दरसाल फाल्गुन महिन्याच्या शेवटी येथे मोठा उत्सव साजरा केला जातो. याच ठिकाणी बिलाबंधूंचे वेदमंदिर व मोठे पुस्तकालय आहे. येथील आयुर्वेदभवन, छात्रनिवास, इस्पितळ व बागबगीचे प्रेक्षणीय आहेत.


हरिद्वारापासून सुमारे चार मैलांवर ज्वालापूर आहे. हरिद्वारच्या मुख्य पंड्यांची वस्ती या भागात आहे.

येथून हृषिकेशकडे जाणाऱ्या रस्त्यावर भीमगोडा नावाचे कुंड आहे. भीमाचे नाव या कुंडाला मिळण्याचे कारण असे सांगतात की, गंगावतरण होताना गंगेला मार्ग दाखविण्याचे काम भीमाला सांगण्यात आले. त्या वेळी भीमाने लाथ मारून एक खड्डा निर्माण केला व त्याचे तळे बनले. या तळ्याला भीमागोडा तळे असे नाव पडले. या कुंडात गंगेचे पाणी येते म्हणून येथे स्नान करणे पुण्यप्रद मानतात.

या भीमकुंडापासून दोन मैलांवर सप्तधारा नावाचे स्थान आहे. गंगेच्या सात धारांवर (प्रवाहांवर) सात ऋषींनी तपश्चर्या केली होती. या ठिकाणी त्यांचे आश्रम आहेत. शिवमंदिर, गोशाळा आणि धर्मशाळा-ही आहेत. औषधालय, यज्ञशाळा, स्वामी रामतीर्थांची मूर्ती व एक विशाल सभागृहही येथे आहे. येथे जवळच सत्यनारायणाचे मंदिर आहे. येथूनच पुढे हृषिकेश, लक्ष्मण झूला, बद्रीनारायण वगैरे ठिकाणी जाण्याचा मार्ग आहे. तेथपर्यंत न जाणारे यात्रेकरू या सत्यनारायणाचे दर्शन घेऊन व गरुडकुंडात स्नान करून हरिद्वारची यात्रा पूर्ण करतात. हरिद्वारसंबंधी स्कंदपुराणातील प्रसिद्ध श्लोक खालीलप्रमाणे आहे :

गंगाद्वारसमं तीर्थं न कैलाससमो गिरिः ।
वासुदेवसमो देवो न गंगासदृशं परम् ।।
अस्मिन् क्षेत्रेऽर्धमासे तु शिवसंन्यस्तमानसः
प्राप्नोति शिवसायुज्यं किमन्यैर्बहुभाषितैः ।।

याचा अर्थ असा की, गंगाद्वारासारखे दुसरे तीर्थ नाही, कैलासासारखा दुसरा पर्वत नाही. वासुदेवासारखा दुसरा देव नाही. गंगेसारखी दुसरी नदी नाही. जो कोणी येथे एक पंधरवडा येऊन आपले सर्व लक्ष शंकराच्या भक्तीत गुंतवितो, तो शंकराप्रत जातो. आणखी जास्त काय सांगावे ?



संदर्भ साहित्य

डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर्स	जुन्या आवृत्ती
माझी तीर्थयात्रा	श्री. ह. फडके
दक्षिण हिंदुस्थानचा प्रवास	श्री. ह. फडके
तीर्थरूप महाराष्ट्र, भा. १-२	पं. महादेवशास्त्री जोशी
भगवान बुद्धासाठी	श्री. शंकरराव देव
हिमालयदर्शन	संपादक श्री. वेंकटेशशास्त्री जोशी
वाटचाल	प्रा. रा. भि. जोशी
ज्ञानकोश	संपादक : डॉ. श्री. व्यं. केतकर
कल्याण मासिक (हिंदी)	तीर्थ विशेषांक
माझा देश, माझे लोक	श्री. श्रीपाद जोशी
त्रिभुवनेश्वर लिंगराज	आनंदयात्री
जागृत जगन्नाथ	आनंदयात्री
रियासतींचे खंड	श्री. गो. स. सरदेसाई
भारत दर्शन	श्री. काका कालेलकर
जीवनलीला	श्री. काका कालेलकर
गोकर्ण महाबळेश्वरमहात्म्य	गणपती नरसिंहशास्त्री होसमने
हरिद्वारमहात्म्य (हिंदी)	
Immortal India, Parts I-IV	J. A. Dave
Temples of south India	Publication Division
Temples of North India	Publication Division
विविध क्षेत्रमहात्म्यपर पुस्तिका	
भा. इ. सं. मं. त्रैमासिकाचे अंक	

श्री. शं. रा. देवळ यांची काही पुस्तके

बारा ज्योतिर्लिंगे
आपले देव, आपली दैवतेः भाग १,२.
भारतीय नृपती
भारताच्या ललाटरेषा
आपले सण, आपले उत्सव
पेशवाईतील साडेतीन शहाणे
थोरांच्या नवलकथा : भाग १ ते ६
ऐतिहासिक कथा : भाग १ ते ४
दीपमाळ
पुराणातील गमतीजमती : भाग १ ते ३
पुराणातील सुरसकथा : भाग १ व २

आगामी :

आपले देव, आपली दैवते : भाग ४
भागवतकथा : भाग १ व २
मराठा गडी यशाचा धनी
हा आपला महाराष्ट्र

विद्यार्थ्यांसाठीं चरित्रमाला

१ महात्मा फुले	– ए. के. घोरपडे	२–५०
२. बाबासाहेब आंबेडकर	,, ,,	२–५०
३. कर्मवीर भाऊराव पाटील	,, ,,	२–२५
४. कोल्हापूरचे शाहू छत्रपति	,, ,,	२–००
५. सयाजीराव गायकवाड	– वि पां. दांडेकर	१–५०
६. महर्षि शिंदे	– हिराजी पाटील	१–५०
७. 'यशवंत 'राव चव्हाण	– कृ. भा. बाबर	२–००
८. लाल बहादुर शास्त्री	– दि. रा. मंकेकर	३–५०
९. अहल्याबाई होळकर	– वा. दा. गोखले	१–२५
१०. स्वराज्यांतील गृहांगना	,, ,,	०–७५
११. श्रीसमर्थ रामदासस्वामी	– सौ. स्नेहलता आफळे	०–७५
१२. आमचे राष्ट्रगुरु	– गो. नी. दांडेकर	०–७५
१३. महर्षि आइन्स्टाईन	– अमरेंद्र गाडगीळ	०–५०

☆

श्री लेखन वाचन भांडार

ठोकळ भवन, लक्ष्मी रस्ता, पुणे २.

कव्हर-छपाई : श्री. गजेंद्र आर्ट प्रेस, पुणे ९.